सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | सोमवार, दि. २२ डिसेंबर २०२५ | वर्ष – ३ रे | अंक २५५ | पाने : ८ | किंमत रु. ६/– | inbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# महाराष्ट्रात 'देवाभाऊंची जादू' कायम

## नगरपरिषद निवडणुकीमध्ये भाजपा ठरला नंबर १ पक्ष । महायुती २०० पार

| | | | |
|---|---|---|---|
| भाजपा –१२० | शिवसेना –५७ | राष्ट्रवादी (अजित पवार) –३७ | काँग्रेस –३० |
| राष्ट्रवादी (शरद पवार) –१० | शिवसेना (उबाठा) –१० | इतर –२४ | |

**मुंबई :** महाराष्ट्रामध्ये नुकत्याच संपन्न झालेल्या नगरपंचायत आणि नगरपरिषद निवडणूक २०२५ मध्ये भारतीय जनता पक्षाने एक ऐतिहासिक विजय नोंदवला आहे. या निवडणुकीच्या निकालांनी राज्यातील राजकीय वर्तुळात मोठी चर्चा घडवून आणली आहे, कारण या विजयाचे श्रेय भारतीय जनता पक्षाच्या सर्व कार्यकर्त्यांना आणि महाराष्ट्रातील जनतेला देण्यात आले आहे. पक्षाने स्पष्ट केले आहे की, पूर्ण ५१ टक्केची लढाई जिंकण्याच्या उद्देशाने ही निवडणूक लढवण्यात आली होती आणि त्यात त्यांना यश आले आहे. भारतीय जनता पक्षाला मिळालेल्या या मोठ्या विजयामागे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाची जादू महत्त्वाची ठरली आहे. नगरपालिकांमध्ये सुद्धा मुख्यमंत्री फडणवीसांची जादू कायम असल्याचे या निकालांनी दाखवून दिले आहे.

महायुतीने २०० चा टप्पा पार केला असून, भारतीय जनता पक्ष राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये सर्वात मोठा पक्ष म्हणून उदयास आला आहे. या निवडणुकीत महाविकास आघाडीला अपेक्षित यश मिळाले नाही, कारण जनतेने विकासाच्या राजकारणाला प्राधान्य दिले आहे. जनता देवेंद्र फडणवीस यांच्या पाठीशी आणि सरकारच्या विकासाच्या धोरणांच्या मागे उभी असल्याचे या निकालातून स्पष्ट झाले आहे. विकसित महाराष्ट्र या संकल्पनेसह विकसित नगरपालिका आणि महानगरपालिका असाव्यात, अशी जनतेची भावना असल्याचे या विजयाचे एक महत्त्वाचे कारण मानले जात आहे.

पश्चिम महाराष्ट्रामध्ये भाजपचा दबदब पाहायला मिळत आहे. सातारा जिल्ह्यामध्ये भाजपने एकहाती सत्ता मिळवत मंत्री जयकुमार यांनी आपली जादू दाखवली आहे. दुसरीकडे सोलापुरात मात्र मोहिते पाटील पॅटर्नने भाजपला चांगलाच धक्का दिला आहे.

पश्चिम महाराष्ट्रातील सातारा आणि सांगली जिल्ह्यात भारतीय जनता पक्षाने मुसंडी मारल्याचे चित्र आहे. साताऱ्यात मंत्री जयकुमार गोरे यांनी आपला बालेकिल्ला राखत म्हसवडमध्ये विरोधकांचा सुपडा साफ केला आहे.

म्हसवड नगरपालिकेत मंत्री जयकुमार गोरे यांच्या नेतृत्वाखाली २१ पैकी २१ जागा जिंकत भाजपने निर्विवाद वर्चस्व मिळवले. येथे नगराध्यक्षपदी पूजा विरकर यांची निवड झाली आहे. याशिवाय रहिमतपूर, वाई, मेढा आणि मलकापूर येथेही भाजपचे उमेदवार विजयी झाले आहेत.

रहिमतपुर नगरपरिषदवर वैशाली माने विजयी झाल्या आहेत. वाई नगर परिषदेत अनिल सावंत विजयी झाले आहेत, मेढा नगरपंचायतीत रूपाली वाराघडे विजयी झाल्या आहेत तर मलकापुर नगपरिषदेत तेजस सोनवले विजयी झाले आहेत. सांगली जिल्ह्यात संमिश्र निकाल पाहायला मिळत आहेत.

सांगलीच्या ईश्वरपूर तसेच आष्टीमध्ये जयंत पाटील यांनी आपली ताकद दाखवत एकहाती सत्ता मिळवली आहे.

### नाशिकमध्ये शिंदेंची शिवसेना सर्वात मोठा पक्ष!

नाशिक जिल्ह्यातील ११ पैकी ११ नगरपरिषद जागांचा निकाल हाती लागले आहेत. नाशिकमध्ये शिंदेंची शिवसेना सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे ११ पैकी तब्बल ५ जागांवर नगराध्यक्ष विजयी झाले आहेत. भाजप आणि अजित पवारांची राष्ट्रवादी प्रत्येकी ३ जागांसह दुसऱ्या स्थानाव आहे. अजित पवारांची राष्ट्रवादी आणि भाजप यांना प्रत्येकी ३ नगराध्यक्षपदाच्या जागांवर विजय मिळवण्यात यश आलं आहे. नाशिक जिल्ह्यात महाविकास आघाडीला एकाही जागेवर आपला नगराध्यक्ष निवडून आणता आलेला नाही.



# मुख्यमंत्र्यांच्या होम पिचवर भाजपची विजयी घौडदौड



**नागपूर :** संपूर्ण राज्याचे लक्ष लागून राहिलेल्या उपराजधानी नागपूर आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या होम पिचवर भाजपनं नगरपरिषद, नगरपंचायतींसाठीची निवडणुकीत दमदार कामगिरी केलीय. यात २७ पैकी २१ नगरपरिषद आणि नगरपंचायतीमध्ये भाजपने दणदणीत विजय मिळवला आहे. त्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळेसह भाजपसाठी प्रतिष्ठेच्या ठरलेल्या नागपूर जिल्ह्यातील निवडणुकीत भाजपने विजयी घोडदौड कायम ठेवली आहे. सध्या ठीकठिकाणी मतमोजणी केंद्रावर भाजप कार्यकर्त्यांचा उत्साह शिगेला पोहोचला आहे. विविध मतमोजणी केंद्रातून भाजपचे विजयी उमेदवार आणि त्यांचे समर्थक जल्लोष करत बाहेर पडत आहे. एकूणच या विजयाने आगामी निवडणुकांसाठी भाजपचा विश्वास दुणावला आहे. पुढे आलेल्या पहिल्या कलानुसार २७ नगरपरिषदेत भाजपने नागपुरात २१ जागांवर, तर शिंदेंच्या शिवसेनेनं २ जागी विजय मिळवला आहे. तर काँग्रेस अवघ्या ३ जागांवर आघाडीवर आहे. दुसरीकडे राष्ट्रवादी (अजित पवार गट), राष्ट्रवादी (शप गट) आणि ठाकरेंच्या शिवसेनेला अद्याप खातेही उघडता आलेलं नाहीये.

### काँग्रेस खासदाराच्या प्रभागातच धोबीपछाड

# घराणेशाहीला मतदारांनी नाकारलं

**नांदेड :** राज्यात नगरपंचायत आणि नगरपरिषद निवडणुकीसाठी मतमोजणी सुरू आहे. अनेक ठिकाणी निकाल जाहीर झाले आहे. तर काही ठिकाणी अजूनही मतमोजणी सुरू आहे. पण, राज्यातील अशा काही ठिकाणी धक्कादायक निकाल लागले आहे. नांदेड जिल्ह्यातील लोहा नगरपालिका निवडणुकीत मतदारांनी घराणेशाहीला नाकारलं आहे. भाजपचे नगराध्यक्षपदाचे उमेदवार गजानन सूर्यवंशी यांच्यासह परिवारातील सर्व सहा उमेदवारांचा पराभव झाला आहे.

### भाजप उमेदवारासह घरातील ६ जणांना लोकांनी पाडलं!

नांदेड जिल्ह्यातील लोहा नगरपंचायत निवडणुकीत भाजपच्या घराणेशाहीला मतदारांनी नाकारलं आहे. लोहा नगरपंचायतीमध्ये भाजपचे नगराध्यक्षपदाचे उमेदवार गजानन सूर्यवंशी यांच्यासह परिवारातील सर्व सहा उमेदवारांचा पराभव झाला आहे. नगराध्यक्षपदासाठी गजानन सूर्यवंशी रिंगणात होते. तर पत्नी गोदावरी गजानन सूर्यवंशी (प्रभाग ७ अ), भाऊ सचिन सूर्यवंशी (प्रभाग क्रमांक १ अ), भावाची पत्नी सुप्रिया सचिन सूर्यवंशी (प्रभाग ८ अ), मेव्हुणा युवराज वसंतराव वाघमारे (प्रभाग क्रमांक ७ ब) तर भाच्याची पत्नी रिना अमोल व्यवहारे (प्रभाग क्रमांक ३) मधून निवडणूक लढवत होते. हे सहाही उमेदवार पराभूत झाले आहे.



लोह्यात अजित पवार यांच्या राष्ट्रवादीचे उमेदवार शरद पवार यांचा विजयी झाला आहे. लोहा नगरपालिकेसाठी राष्ट्रवादीच्या १७ जागा तर उद्धव ठाकरे गट, भाजप आणि काँग्रेसला प्रत्येकी एका जागेवर विजयी झाले आहे. आमदार चिखलीकरांनी मतदारसंघातील लोहा नगरपालिका राखली तर कंधारमध्ये पराभव झाला आहे. शिवाय अन्य मतदारसंघात महायुतीच्या आमदारांची प्रतिष्ठापणाला लागली आहे. धर्माबाद नगरपरिषदेत बोगस मतदारांना डांबून ठेवण्याचा प्रकार घडला होता. मतदारांना पैसे वाटपाचा प्रकारे उघड झाला होता. त्यामुळे धर्माबादच्या निकालाकडे लक्ष लागलं आहे.

# मोहोळमध्ये सिद्धी वस्त्रे २२ व्या वर्षी नगराध्यक्षा



**सोलापूर :** महाराष्ट्रातील २८८ नगरपरिषद तसेच नगरपंचायतींच्या निवडणुकात अनेक धक्कादायक निकाल लागले आहेत. यापैकी सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ नगरपरिषदेच्या निकालाची राज्यात चर्चा होत आहे. मोहोळमध्ये एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडून लढणाऱ्या रणरागिणीने अवघ्या २२ व्या वर्षी नगराध्यक्षपद मिळवले आहे.

मोहोळ नगरपरिषदेच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाला मोठा धक्का बसला आहे. अत्यंत अटीतटीच्या झालेल्या या लढतीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेने बाजी मारली आहे. शिवसेनेच्या उमेदवार सिद्धी वस्त्रे यांनी भाजपच्या अनुभवी उमेदवार शीतल क्षीरसागर यांचा १७० मतांनी पराभव करत नगराध्यक्षपदाला गवसणी घातली आहे. विशेष म्हणजे, सिद्धी वस्त्रे या केवळ २२ वर्षांच्या असून, राज्यातील सर्वात तरुण नगराध्यक्षांपैकी एक ठरल्या आहेत. विजयानंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना सिद्धी वस्त्रे यांनी जनतेचे आभार मानले. जनतेने दिलेला हा कौल माझ्यावरील विश्वास दर्शवतो. निवडणुकीच्या काळात अनेक टीका झाल्या, पण आजचा निकाल हेच त्या टीकेला उत्तर आहे.

# बांगलादेशात सत्ता बदलानंतर इस्लामिक जिहादी कारवायांत वाढ : बजरंगजी बागडा

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर :** बांगलादेशात सत्ता परिवर्तनानंतर इस्लामिक जिहादी कारवायांमध्ये सातत्याने वाढ होत असून, त्यांचे थेट लक्ष्य हिंदू मंदिरे, व्यापारी केंद्रे, महिला, मालमत्ता, सरकारी कर्मचारी तसेच पत्रकार आहेत, असा गंभीर आरोप विश्व हिंदू परिषदेचे महामंत्री बजरंगजी बागडा यांनी केला आहे.

बागडा म्हणाले की, बांगलादेशात दर आठवड्याला हिंदू समाजाविरोधात छळ आणि अत्याचाराच्या भीषण घटना समोर येत आहेत. गेल्या आठवड्यात मैमनसिंग जिल्ह्यातील भालुका येथे घडलेली घटना ही संपूर्ण मानवतेला काळिमा फासणारी असून, ती अत्यंत चिंताजनक आहे. दिपू दास नावाच्या एका सामान्य हिंदू कामगारावर ईशनिंदेचा खोटा आरोप करण्यात आला. एका अनौपचारिक संभाषणात त्याने कोणताही कुराण, इस्लाम किंवा अल्लाहचा उल्लेख न करता केवळ देवाच्या एकतेविषयी आणि विविध नावांविषयी मत व्यक्त केले होते. मात्र, या विधानाचा जाणीवपूर्वक विपर्यास करून त्याच्यावर ईशनिंदेचा आरोप लावण्यात आला. त्यानंतर जिहादी घटकांनी मोठ्या जमावाच्या माध्यमातून दिपू दास याला अमानुषपणे मारहाण करून ठार केले. दहशत निर्माण करण्याच्या उद्देशाने त्याचा मृतदेह झाडाला लटकवून जाळण्यात आला आणि या संपूर्ण हिंसक घटनेचे व्हिडिओ तत्काळ सोशल मीडियावर प्रसारित करण्यात आले. ही घटना पोलिस प्रशासनाच्या उपस्थितीत घडली असूनही ती रोखण्यासाठी कोणतीही प्रभावी कारवाई करण्यात आली नाही, असा आरोपही त्यांनी केला.

हिंदू धर्माविरोधात सुरू असलेल्या या हिंसक आणि क्रूर इस्लामिक जिहादी कारवायांकडे बांगलादेशचे प्रशासन आणि समाज जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याचे चित्र दिसत आहे. अल्पसंख्याकांच्या मानवी हक्कांचे असे उघड उल्लंघन कोणत्याही सुसंस्कृत समाजात मानवतेविरोधातील गंभीर गुन्हा असल्याचे बागडा यांनी स्पष्ट केले.

या पार्श्वभूमीवर हिंदूविरोधी हिंसाचार तात्काळ थांबवावा, दोषींवर कठोर कारवाई करून त्यांना शिक्षा द्यावी तसेच बांगलादेशातील अल्पसंख्याकांसाठी भयमुक्त आणि शोषणमुक्त वातावरण निर्माण करावे, या मागणीसाठी आगामी दोन ते तीन दिवसांत प्रत्येक प्रांतीय व जिल्हा मुख्यालयात निदर्शने आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या आंदोलनात बजरंग दल, दुर्गा वाहिनी तसेच संपूर्ण हिंदू समाजाने मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन विश्व हिंदू परिषदेचे महामंत्री बजरंगजी बागडा यांनी केले आहे.

# भारतीय रेल्वेकडून भाडेवाढ

**नवी दिल्ली :** भारतीय रेल्वेनं रेल्वे प्रवास भाड्यात वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबतची घोषणा रेल्वे मंत्रालयाकडून आज करण्यात आली आहे. रेल्वेनं नव्य दरांची अंमलबजावणी येत्या २६ डिसेंबरपासून करण्यात येणार असल्याचं म्हटलं. रेल्वेचा खर्च आणि प्रवाशांवरील खर्चाचा भार याचं संतुलन साधण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचं भारतीय रेल्वेनं म्हटलं. भारतीय रेल्वेनं उपनगरीय सेवा आणि मासिक सिझन तिकीटाच्या दरात वाढ केलेली नाही. याशिवाय ऑर्डिनरी क्लास म्हणजेच जनरल तिकीटावर प्रवास करणाऱ्यांसाठी २१५ किमीपर्यंत कोणतेही दर वाढवण्यात आलेले नाहीत.

### २६ डिसेंबरपासून नवे दर लागू; सहा महिन्यात दुसऱ्यांदा भाड्यात वाढ

जनरल तिकीटाचे दर २१५ किमीपासून पुढील अंतरासाठी प्रति किलोमीटर १ पैसा अशा प्रकारे वाढवण्यात आले आहेत. मेल आणि एक्सप्रेस नॉ एसीसाठी २ पैसे प्रति किमीची वाढ करण्यात आली आहे. तर, वातानुकुलित डब्यातून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना प्रति किमी २ पैसे अधिक मोजावे लागतील. रेल्वेनं प्रवास भाडेवाढ करताना आर्थिक स्थिती समोर मांडली आहे. प्रवास भाडे वाढवल्यानं रेल्वेला या वर्षात ६०० कोटी रुपये मिळणार आहेत. ५०० किलोमीटर पर्यंतच्या अंतरात नॉन एसी कोचमधून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना १० रुपये अधिक द्यावे लागतील.

गेल्या १० वर्षात रेल्वेनं नेटवर्क आणि पायाभूत सुविधा वढवल्या आहेत. चांगल्या प्रकारची सेवा देण्यासाठी आणि सुरक्षा वाढवण्यासाठी मनुष्यबळ वाढवण्याची गरज आहे. मनुष्यबळात वाढ केल्यानं खर्च १,१५,००० कोटी रुपयांनी वाढला आहे. पेन्शनवरील खर्च देखील ६० हजार कोटींनी वाढला आहे. २०२४–२५ मधील रेल्वे चालवण्याचा खर्च २६३००० कोटी रुपये झाला आहे.

रेल्वेनं वाढता मनुष्यबळ खर्च भागवण्यासाठी मालवाहतूक वाढवण्याकडे लक्ष दिलं आहे. त्यामुळं प्रवास भाडं कमी प्रमाणात वाढवण्यात आल्याचं रेल्वेनं म्हटलं आहे. या प्रयत्नांमुळं सुरक्षा वाढेल आणि रेल्वे सेवेची गुणवत्ता वाढेल. जगातील रेल्वे मालवाहतुकीत भारताचा दुसरा क्रमांक असल्याचं रेल्वेनं म्हटलं आहे.

भारतीय रेल्वेनं काही दिवसांपूर्वी दिवाळी आणि इतर सणांच्या कालावधीत १२००० पेक्षा अधिक विशेष फेस्टिवल ट्रेन चालवल्याचं म्हटलं आहे. भारतीय रेल्वेनं २०२५ मध्ये दुसऱ्यांदा प्रवास भाडे वाढवलं आहे.

## थोडक्यात...

### राष्ट्रवादीच्या शिलेदाराचा १ मताने विजय

**पुणे :** राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा पहिला निकाल समोर आला आहे. यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवारांच्या शिलेदाराने बाजी मारली आहे. वडगावच्या मावळ नगरपंचायतीमध्ये हा पहिला निकाल लागला आहे. यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे राहुल ढोरे हे निवडून आले आहेत. राहुल ढोरे हे राष्ट्रवादीच्या नगरसेवक पदाचे उमेदवार होते, त्यांनी अवघ्या एका मताने निवडणूक जिंकत सर्वांनाच धक्का दिला आहे.

### अवघ्या ६ मतांनी गुलाल उधळला

**कोल्हापूर :** कोल्हापूर जिल्ह्यातील पन्हाळा नगर परिषदेमध्ये जनसुराज्यचे २, तर भाजपचे २ उमेदवार विजयी झाले आहेत, तर एका अपक्ष उमेदवाराने बाजी मारली आहे. धक्कादायक म्हणजे अपक्ष उमेदवाराने जनसुराज्य पक्षाच्या उमेदवाराला पराभवाचा धक्का दिला आहे. पन्हाळा येथील माजी नगराध्यक्षा रूपाली धडेल यांचे पती आणि जनसुराज्य पक्षाचे उमेदवार रवींद्र धडेल यांचा धक्कादायक पराभव झाला आहे. अवघ्या ६ मतांनी त्यांना पराभवाची धूळ चारली आहे. अपक्ष उमेदवार महेश भाडेकर विजयी झाले.

### धारुरमध्ये भाजपचे सर्व उमेदवार हरले

**बीड :** महाराष्ट्र स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक २०२५ चे निकाल जाहीर झाले असून, यात अनेक ठिकाणी महत्त्वपूर्ण राजकीय बदल दिसून आले आहेत. बीड जिल्ह्यातील धारुरमध्ये भाजप नेत्या पंकजा मुंडे यांना मोठा धक्का बसला आहे. धारुरमध्ये भाजपचे सर्व उमेदवार पराभूत झाले असून, अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस गटाचे प्रकाश सोळंके यांनी येथे वर्चस्व मिळवले आहे. या निकालांमध्ये अनेक दिग्गजांना धक्का बसल्याचे चित्र आहे.

### धनंजय मुंडे यांच्या वर्चस्वाला धक्का

**बीड :** बीडमधील नगर परिषद, नगर पंचायत आणि नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीचे निकाल हाती येऊ लागले असून इथे धक्कादायक चित्र पहायला मिळत आहे. बीडमधून अजित पवारांना मोठा धक्का बसला आहे. बीडमध्ये अजित पवारांच्या नगराध्यक्ष पदाचा उमेदवार तिसऱ्या क्रमांकावर गेल असून भाजपचीच आघाडी दिसत आहे. तसेच बीडच्याच गेवराई नगरपरिषदेतही भाजपच्याच उमेदवाराचा डंका वाजत असून तो आघाडीवर आहे. बीड जिल्ह्यात भाजपचेच वर्चस्व दिसत असून सर्वत्र भारतीय जनता पक्षाचेच उमेदवार आघाडीवर आहे. त्यामुळे बीडमध्ये हा धनंजय मुंडे यांच्यासाठी आणि पर्यायाने अजित पवारांसाठी मोठा धक्का मानला जात आहे.

### साताऱ्यात राजेंना मोठा धक्का

**सातारा :** साताऱ्याच्या फलटण तालुक्याच्या राजकारणात राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते रामराजे नाईक निंबाळकर आणि भाजपचे नेते रणजितसिंह नाईक निंबाळकर यांच्यातील विरोध सर्वश्रूत आहे. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीनंतर आता फलटण नगरपालिकेच्या निवडणुकीत हे दोन्ही नेते एकमेकांविरोधात उभे ठाकले होते. रणजितसिंह नाईक निंबाळकर यांचे बंधू समशेरसिंह हे भाजपकडून नगराध्यक्ष पदासाठी उभे राहिले होते. तर त्यांच्या विरोधात माजी सभापती रामराजे नाईक निंबाळकर यांचे चिरंजीव अनिकेतराजे शिंदेसेनेकडून नगराध्यक्ष पदाच्या रिंगणात उभे होते. या निकालाकडे सर्वांचं लक्ष लागलं होतं, आत्तापर्यंत हाती आलेल्या निकालानुसार, फलटण नगरपरिषदेमध्ये कमळ फुलले आहे. फलटणमध्ये रामराजेंच्या सत्तेला धक्का बसला आहे. रामराजे नाईक निंबाळकर यांचे चिरंजीव अनिकेतराजे नाईक निंबाळकर यांचा पराभव झाला आहे.

### शहाजीबापू पाटलांनी राखला गड

**सांगोला :** सांगोला नगरपरिषद निवडणुकीच्या निकालांमध्ये शिंदे गटाचे आमदार शहाजीबापू पाटील यांच्या पॅनेलने दैदिप्यमान विजय संपादन केला आहे. त्यांचे उमेदवार आनंद माने यांनी दुसऱ्या फेरीतच निर्णायक आघाडी घेतल्याने विजयाची निश्चिती झाली. या महत्त्वपूर्ण विजयानंतर बोलताना शहाजीबापू पाटील यांनी सांगोला शहरवासीयांनी शिवसेनेवर (शिंदे गट) दाखवलेल्या विश्वासाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रचाराचा नारळ फोडल्याचे सांगत, शिंदे साहेबांना जनतेचे पाठबळ असल्याची भावना या विजयामुळे अधिक दृढ झाल्याचे त्यांनी सांगितले. या निवडणुकीत पाटील यांच्या विरोधात सर्वच प्रमुख पक्षांनी एकत्र येत युती केली होती, ज्यामुळे त्यांना एकट्याने लढा द्यावा लागला. मात्र, या एकतर्फी लढ्याला जनतेने पाठिंबा दिल्याचे पाटील यांनी नमूद केले.

### सांगलीत जयंत पाटलांनी गड राखला

**सांगली :** सांगली जिल्ह्यामध्ये अवघ्या राज्याचे लक्ष लागून राहिलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते जयंत पाटील यांनी आपला बालेकिल्ला राखताना उरण ईश्वरपूर नगरपरिषदेमध्ये एकहाती सत्ता मिळवत विरोधकांना धोबीपछाड दिला आहे. जयंत पाटील यांना गेल्या काही दिवसांपासून कडवे आव्हान देण्याचा प्रयत्न झाला होता. मात्र, या निवडणुकीत जयंत पाटील यांनी नगराध्यक्ष पदासह २३ जागा जिंकत विरोधकांचा करेक्ट कार्यक्रम झाला आहे.

लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## महानगरपालिका निवडणूक ३७५ मतदान केंद्रांवर होणार मतदान

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २१ डिसेंबर :** होऊ घातलेल्या लातूर शहर महानगरपालिकेच्या तिसऱ्या सार्वत्रिक निवडणुकीत एकूण ३७५ मतदान केंद्रांवर मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. मागच्या मनपा निवडणुकीच्या तुलनेत यावेळी मतदान केंद्रांच्या संख्येत चार ची भर पडली आहे. मनपा प्रशासन या निवडणुकीसाठी सज्ज झाले आहे.लातूर शहर मनपाची यावेळचीनिवडणूक लक्षवेधी ठरण्याची शक्यता वर्तवली जात आहे. मागच्या निवडणुकीच्या दरम्यान शहरात असणाऱ्या मतदारांच्या संख्येत आता ४० हजार मतदारांची वाढ झाली आहे. वाढ झालेला मतदार हा तरुण - नव मतदार आहे. तरुणवर्ग ज्याच्या पाठीशी राहील त्या राजकीय पक्षाला विजयाची अधिक संधी असणार आहे. मनपा निवडणुकीसाठी मनपा प्रशासन सज्ज झालेआहे. साडेतीन वर्षांपासून प्रशासकराज असणाऱ्या लातूर शहर मनपाला येत्या जानेवारीमध्ये नूतन पदाधिकारी मिळणार आहेत. त्यादृष्टीने सर्वचराजकीय पक्ष कामाला लागले आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थेची ही निवडणूक महायुती आणि महाविकास आघाडीच्या वतीने एकत्रित लढवण्यात येणार असल्याचे सांगितले जात आहेत. त्यामुळे या निवडणुकीत शेवटच्या क्षणाला नाराज कार्यकर्त्यांकडून बंडाचे निशाण फडकावले जाण्याची शक्यताही बळावल्याचे दिसून येत आहे.



# जिल्ह्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भाजपाची सरशी

## पाच पैकी चार नगराध्यक्षपदावर भाजपाचे उमेदवार विजयी । निलंगा, उदगीर, अहमदपूर व रेणापूरमध्ये भाजप

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २१ डिसेंबर :** लातूर जिल्ह्यात पार पडलेल्या चार नगर परिषद आणि एका नगर पंचायत निवडणुकीपैकी औसा नपचा अपवाद वगळता अन्य ठिकाणी भारतीय जनता पार्टीची सरशी झाल्याचे पाहावयास मिळाले. या निकालाकडे लातूर शहर महानगरपालिका निवडणुकीची रंगीत तालीम म्हणून पाहिले जात होते. एकंदर परिस्थितीवरून मतदार विकास कामांना प्राधान्य देण्याच्या दृष्टीने पूर्णतः भारतीय जनता परिचय पाठीशी असल्याचेच पाहावयास मिळाले. या निकालाचे परिणाम निश्चितच येणाऱ्या मनपा आणि जिल्हा परिषद-पंचायत समिती निवडणुकीवर होतील, असाही तर्क लावला जात आहे.

कधीकाळी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचा अभेद्य गड असलेला लातूर जिल्हा मागच्या काही वर्षात भाजपचा बालेकिल्ला बनू पाहत आहे. भाजपाकडे पाहण्याची मतदारांची धारणा आता पुरती बदलली आहे. राज्यात आणि देशात एकाच पक्षाचे सरकार असल्यास त्याचा विकासकामांवर चांगला परिणाम होतो,

या बाबी आता कोणी सामान्य नागरिकांना समजावून सांगण्याची आवश्यकताच राहिलेली नाही. आजचा मतदार सुज्ञ आणि चाणाक्ष झाला आहे. त्याला चांगल्या-वाईटाची चांगली जाण आहे. त्यामुळे निवडणूक प्रचारादरम्यान कोणी-कितीही प्रक्षोभक वक्तव्ये केली वा मतदारांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला तरीही मतदार आपल्याला जे करायचे आहे तेच करण्यास प्राधान्य देतात, असे या निकालाकडे पाहून लक्षात येते.

उदगीर नगर परिषदेच्या अध्यक्षपदी भाजपच्या स्वाती सचिन हुडे या विजयी झाल्या. त्यांनी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या खादरी अंजुम फातेमा सय्यद अब्दुलाह यांचा पराभव केला. अहमदपूर नगर परिषदेच्या अध्यक्षपदी भाजपचे स्वप्नील महारुद्र व्हत्ते विजयी झाले. त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे अभय मिरकले यांचा पराभव केला. निलंगा नपमध्ये भाजपच्या संजयराज प्रमोद हलगरकर यांनी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या शेख हमीद इब्राहिम यांचा पराभव केला. औसा नपमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या परवीन नवाबोद्दीन शेख या निवडून आल्या. त्यांनी भाजपच्या ज्योती महादेव बनसुडे यांचा पराभव केला. रेणापूर नगर पंचायतमध्ये भाजपच्या शोभा श्यामराव आकनगिरे या नगराध्यक्षपदी निवडून आल्या. त्यांनी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या अर्चना प्रदीप माने यांचा पराभव केला.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ओबीसी आरक्षणाच्या मुद्यावरून बराच काळ रखडल्या होत्या. या निवडणुका कोणत्याही परिस्थितीत येत्या ३१ जानेवारी २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे स्पष्ट आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले होते. न्यायालयाच्या आदेशान्वये या निवडणुका एकूण तीन टप्प्यात पूर्ण केल्या जात आहेत. नगर परिषद-नगर पंचायतचा हा पहिला टप्पा आज पार पडला.

दुसऱ्या टप्प्यात आता मनपाच्या निवडणुका होणार आहेत. जिल्ह्यात झालेल्या या एकूण पाच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निकालाकडे जिल्हाभरातील मतदारांचे लक्ष लागले होते. या निवडणुकीच्या निकालावर लातूर मनपाच्या निकालाचा अंदाज वर्तवला जात होता.

पाच पैकी चार ठिकाणी भाजपचे वर्चस्व सिद्ध झाल्याने लातूर मनपाचा निकालही फारसा वेगळा राहणार नाही, अशा प्रतिक्रिया सुजाण नागरीकातून व्यक्त केल्या जात आहेत.या निकालाचे परिणाम लातूर शहर महानगरपालिकेच्या निवडणुकीवर कितपत होणार? हा आता खऱ्या अर्थाने औत्सुक्याचा विषय होताना दिसत आहे.

मनपा निवडणुकीसाठी दि. २३ डिसेंबरपासून नामनिर्देशनपत्रे दाखल केली जाणार आहेत. त्यामुळे येत्या तीन चार दिवसात कोणत्या पक्षाकडून कोणता चेहरा उमेदवार म्हणून पुढे केला जातोय त्याकडेही आता मतदारांचे लक्ष लागून राहिले आहे. जिल्ह्यातील अन्य स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या तुलनेत लातूर शहर मनपाची निवडणूक अतिशय चुरशीची, अटीतटीची होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

# वकिलांचे प्राथमिक कर्तव्य हे न्याय सुनिश्चित करणे : प्रशांत भूषण

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २१ डिसेंबर :** दयानंद शिक्षण संस्थेच्या दयानंद विधी महाविद्यालयास सर्वोच्च न्यायालयातील ज्येष्ठ विधिज्ञ प्रशांत भूषण यांनी दिनांक २१ डिसेंबर २०२५ रोजी भेट दिली. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना अमुल्य असे मार्गदर्शन केले.

विद्यार्थ्यांना संबोधित करताना ॲड. प्रशांत भूषण म्हणाले की, तुम्ही कायद्याच्या क्षेत्रातील न्यायासाठी लढणारे योद्धे आहात. वकील झाल्यानंतर तुमचे प्राथमिक कर्तव्य न्याय सुनिश्चित करणे हे आहे.

यावेळी त्यांनी सध्याच्या परिस्थितीत न्यायव्यवस्था धोक्यात असून ती पूर्णपणे स्वतंत्र राहिलेली नाही अशी चिंता व्यक्त केली. तसेच प्रत्येक वकिलाची प्राथमिक जबाबदारी ही नागरिकाचे मूलभूत हक्क संरक्षित करणे तसेच जलद गतीने न्याय मिळण्यासाठी न्यायव्यवस्थे मध्ये नेतृत्व करणे हे असल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले.




व्यासपीठावर दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, सहसचिव ड श्रीकांत उटगे, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य ड. आशिष बाजपाई, सुदर्शन भांगडिया यांच्यासह महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पुनम नाथानी, तसेच दयानंद शिक्षण संस्थेच्या इतर महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा डॉ. शुभांगी पांचाळ यांनी केले.

# भाजपा युवा मोर्चा लातूर शहर जिल्हा उपाध्यक्षपदी शंकर नागभुजंगे

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २१ डिसेंबर :** भाजप लातूर शहर युवा मोर्चाच्या उपाध्यक्षपदी शंकर नागभुंजगे यांची निवड करण्यात आली आहे. भाजप युवा मोर्चाची लातूर शहर जिल्हा कार्यकारणी जाहीर करण्यात आली आहे.



भारतीय जनता पार्टी महाराष्ट्राचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या आदेशाने, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली तसेच लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनात आणि मराठवाडा संघटन मंत्री संजय कौडगे, आ. संभाजी पाटील निलंगेकर, आ. अभिमन्यू पवार, आ. रमेश आप्पा कराड व लातूर शहर जिल्हा अध्यक्ष अजित पाटील कव्हेकर, भाजपा नेत्या डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर, शैलेश लाहोटी, गुरुनाथ मगे, देविदास काळे यांच्या प्रमुख उपस्थितीत भाजपा युवा मोर्चा लातूर शहर जिल्हा कार्यकारणी जाहीर करण्यात आली.

या कार्यकारिणीत निवड झालेल्या सर्व नवनियुक्त पदाधिकारी यांचे सर्व मान्यवरांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.


# शिवराज पाटील चाकूरकर यांना लातूरकरांच्या वतीने श्रद्धांजली

## दयानंद सभागृह येथे मंगळवारी श्रद्धांजली सभेचे आयोजन

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २१ डिसेंबर :** विद्वत्ता आणि नैतिक मूल्यांचे प्रतीक म्हणून ओळख असलेले माजी केंद्रिय गृहमंत्री व पंजाबचे माजी राज्यपाल शिवराज पाटील चाकूरकर यांचे १२ डिसेंबर रोजी निधन झाले. त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी लातूरकरांच्या वतीने सभा आयोजित करण्यात आली आहे. ही श्रद्धांजली सभा मंगळवारी (दि . २३) सायंकाळी ४ वाजता दयानंद सभागृह येथे होणार आहे.

लातूरचे नगराध्यक्ष, आमदार, मंत्री, खासदार, केंद्रिय मंत्री, लोकसभेचे सभापती, राज्यपाल अशी विविध पदे भूषवत असताना शिवराज पाटील चाकूरकर यांनी राजकारणात कायम नैतिकता जपली. मूल्यांना महत्त्व दिले. सुसंस्कृत राजकारणाचा, निष्कलंक



व्यक्तिमत्त्वाचा आदर्श घालून दिला. आपल्या प्रदीर्घ राजकीय, सामाजिक कारकिर्दीला प्रतिष्ठा मिळवून दिली. त्यांचे योगदान कायम स्मरणात राहणार आहे.

त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी मंगळवारी (ता. २३) दयानंद सभागृह येथे आयोजित करण्यात आलेल्या सभेस नागरिकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन पद्मभूषण डॉ. अशोक कुकडे, माजी कुलगुरू व माजी खासदार डॉ. जनार्दन वाघमारे, शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष व माजी खासदार डॉ. गोपाळराव पाटील, दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, अष्टविनायक प्रतिष्ठानचे संस्थापक प्रदीप राठी, महात्मा बसवेश्र्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ सांगवे, ड. धनंजय पाटील, इसाक नवाब पटेल, जयप्रकाश दगडे, राजेश्र्वर बुके आणि संयोजन समितीच्या वतीने केले आहे.

# नागनाथ वनकुद्रे : आत्मनिर्भर शेतीचा यशस्वी प्रयोगशील आदर्श

## मुख्य पिकासोबतच आंतरपिक घेवून करतात शेतीचा पुरेपूर वापर

**त.भा. वृत्तसेवा,**

**येरोळ, दि. २१ डिसेंबर :** येरोळ, ता. शिरूर अनंतपाळ येथील प्रगतिशील शेतकरी नागनाथ भगवान वनकुद्रे यांनी आपल्या कष्ट, कल्पकता आणि प्रयोगशीलतेच्या जोरावर आत्मनिर्भर शेतीची यशस्वी वाटचाल केली आहे. मर्यादित साधनसंपत्ती असूनही त्यांनी शेतीत नावीन्यपूर्ण प्रयोग राबवत परिसरातील शेतकऱ्यांसाठी प्रेरणादायी आदर्श निर्माण केला आहे.

नागनाथ वनकुद्रे यांनी आपल्या शेतामध्ये ८००५ या सुधारित जातीचा ऊस लागवड केला असून, त्या उसामध्ये आंतरपीक म्हणून घेवड्याची लागवड करून दुहेरी उत्पन्नाचा मार्ग अवलंबला आहे. उसासोबत घेतलेल्या आंतरपिकामुळे जमिनीचा पुरेपूर वापर होत असून उत्पन्नात लक्षणीय वाढ होत आहे.

शेतीला वन्यप्राण्यांपासून संरक्षण मिळावे यासाठी त्यांनी स्वतःच्या पाच लाख रुपयाच्या स्वखर्चातून तारेचे कुंपण उभारले आहे. यामुळे पिकांचे नुकसान थांबले असून शेतातील उत्पादन सुरक्षित आणि शाश्र्वत बनले आहे. त्यांच्या शेतात ऊस, घेवडा यासोबतच करडई हे पीकही घेतले जाते. याशिवाय त्यांनी दीर्घकालीन उत्पन्नाचा विचार करून शेवगा व आंबा यांसारख्या फळझाडांची लागवड केली आहे. कमी पाण्यात चांगले उत्पादन देणारी ही झाडे त्यांच्या शेतीला आर्थिक स्थैर्य देत आहेत. विविध पिकांचे नियोजन, पाणी व्यवस्थापन आणि खर्च नियंत्रण यामुळे




त्यांची शेती खऱ्या अर्थाने आत्मनिर्भर बनली आहे.

नागनाथ वनकुद्रे हे केवळ पारंपरिक शेतीपुरते मर्यादित न राहता नवनवीन प्रयोग करणारे प्रयोगशील शेतकरी म्हणून परिसरात ओळखले जातात. त्यांच्या शेतीकडे पाहण्यासाठी व मार्गदर्शन घेण्यासाठी आजूबाजूच्या गावांतील अनेक शेतकरी येतात. आजच्या काळात वाढते उत्पादन खर्च, पाण्याची टंचाई आणि अस्थिर बाजारपेठ यामध्येही स्वतःच्या बुद्धी, मेहनत आणि आत्मविश्र्वासाच्या जोरावर शेती कशी यशस्वी करता येते, याचे जिवंत उदाहरण म्हणजे नागनाथ भगवान वनकुद्रे यांची शेती आहे. त्यांच्या या आत्मनिर्भर शेतीच्या वाटचालीमुळे अनेक शेतकऱ्यांना नवी दिशा आणि नवी उमेद मिळत आहे.




# सुल्लाळीकर-चाकूरकरांच्या स्मरणार्थ काळे वैद्यकीय महाविद्यालयास सोलर ड्रायर

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २० डिसेंबर :** दिवंगत एड. शिवराज पाटील सुल्लाळीकर व माजी केंद्रीय गृहमंत्री स्व. शिवराज पाटील चाकूरकर यांच्या स्मरणार्थ डॉ. सुवर्णा डिगोळे, गितांजली पाटील, चुरी,अमेरिका यांच्या वतीने लातूरच्या कै. बी.व्ही. काळे आयुर्वेद वैद्यकीय महाविद्यालयास सोलर ड्रायर मोफत भेट देण्यात आला.

याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आनंद पवार, डॉ. सुमोल पवार, डॉ. मुळजे, डॉ. चव्हाण, डॉ. निरगुडे, डॉ. महेंद्रकर, डॉ. नरहरे, डॉ. नाईकवाडे, डॉ. पुरी, डॉ. देशमुख, डॉ. नंदनवनकर, डॉ. खानापूरकर, डॉ.उषा गिरीश ब्याळे आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

# वेद मंत्रोच्चारात पार पडला स्वामी दुर्गानंद गिरी महाराजांचा समाधी सोहळा

**त.भा. वृत्तसेवा,**


**लातूर, २१ डिसेंबर :** आपले संपूर्ण जीवनच राष्ट्रीय स्वयंसेवक संघास समर्पित केलेले मूळचे दुर्गानंद वासुदेव नाडकर्णी उर्फ स्वामी दुर्गानंद गिरी महाराजांचा समाधी सोहळा वेद मंत्रोच्चारात सोमवारी रात्री उशिरा औसा तालुक्यातील वानवडा येथील प्रा. उमाकांत होनराव यांच्या शेतात पार पडला.

स्वामी दुर्गानंद गिरी महाराजांचे लातुरातील विवेकानंद रुग्णालयात सोमवार दि. २० डिसेंबर २०२५ रोजी रात्री १२ वाजून २१ मिनिटांनी वयाच्या ८९ व्या वर्षी निधन झाले. स्वामी दुर्गानंद गिरी महाराजांचा जन्म १९३६ साली कारवार जिल्ह्यातील अंकोला येथे झाला होता. सन १९४२ मध्ये त्यांचा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी संपर्क आला.

उच्च शिक्षणासाठी ते मुंबईत आले आणि सन १९६० मध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रचारक म्हणून त्यांनी पूर्णवेळ कार्यास प्रारंभ केला. त्यांनी रा.स्व.सं.चे रत्नागिरी विभाग प्रचारक, मुंबई महानगर प्रचारक तसेच कोल्हापूर विभाग प्रचारक म्हणून विविध महत्त्वपूर्ण जबाबदाऱ्या समर्थपणे पार पाडल्या. तसेच सुमारे नऊ वर्षे 'हिंदू एकजूट' या कार्यात त्यांनी सक्रिय योगदान दिले आहे.

राम जन्मभूमी आंदोलनात स्वामी दुर्गानंद गिरी यांनी सक्रिय सहभाग नोंदविला. तसेच तामिळनाडूतील मीनाक्षीपुरम येथे घडलेल्या सामूहिक धर्मांतराच्या घटनेविरोधातील आंदोलनातही त्यांनी ठाम भूमिका घेत सक्रिय सहभाग घेतला. दरम्यानच्या काळात त्यांनी ऋषिकेश येथे संन्यास दीक्षा स्वीकारून 'पूज्य दुर्गानंद गिरी महाराज' हे नाव धारण केले.

सन १९९९ पासून ते लातूर येथे वास्तव्य करीत होते. ते अत्यंत कष्टाळू व साधे जीवन जगले.तहसील स्तरापासून ते प्रांत स्तरापर्यंत त्यांनी अनेक जबाबदाऱ्या सांभाळल्या. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या



असंख्य स्वयंसेवक व कार्यकर्त्यांच्या जडण घडणीत, संगोपनात त्यांनी मोलाची भूमिका बजावली. गोव्याचे दिवंगत मुख्यमंत्री मनोहर पर्रीकर, श्रीपादजी नाईक, राज्याचे विद्यमान उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, भाजपाचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांसारखे असंख्य कार्यकर्ते त्यांच्या तालमीत घडले. त्यांच्या सहवास व संपर्कामुळे अनेक कुटुंबांवर त्यांचा संस्कार झाला असून आजही त्यांची आठवण आदराने केली जाते.

पूज्य दुर्गानंद गिरी महाराज यांच्या समाधी सोहळ्यासाठी नाशिकहून जयंत गायधनी, राम मंदीर प्रतिष्ठापनामध्ये सहभागी झालेले पं. दिनेश गायधनी, संतोष दिक्षित, नाशिकच्या गोदावरी मंदिराचे पुजारी योगेश कवी, त्र्यंबकेश्वरचे राजाभाऊ लोहगावकर लातुरात दाखल झाले होते. एखाद्या मूर्तीच्या प्राणप्रतिष्ठापना सोहळ्यामध्ये ज्याप्रमाणे सर्व धार्मिक विधी, संस्कार पार पाडले जातात, अगदी त्याप्रमाणे दुर्गानंद महाराजांचा समाधीसोहळा चालला. त्यांच्या पार्थिवाचा विधिवत अभिषेक, पूजाअर्चा झाल्यानंतर समाधी पूर्ण झाला. हा सर्व विधी लातूरच्या रिलायन्स लातूर पॅटर्नचे प्रा. उमाकांत होनराव यांनी पूर्ण केला. कडाक्याच्या थंडीतही यावेळी स्वामी दुर्गानंद गिरी महाराजांचे अंत्यदर्शन घेण्यासाठी मान्यवरांनी गर्दी केली होती.

यावेळी औशाचे आमदार अभिमन्यू पवार, सुशिलदादा बाजपाई, विभाग प्रचारक राजेशजी संन्यासी, विवेकानंद फाउंडेशनचे डॉ. संतोष देशपांडे, द्रविड एज्युकेशन सोसायटी वाईचे डॉ. मुजुमदार, नाशिकचे कांचनताई खाडे, गौरव खाडे, विभाग संघचालक संजय अग्रवाल, सागर कारंजे, औसा तालुका संघ चालक डॉ. जगताप, प्रेरणा होनराव, ओंकार होनराव, भीमाशंकर राचट्टे, अप्पाराव कुलकर्णी, अशोक मठपती गुरुजी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## थोडक्यात...

### उज्जीवन स्मॉल फायनान्स बँकेचा आयव्हरी प्रोग्राम

**पुणे :** उज्जीवन स्मॉल फायनान्स बँकेने आज 'आयव्हरी' नावाचा एक बँकिंग उपक्रम सुरू केला, जो भारतातील उच्च-मध्यमवर्गीय ग्राहकांसाठी तयार करण्यात आला आहे. या अंतर्गत वैयक्तिक बँकिंग सेवेला जीवनशैलीशी संबंधित विशेषाधिकारांसह जोडले जाते, ज्यामुळे वर्धित व्यवहार क्षमता, जागतिक पोहोच आणि महत्त्वाचे बँकिंग व्यवहार तसेच सेवांवर शून्य-शुल्क बँकिंगची सुविधा मिळते. यासाठी मोठ्या प्रमाणात ग्राहकांची मते जाणून घेण्यात आली आहेत. त्यातूनच हा 'आयव्हरी' कार्यक्रम विकसित करण्यात आला आहे. हा कार्यक्रम अशा ग्राहकांसाठी आहे, जे त्यांना जशी जीवनशैली हवी आहे, त्याच्याशी जुळणाऱ्या आर्थिक समाधानांच्या शोधात आहेत. डिजिटल बँकिंगसोबतच मनोरंजन आणि जेवणाचे फायदे यांसारखे निवडक अनुभव ही सेवा देते.

### सादर करत आहे पवित्र अष्टविनायक कथा

**मुंबई :** गणेश कथा पिढ्यान् पिढ्या मौखिक परांपरेतून जिवंत राहिल्या आहेत. आजी-आजोबा खूप भक्तीने, सोप्या शब्दांत आणि प्रेमळ स्वरात या कथा आपल्या नातवंडांना सांगत असतात. भारतातील एक प्रसिद्ध मनोरंजन वाहिनी सोनी सब ही परंपरा पुढे नेत आजच्या पिढीला गणेश कथा सांगत आहे. 'गाथा शिव परिवार की - गणेश कार्तिकेय' या मालिकेत आता पुढील टप्प्यावर अष्टविनायक रूपांच्या कथा तितक्याच भक्तिभावाने सादर होणार आहेत.

### नॅशनल ऑटोमोबाइल ऑलिम्पियाड २०२५चे आयोजन

**छत्रपती संभाजीनगर :** टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम)ने कर्नाटकमधील बिदादी येथील त्यांच्या प्लांटमध्ये १७ डिसेंबर ते १९ डिसेंबर २०२५ पर्यंत नॅशनल ऑटोमोबाइल ऑलिम्पियाड (एनएओ) चे यशस्वीरित्या आयोजन केले. हा उपक्रम ऑटोमोबाइल स्किल्स डेव्हलपमेंट कौन्सिल (एएसडीसी) आणि टोयोटा टेक्निकल ट्रेनिंग इन्स्टिट्यूट (टीटीटीआय) यांच्यामधील सहयोगाला सादर करतो, जो स्किल इंडिया मिशनशी संलग्न आहे. या इव्हेण्टमध्ये भारत व यूएईमधील इयत्ता सहावी ते बारावीपर्यंतच्या १८८ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला, ज्यांना दोन्ही देशांमधील ९७० शाळांमधील १,३६,००० हून अधिक विद्यार्थ्यांच्या सुरूवातीच्या समूहामधून शॉर्टलिस्ट करण्यात आले.

### नवीन गाड्यांच्या आगमनाची निसानकडून घोषणा

**छत्रपती संभाजीनगर :** निसानची नवीन गेम-चेंजिंग सात-सीटर बी-एमपीव्ही ग्रॅव्हाइट या नावाने २०२६ च्या सुरुवातीला बाजारात उपलब्ध होईल. ब्रँडच्या भारतासाठी नवीन आणि धोरणात्मकरित्या तयार केलेल्या उत्पादन श्रेणीअंतर्गत आणले जाणारे हे पहिलेच उत्पादन आहे.आधुनिक भारतीय कुटुंबांसाठी उद्देशाने बनवलेली ग्रॅव्हाइट अपवादात्मक अद्वितीय प्रतिभा आणि बदल करता येण्याची क्षमता देते. ती किमतीबाबत जागरूक कुटुंबांसाठी सोयीची नव्याने व्याख्या करते आणि निसानच्या पुनरुज्जीवित उत्पादन पोर्टफोलिओच्या विस्ताराला गती देते.

### भगवान शंकराच्या भूमिकेत दिसणार अविनेश रेखी

**छत्रपती संभाजीनगर :** सोनी सबवरील 'गाथा शिव परिवार की - गणेश कार्तिकेय' ही पौराणिक मालिका भगवान शिवाच्या दिव्य परिवाराचे हृदयस्पर्शी चित्रण करून प्रेक्षकांचे मन जिंकत आहे. ही मालिका श्रद्धा आणि मूल्ये यांच्या कालातीत कथा सादर करते आणि ब्रह्मांडातील पहिल्या कुटुंबाच्या कहाण्या अशा दृष्टिकोनातून सादर करते, की त्या प्रेक्षकांना आपल्याशा वाटतात. या लोकप्रिय मालिकेला नवीन परिमाण देण्यासाठी सुपरिचित अभिनेता अविनेश रेखी आता शंकराच्या भूमिकेत दाखल होत आहे. या भव्य-दिव्य व्यक्तिरेखेतील बारकावे साकार करण्याचा त्याचा प्रयत्न असेल. जबरदस्त स्क्रीन प्रेझेन्स आणि भावनिक गहिरेपण याबद्दल ओळखला जाणारा अविनेश शंकराच्या भूमिकेत शक्ती आणि अथांग शांतता यांचा समतोल घेऊन येत आहे.

### राजनाथ वर्माच्या भूमिकेत फारूख सईद

**छत्रपती संभाजीनगर :** सोनी सबवरील 'इत्ती सी खुशी' मालिकेतील दिवेकर कुटुंबाचे आनंद, संघर्ष आणि नातेसंबंध यांचे चित्रण पाहताना प्रेक्षक रंगून गेले आहेत. अन्विता (सुंबुल तौकीर खान) आणि संजय (ऋषी सक्सेना) यांच्या विवाहामुळे दिवेकरांच्या कुटुंबात मोठा बदल झाला आहे आणि आता मालिकेत आणखी एक वळण येणार आहे. कथानकात आणखी गहनता आणि तीव्रता आणण्यासाठी परिचित अभिनेता फारूख सईद विराट (रजत वर्मा) चे वडील राजनाथ वर्मा यांच्या दमदार भूमिकेत दाखल होत आहे.

### टॉप २०० सेल्फ-मेड एंटरप्रेन्योर्स ऑफ द मिलेनिया २०२५ ची तिसरी आवृत्ती प्रकाशित

**पुणे :** आयडीएफसी फर्स्ट प्रायव्हेट बँकिंग आणि हुरुन इंडियाने 'आयडीएफसी फर्स्ट प्रायव्हेट अँड हुरुन इंडियाज टॉप २०० सेल्फ-मेड एंटरप्रेन्योर्स ऑफ द मिलेनिया २०२५' ची तिसरी आवृत्ती सुरू केली, जी २००० नंतर स्थापन झालेल्या भारतातील २०० सर्वात मौल्यवान कंपन्यांची यादी आहे. या कंपन्यांना त्यांच्या मूल्यानुसार क्रमवारी लावली जाते, सूचीबद्ध कंपन्यांसाठी बाजार भांडवलीकरण आणि सूचीबद्ध नसलेल्या कंपन्यांसाठी मूल्यांकन म्हणून परिभाषित केले जाते. या यादीत येण्यासाठी कट-ऑफ तारीख २५ सप्टेंबर २०२५ होती. ही यादी फक्त भारतात मुख्यालय असलेल्या कंपन्यांचा संदर्भ देते.

### 'इत्ती सी खुशी' चे १०० भाग सादर झाल्याचा आनंदोत्सव

**छत्रपती संभाजीनगर :** संबद्ध कथानक आणि हृदयस्पर्शी भावनांचे चित्रण करणाऱ्या सोनी सबवरील 'इत्ती सी खुशी' मालिकेने प्रेक्षकांचे मन जिंकून घेतले आहे. ही अन्विता (सुंबुल तौकीर खान) या तरुणीची कहाणी आहे, जी आपल्या कुटुंबाचा भक्कम आधार आहे. तिच्या आयुष्याला एक वेगळे वळण मिळाले आहे, कारण तिला सोडून गेलेला विराट (रजत वर्मा) आता परतला आहे आणि आपल्याला दुसरी संधी मिळावी अशी त्याची मागणी आहे. अन्विता द्विधा मनःस्थितीत आहे. तिने संजय (ऋषी सक्सेना) सोबत पुढे जाण्याचे ठरवले आहे. पण संजयच्या मनातील छुपे हेतू कहाणीत नवी गुंतागुंत निर्माण करत आहेत.

### नवीन युगातील यश मिळवणाऱ्यांसाठी 'लिव्ह अप सक्सेस'

नाशिक - रॉयल ग्रीन व्हिस्की ''टेस्ट द सक्सेस'' या तत्वज्ञानापासून 'लिव्ह अप सक्सेस' या तत्वज्ञानाकडे वाटचाल करत आहे. भारतातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या युवा-केंद्रित व्हिस्की ब्रँडपैकी एक असलेल्या रॉयल ग्रीन व्हिस्कीने ब्रँडचे नवीन धाडसी तत्वज्ञान लिव्ह अप सक्सेस सादर केले आहे. जुन्या ''टेस्ट द सक्सेस'' या तत्वज्ञानाच्या पलीकडे जाऊन, ही नवीन स्थिती जनरेशन झेड आणि मिलेनियल्सच्या बदलत्या दृष्टिकोनाचे प्रतिबिंबित करते. या पिढीसाठी, यश हे एक गंतव्यस्थान नाही तर दैनंदिन क्षणांची, छोट्या यशांची आणि वैयक्तिक कामगिरीची मालिका आहे.

### अभिनेता निर्भय वाधवा असुराच्या भूमिकेत दिसणार

**छत्रपती संभाजीनगर :** सोनी सबवरील 'गाथा शिव परिवार की - गणेश कार्तिकेय' या मालिकेच्या माध्यमातून शिव, पार्वती आणि त्यांची मुले गणेश आणि कार्तिकेय या समस्त शिव परिवाराच्या फारशा माहीत नसलेल्या कथा लोकांपर्यंत पोहोचत आहेत. प्रत्येक कथेनंतर या मालिकेचे आध्यात्मिक विश्र्व विस्तारत आहे. धर्म आणि अधर्मातील युद्ध, भावनांचा प्रवास आणि दैवी उद्देश यांची एकत्र गुंफलेली ही कथा आहे.

# गंगापूर नगराध्यक्षपदी राष्ट्रवादीचे संजय जाधव विजयी

## राकाँपा (अजित पवार गट) ११, भाजपला ७, शिवसेना (उबाठा) १ तर पक्षाला १ जागा

**तभा वृत्तसेवा**

**गंगापूर दि. २१:** गंगापूर नगरपालिकेच्या निवडणुकीत नगराध्यक्ष पदासह अकरा जागा मिळवत स्पष्ट बहुमत मिळविले आहे नगराध्यक्षपदी संजय जाधव यांनी भाजपचे प्रदीप भैय्या पाटील यांचा पराभव केला आहे .राष्ट्रवादी काँग्रेसने नगरपालिकेवर ११ उमेदवार नगरसेवक निवडून आले आहेत स्पष्ट बहुमतासह नगरपालिकेची सत्ता काबीज केली आहे.



नगरपालिका निवडणुकीत एकूण जागांपैकी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) ला ११, भाजपला ७, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाला १, तर १ जागा अपक्षाकडे गेली आहे. विशेष म्हणजे शिवसेना (शिंदे गट) आणि काँग्रेसला एकही जागा मिळवता न आल्याने शहराच्या राजकीय वर्तुळात तीव्र चर्चा सुरू झाली आहे.

प्रभागनिहाय विजयी उमेदवार प्रभाग १ पल्लवी आबासाहेब शिरसाठ (भाजपा) विजय उत्तमराव पानकडे (भाजपा) प्रभाग २ शुभांगी आनंद पाटील (भाजपा). राकेश सुभाषराव कळसकर (भाजपा) प्रभाग ३वर्षा विशाल गायकवाड (राष्ट्रवादी काँग्रेस - अजित पवार गट). अमोल सुभाष जगताप (राष्ट्रवादी काँग्रेस - अजित पवार गट)प्रभाग ४ नवनाथ विठ्ठल कानडे (राष्ट्रवादी काँग्रेस - अजित पवार गट) मंगलबाई अर्जुनसिंग राजपूत (शिवसेना उबाठा)प्रभाग ५ सोनम दीपक साळवे (भाजपा) वंदना प्रदीप पाटील (भाजपा) प्रभाग ६

सुमनबाई अशोक गायकवाड (राष्ट्रवादी काँग्रेस - अजित पवार गट) सय्यद अख्तर हशम (राष्ट्रवादी काँग्रेस - अजित पवार गट) प्रभाग ७ सुरेश लक्ष्मण नेमाडे (राष्ट्रवादी काँग्रेस - अजित पवार गट)उर्मिला मारुती खैरे (भाजपा). प्रभाग ८ तहीरीम मुनाफ कुरेशी (राष्ट्रवादी काँग्रेस - अजित पवार गट)सोपान गहिनीनाथ देशमुख (राष्ट्रवादी काँग्रेस - अजित पवार गट)प्रभाग ९ सलमाजबीन अनिस कुरेशी (अपक्ष) फैसल अब्दुल्ला बामसक (राष्ट्रवादी काँग्रेस - अजित पवार गट) प्रभाग १०संतोष गोविंदराव आंबिलवादे (राष्ट्रवादी काँग्रेस - अजित पवार गट). सोनाली योगेश पाटील (राष्ट्रवादी काँग्रेस - अजित पवार गट) नगराध्यक्षपदी निवड झाल्यानंतर संजय जाधव यांच्या समर्थकांनी शहरात फटाक्यांची आतषबाजी करत जल्लोष साजरा केला.




# सिल्लोड नगर परिषदेची सत्ता पुन्हा एकदा अब्दुल सत्तार यांच्या हाती





**तभा वृत्तसेवा**

**सिल्लोड दि. २१ :** नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीत माजी मंत्री अब्दुल सत्तार यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार अब्दुल समीर अब्दुल सत्तार हे २३५५६ च्या फरकाने निवडून आले. तर भारतीय जनता पक्षाच्या उमेदवाराला अवघ्या सात हजार ८९२ मतदान वर समाधान मानावे लागले. नगरसेवक पदाच्या २८ जागा साठी शिवसेना शिंदे गटाने २५ तर भारतीय जनता पक्षाने तीन जागा मिळवल्या. अन्य पक्षांना खाते देखील उघडता आले नाही.

सिल्लोड शहरातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या इमारतीत दिनांक २१ सकाळी दहा वाजल्यापासून मतमोजणी सुरुवात झाली. निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. निलेश आप्पा निलेश अपार. मुख्य अधिकारी कारभारी दिवेकर. यांच्यासह सहकारी कर्मचारी मतमोजणी. कार्यरत होते. प्रारंभी टपाली मतदान मोजण्यात आले. प्रभाग क्रमांक एक पासून पहिल्या टप्प्यात चार. दुसऱ्या टप्प्यात चार प्रभागांचीमतमोजणी घेण्यात आली शिवसेना शिंदे गटसेनेच्या उमेदवारांनी. पहिल्या प्रभागापासून चोरकस आघाडी घेत दणदणीत विजय संपादन केला. प्रभाग क्रमांक पाच मध्ये भारतीय जनता पक्षाचे विद्यमान जिल्हा उपाध्यक्ष सुनील मिरकर हे अवघ्या एका मताने पराभूत झाल्याने कार्यकर्त्यांमध्ये हळूहळू व्यक्त केली. भारतीय जनता पक्षांचा पारंपारिक मतदार संघ असलेल्या प्रभाग क्रमांक आठ मध्ये कमलेश कटारिया व रेखा गणेश भुमकर. हे दोन्ही उमेदवार निवडून आल्याने कार्यकर्त्यांनी आनंदोत्सव साजरा केला. वर्षापूर्वी झालेल्या विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्षाच्या उमेदवाराला.

११८०० मतदान झाले होते. त्यामध्ये भर पडेल असे वाटत असताना. नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीत. आहे त्या मतात घट होऊन. अवघ्या ७८९२ मतावर समाधान मानायची नामुष्की सत्ताधारी भारतीय जनता पक्षावर आली.१९९० साली स्थापन झालेल्या नगर परिषदेत पहिल्या पंचवार्षिक पासून. आमदार अब्दुल सत्तार यांची एक हाती सत्ता आहे. ती सत्ता अबाधित ठेवून आपल्या मुलाला नगराध्यक्षपदावर बसवण्याची किमया सत्तार यांनी साधली. मात्र ३ उमेदवार गमवावे लागल्याने त्याची हुरहुर सत्तार यांना बोचणार आहे.



# खुलताबाद नगराध्यपदी काँग्रेसचे आमेर पटेल

**तभा वृत्तसेवा**

**खुलताबाद दि. २१ :** खुलताबाद नगरपरिषद निवडणुकीत.भाजपा व राष्ट्रवादी काँग्रेस उमेदवारांना पराभूत करून काँग्रेस पक्षाचे आमेर पटेल यांनी बाजी मारून खुलताबाद नगर परिषदेचे नगराध्यक्षपद काबीज केले. दुसऱ्या क्रमांकावर भाजपचे उमेदवार परसराम बारगळ तर राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार हाजी अकबर बेग हे तिसऱ्या क्रमांकावर राहिले.

या निवडणुकीत नगराध्यक्ष पदासाठी भाजपा आमदार प्रशांत बंब, तर राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार सतीश चव्हाण यांनी आपापली प्रतिष्ठा पणाला लावली होती. या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे ९ नगरसेवक, भाजपा चे ७ नगरसेवक व काँग्रेसचे ४ नगरसेवक निवडून आले.

विजयी उमेदवारांची नगराध्यक्ष

पटेल सय्यद बशीर पटेल- काँग्रेस विजयी-४९८९, बारगळ परसराम शिवाजी-भाजपा-३६७६. प्रभाग क्रमांक -१ : अ. बारगळ मीना भाऊसाहेब-भाजपा-३३७, ब. तुपे मोहन देविदास-भाजपा-३९६. प्रभाग क्रमांक -२ : अ. बारगळ सुरुबाई बाबासाहेब-भाजपा-७८४, ब.बारगळ नवनाथ विश्वनाथ-भाजपा-६६०. प्रभाग क्रमांक -३ : अ. पवार अर्चना सचिन-भाजपा-५०३, ब. बारगळ कैलास मट्टू -राष्ट्रवादी (अजित पवार)-४३५. प्रभाग क्रमांक -४ : अ.शेख समरीन बानो शेख अब्दुल आमेर-काँग्रेस-९०४, ब. शेख सलीमोद्दीन इफतेखारोद्दीन-काँग्रेस-८६९. प्रभाग क्रमांक -५ : अ. शेख मुनिबोद्दीन मुजीबोद्दीन-राष्ट्रवादी (अजित पवार)-५२३, ब. गजाला परवीन मोहम्मद असलम-काँग्रेस-५८०. प्रभाग क्रमांक -६ : अ. शेख अमिनाबी बुर्हानोद्दीन -राष्ट्रवादी(अजित पवार)--५९८, ब. फुलारे योगेश आसाराम उर्फ गजानन फुलारे- राष्ट्रवादी (अजित पवार)-७८६. प्रभाग क्रमांक -७ : अ. मरकड कांताबाई सुरेश-भाजपा-४४८, ब. आवारे उमेश माधवराव-भाजपा-५३१. प्रभाग क्रमांक -८ : अ. शेख अजमत जहान वाजेदुद्दीन-राष्ट्रवादी (अजित पवार)-४८७, ब. शेख तौसीफ शेख शरफोद्दिन-राष्ट्रवादी (अजित पवार)-५४६. प्रभाग क्रमांक -९ : अ. मिर्झा अयाज बेग इकबाल बेग-राष्ट्रवादी (अजित पवार)-६२६, ब. नशीम बानो मातोहर- काँग्रेस-६२०. प्रभाग क्रमांक -१० : अ. बावस्कर अनिता दिलीप-राष्ट्रवादी (अजित पवार)- ५०९, ब. अनिस अहमद अब्दुल कादर-राष्ट्रवादी (अजित पवार )-५८४ निवडणूक मतमोजणी निवडणूक निर्वाचन अधिकारी, स्वरूप कंकाळ सहाय्यक निवडणूक अधिकारी शेख समीर यांनी निवडणूक निकाल जाहीर केले.

# समाजप्रबोधनकार मापारी यांना सुरत भेटीचे निमंत्रण

**तभा.वृत्तसेवा**

**सोयगाव,दि.२१ :** सोयगाव येथील समाज प्रबोधनकार तथा लोककलावंत विष्णू मापारी व त्यांचे सहकारी आरोग्यदुत डिंगाबर वाघ यांना सुरत निलगिरी भेटीचे नुकतेच तेथील युवकांनी सदिच्छा भेट घेऊन निमंत्रण दिले.

सुरत निलगिरी येथील युवक कार्यकर्ते घनश्याम अनिल शिंदे,सुमित अनिल पाटिल यांनी समाज प्रबोधनकार विष्णू मापारी सोयगावकर यांच्या निवासस्थानी रविवार सदिच्छा भेटीसाठी आले. भेटीसाठी आलेल्या युवकांचे समाज प्रबोधनकार विष्णू मापारी यांनी त्यांचे स्वागत केले. सदरील युवक म्हणाले की मापारी तुम्ही विविध लोककलेद्वारे करीत असलेले समाज प्रबोधनाचे व सामाजिक कार्याचे आम्ही मोबाईलमध्ये तसेच वृत्तपत्रात फोटो,बातम्या बघत असतो. तुम्ही करीत असलेले सामाजिक कार्य व विविध लोककलेद्वारे समाज प्रबोधन आम्हाला आवडतात. तुम्ही करीत असलेल्या कार्याचा आम्हाला अभिमान वाटतो.तुमचे आम्ही चाहते हितचिंतक आहोत. त्यामुळे सुरतहुन मुद्दाम तुम्हाला भेटण्यासाठी आलो. तुमचा विविध लोककलेतुन समाज प्रबोधनाचा कार्यक्रम आमच्या सुरत निलगिरी भागात व्हावा म्हणुन आम्ही तुम्हाला सुरत भेटीचे निमंत्रण देत आहोत.तुमच्या झालेल्या भेटीमुळे आम्हाला विशेष आनंद वाटला. तुमचे साधे राहणीमान व उच्च विचार एकुन आम्ही धन्य झालो असे म्हणाले. यावेळी त्यांच्या सोबत आरोग्य दुत डिंगाबर वाघ उपस्थित होते. त्यांनी सुरत भेटिचे दिलेल्या निमंत्रणाचा समाज प्रबोधनकार यांनी स्विकार केला.



# महात्मा गांधींच्या विचारप्रणालीनुसार एमजीएमची यशस्वी शैक्षणिक वाटचाल : ज्ञानपीठकार मावजो

**छत्रपती संभाजीनगर, दि. २० :** महात्मा गांधी यांच्या विचारप्रणालीनुसार शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रात मूल्याधिष्ठित कार्यपद्धती राबविण्यात महात्मा गांधी मिशन (एमजीएम) यशस्वी ठरले असून, संस्थेची शैक्षणिक वाटचाल प्रेरणादायी आहे, असे प्रतिपादन ज्ञानपीठ पुरस्कार विजेते प्रख्यात साहित्यिक व विचारवंत दामोदर मावजो यांनी केले. एमजीएमच्या ४३ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित मुख्य सोहळ्यात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

या वेळी व्यासपीठावर जन स्मॉल फायनान्स बँकेचे व्यवस्थापकीय संचालक अजय कंवल, महात्मा गांधी मिशनचे अध्यक्ष कमलकिशोर कदम, उपाध्यक्ष डॉ. पी. एम. जाधव, सचिव अंकुशराव कदम, विश्वस्त डॉ. सुधीर कदम, उज्ज्वल कदम, डॉ. अमरदीप कदम, शिक्षणतज्ज्ञ भाऊसाहेब राजळे, एमजीएम विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास सपकाळ, एमजीएम इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थ सायन्सेसचे कुलगुरू डॉ. शशांक दळवी, श्रीमती शैला मावजो, श्रीमती निशी कंवल आदी मान्यवर उपस्थित होते.





ज्ञानपीठकार मावजो म्हणाले, महात्मा गांधींचे नाव धारण करणे ही मोठी जबाबदारी असून, त्या विचारांची अंमलबजावणी प्रत्यक्ष कार्यातून होत असल्यासच संस्थेला खऱ्या अर्थाने महानता प्राप्त होते. एमजीएमने शिक्षणाच्या माध्यमातून समाजाभिमुख नेतृत्व घडविण्याचे कार्य केले आहे. आजचे शिक्षण विद्यार्थ्याला केवळ यशस्वी नव्हे तर संवेदनशील आणि जबाबदार नागरिक घडवते का, याचा आत्मपरीक्षणात्मक विचार होणे आवश्यक आहे, असेही त्यांनी नमूद केले.

एमजीएमचे अध्यक्ष कमलकिशोर कदम यांनी संस्थेच्या ४३ वर्षांच्या प्रवासाचा आढावा घेत पुढील टप्प्यात गांधीविचार अधिक प्रभावीपणे राबविण्याचा संकल्प व्यक्त केला. संस्थेचे सचिव अंकुशराव कदम यांनी एमजीएममधून एक लाखांहून अधिक विद्यार्थी शिक्षण पूर्ण करून देश-विदेशात कार्यरत असल्याची माहिती दिली.

जन स्मॉल फायनान्स बँकेचे व्यवस्थापकीय संचालक अजय कंवल यांनी एमजीएमची तुलना 'मेकिंग ग्रेट माईंड्स' या संकल्पनेशी करत संस्थेच्या सर्वांगीण विकासाचे कौतुक केले.

एमजीएम स्टेडियमवर हा वर्धापन दिन सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी संस्थेच्या वाटचालीवर आधारित चित्रफित, गोव्यातील 'देवल्याचा नाच' हा सांस्कृतिक कार्यक्रम आणि वृंदगान सादर करण्यात आले.

कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी हजारो उपस्थितांनी मेणबत्त्या प्रज्वलित करून 'आओ उजाला करें'चा सामाजिक संदेश दिला.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# देवाचे दुसरे नाव...

## रोखठोक

दिनेश गुणे

अलिकडे समाज माध्यमांवर एक विनोद वेगाने फैलावला आहे. 'स्वच्छ भारत मोहीम महाराष्ट्रात शंभर टक्के यशस्वी होणार आणि राज्यात स्वैरपणे वावरणाऱ्या बिबट्यांचा त्या यशामध्ये सिंहाचा वाटा असणार' असा हा विनोद खरे म्हणजे अस्वस्थ करणारा, विरोधाभासावर बोट ठेवणारा म्हणावा लागेल. पण या निमित्ताने, स्वच्छ भारत मोहीम नावाचे एक राष्ट्रीय जनआंदोलन पुन्हा एकदा लोकांच्या चर्चेत आले, याची खात्री पटते.

विरंगुळ्यासाठी असे काही समाजमाध्यमी साहित्य पचवून झाले की आपण आपल्या उद्योगाकडे वळतो. काहीच काम नसेल, तर जुने काहीतरी वाचत, ऐकत किंवा न्याहाळत बसतो. परवा माझेही तसेच झाले. काशी विश्वेश्वरधाम प्रकल्पाच्या उद्घाटनाच्या निमित्ताने पंतप्रधानांचे एक जुने भाषण ऐकत मी घराच्या खिडकीत बसलो होतो आणि त्यांच्या भाषणातही स्वच्छ भारत मोहिमेचा तो उल्लेख ऐकला. पंतप्रधानांनी एखादी मोहीम सुरू केली की त्याचा सातत्याने पाठपुरावा करून समाजास सातत्याने त्याची आठवण करून देण्याची त्यांची सवय एव्हाना देशाला माहीत झाली आहे. त्या भाषणात स्वच्छ भारत मोहिमेचा उल्लेख पुन्हा ऐकला, तेव्हा मी खिडकीतून बाहेरचा परिसर निरुद्देशपणे न्याहाळत होतो...

मुंबईच्या पश्चिम उपनगरातील आमच्या घरापासून थोड्याच अंतरावर एक नाला आहे. कधीकाळी ती नदी, खाडी असावी एवढे ऐसपैस पात्र आहे त्याचे. खूप वर्षांपूर्वी आम्ही या घरात राहायला आलो, तेव्हा ती वाहती नदीच होती. थंडीच्या दिवसांत पहाटे त्या पात्रातील पाण्यावर वाफांची वर्तुळे नृत्य करायची आणि काठावर ध्यान करून बसलेले बगळे अचानक पाण्यात चोची बुडवून एखादा मासा गट्टम करायची. सकाळी उठून खिडकीबाहेर पाहिल्यावर दिसणाऱ्या या दृश्याला भुलून आम्ही हे घर घेतलं, तेव्हा भविष्याची जरादेखील शंका मनात डोकावली नव्हती. आता त्या नाल्यातून रसायनमिश्रित काळे पाणी वाहते. आता काठावर बगळे नाहीत, कावळे कलकलाट करत असतात. भरतीची वेळ सोडली, तर त्या नाल्यातलं ते प्रदूषित रसायन एकाच जागी संथ साचल्यागत स्वस्थ असतं. कधीतरी एखादा डंपर येतो आणि त्या काळ्या पाण्यात ट्रकभर कचरा ओतला जातो. कुणीतरी रस्त्यावरून जाता जाता पुलावर थांबून कचरा किंवा टाकाऊ वस्तूंनी भरलेली प्लॅस्टिकची पिशवी फेकतं. त्या संथ साचलेपणात थोडीशी खळबळ माजते. काही क्षण नाला ढवळला जातो आणि पुन्हा साचलेलं काळं पाणी संथ होऊ लागतं. कचरा आणि टाकाऊ वस्तूंचे ढिगारे माजले की, ते काळं पाणी संकोचून काठाकडचा कोपऱ्यात जमा होऊ लागतं, तोवर पावसाळ्याची चाहूल सुरू होते. मग महापालिका नालेसफाई वगैरे कार्यक्रम हाती घेते आणि मोठमोठी पोकलेनसारखी यंत्रे काठावर धडधडू लागता. काळं पाणी ढवळून निघतं. आधी टाकलेला कचरा उचलण्याचा कार्यक्रम घाईघाईने पार पाडून गाड्या निघून जातात आणि काळं पाणी उरलेला कचरा कवटाळत पुन्हा जागच्या जागी साचून स्वस्थ बसतं.

पंतप्रधानांच्या भाषणातील स्वच्छ भारत मोहिमेचा उल्लेख कानावर पडला, तेव्हा मी किड्यांच्या वळवळण्यामुळे अस्वस्थ झालेल्या त्या काळ्या डबक्याकडे पाहात होतो. मला अलिकडे ते पाहताना आनंद वगैरे होत नाही. आता तो नाला पुन्हा पहिलेसारखा नदी होऊन नितळ पाण्याने वाहू लागणार नाही, याची मला पुरती खात्री असल्याने, नाल्याचे वास्तव मी मान्य केले आहे. नदीचा नाला होऊन पाण्याची जागा रसायनमिश्रित द्रवपदार्थांनी घेतली हा त्या नाल्याचा नव्हे, तर माणसाचाच दोष आहे, हे माहीत असूनही आपल्याला लाज का वाटली नाही असा विचारही मनात आला. त्याच वेळी स्वच्छ भारत मोहिमेचे काहीसे हसू देखील आले. स्वच्छता हा कोट्यवधी रुपये खर्चाचा सरकारी कार्यक्रम करावा लागतो, हा मानसिक विकासाच्या अनुशेषाचाच परिणाम आहे, हेही जाणवले आणि विचार करत करत मन मागे गेले.

पंतप्रधानांचं भाषण ऐकत असतानाच खिडकीतून पुन्हा माझी नजर त्या नाल्यात साचलेल्या काळ्या पाण्यावर पडली. आता पाण्याचे कोणतेच गुण त्याच्या अंगी राहिलेले नाहीत. त्यामध्ये मासा शोधूनही सापडणार नाही, पण त्याच्या तेलकट तवंगावर किडे वळवळताना दिसतात. उन्हाची किरणं त्या तवंगावर पडली की वळवळणाऱ्या किड्यांच्या हालचालींनी नाला अस्वस्थ चुळबुळताना दिसतो. कदाचित त्यातल्या रसायनालादेखील एकाच जागी साचल्याचा कंटाळा येत असावा...

मुंबईच्या मध्यावरून मिठी नदी वाहते. तिला अजूनही नदी म्हणत असले, तरी तो आता असाच एक नाला आहे. रसायनमिश्रित द्रवपदार्थ, कचरा आणि टाकाऊ म्हणून नकोसे झालेल्या असंख्य वस्तू पोटात घेणारे ते हक्काचे ठिकाण झाले आहे. काही वर्षांपूर्वी, मुंबईत वाझे नावाच्या पोलिस अधिकाऱ्यावर खंडणी वसुली प्रकरणी कारवाई सुरू झाल्यावर तर, या मिठीच्या पोटातून संगणक आणि महत्त्वाची माहिती असलेल्या हार्ड डिस्कस् देखील बाहेर काढल्या गेल्या होत्या. असंख्य गुन्ह्यांचे पुरावेदेखील या नाल्याच्या पोटात गडप झाले असल्याची वदंता आहे. तरीही पश्चिम उपनगरांतील अनेक जण उपनगरी गाड्यांतून ये-जा करताना सोबतच्या प्लॅस्टिकच्या पिशवीतून आणलेले निर्माल्य, नारळ, पूजेचे साहित्य वगैरे वस्तू गाडी पुलावर आली की भक्तिभावाने मिठी नदीत फेकतात आणि नमस्कारही करतात. हेही मानसिकतेचेच एक रूप असते.

ते भाषण ऐकताना, स्वच्छ भारताच्या मुद्यापाठोपाठ मनात साचलेली ही काही दृश्ये जिवंत झाली आणि स्वच्छता हे मानसिक विकासाचे पहिले लक्षण आहे, असा निष्कर्ष मी काढला. आजकाल मुंबईत स्वच्छता राखण्यासाठी, रस्त्याकडेच्या भिंतींवर देवतांच्या वगैरे प्रतिमा रंगविल्या जातात. देवादिकांचे फोटोही लावले जातात. त्यांच्यासमोर कचरा वगैरे फेकण्याएवढा बेमुर्वतपणा माणसाच्या अंगी सरसकटपणे नसतो, असा त्यामागचा विचार असावा. पण



स्वच्छतेचे महत्त्व सांगणाऱ्या एखाद्या होर्डिंगच्या खालीच कचरापट्टी झालेलीही इथे पाहायला मिळते. मानसिक विकासाचा अनुशेष भरून काढायला आपल्याला किती वर्षे लागणार, या विचाराने मनात काहूर माजते. पंतप्रधान मात्र, आपल्या प्रत्येक भाषणात स्वच्छ भारताचा मंत्र देतच असतात...

अकरा वर्षांपूर्वी, २ ऑक्टोबर २०१४ रोजी गांधी जयंतीदिनी स्वच्छ भारत नारा देशभरात घुमला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वत: झाडू हातात घेऊन राजघाटावर स्वच्छता करत या मोहिमेची सुरुवात केली आणि देशातील चार हजार शहरांमध्ये रस्ते, नद्या आणि परिसराच्या स्वच्छतेचा संकल्प सोडला गेला. राष्ट्रीय पातळीवर ही मोहीम राबविण्यासाठी देशातील ३० लाख सरकारी कर्मचारी या मोहिमेत सहभागी होतील आणि २०१९ मध्ये महात्मा गांधींच्या १५० व्या जयंतीदिनी स्वच्छ भारताची त्यांची इच्छा पूर्ण केली जाईल, असा विश्वास पंतप्रधानांनी त्या दिवशी व्यक्त केला. यापुढे या देशात कोणीही कचरा करणार नाही आणि कोणीही कोणासही कचरा करू देणार नाही, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली आणि देशातील प्रत्येक नागरिकाने या राष्ट्रीय मोहिमेत सहभागी होऊन देश स्वच्छ राखावा, असे आवाहनही केले...

आता या मोहिमेने जनआंदोलनाचे रूप घेतले आहे, स्वच्छ भारत हा नारा देशाच्या नव्हे, जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचला आहे आणि या मोहिमेच्या यशाकडे उभे जग उत्सुकतेने पाहात आहे, असे म्हटले जाते. म्हणूनच, दहा-अकरा वर्षांनंतर आसपास पाहताना सहज दिसणाऱ्या काही बाबी नोंद करून ठेवाव्या असे वाटले...

स्वच्छता हे देवाचे दुसरे नाव आहे असा संदेश मिरवत यच्चयावत देवप्रतिमांपासून साईबाबांपर्यंत सारे रस्तोरस्तीच्या भिंतींवर वर्षानुवर्षे असूनही, अस्वच्छतेचा कलंक माथी मिरविण्याची सवय संपली नव्हती, ती या एका नाऱ्याने नष्ट होईल यावर विश्वास ठेवण्यासारखी परिस्थिती अजूनही निर्माण झालेली नाही. पंतप्रधानांनी ज्या विश्वासाने देशातील जनतेच्या खांद्यावर स्वच्छतेच्या जबाबदारीची पालखी सोपविली, ती पेलण्यासाठी अजूनही जनतेचे खांदे पुरेसे सक्षम झालेले नसावेत असे वाटण्याजोगी स्थिती आजही जागोजागी अनुभवास येते. आसपासच्या सहज जाणवणाऱ्या एखाद्या प्रसंगातून ही खंत उगीचच डोके वर काढू लागते.

कालच, एका शेअर रिक्षाने प्रवास करतानाच्या एका प्रसंगामुळे असं वाटायला लागलं. धूर, गाड्यांचे कर्कश हॉर्न, गर्दीचा सरमिसळलेला आवाज आणि प्रचंड वाहतूक कोंडीच्या पसाऱ्यातून कशीबशी वाट काढत आमची रिक्षा एका सिग्नलजवळ थांबली. रिक्षाचालकाने इकडेतिकडे पाहिले आणि गुटखा, मावा किंवा तंबाखूचा तोबरा भरून तोंडाचे तळे होईपर्यंत साठविलेली थुंकीची पिंक रस्त्यावर मोकळी करून ढणाढण वाजणाऱ्या गाण्याच्या सुरात त्याने आपलाही सूर मिसळला. पुढचा सिग्नल येईपर्यंत पुन्हा त्याचे तोंड भरले होते. या सिग्नलला थांबताच तो पुन्हा पचकन थुंकला. एक गिळगिळीत शहारा अंगावर आल्याने न राहवून मी त्या रिक्षावाल्याला सुनावू लागलो. बाजूचे दोन सहप्रवासीही साथीला आले. पण त्याचा काहीच परिणाम झाला नव्हता. एवढे ऐकल्यानंतरही, काही फरक पडल्याची एकही रेषा रिक्षावाल्याच्या चेहऱ्यावर उमटली नव्हती.

"भैया, जिस रस्तेपर गाडी चलाके रोजीरोटी कमाते हो, उसीपर थूकते हुए शरम नहीं लगती क्या?" शेजारच्या प्रवाशाने तळमळून प्रश्न केला आणि रिक्षावाल्याने मागे वळून पाहिले. तोच थंडपणा त्याच्या चेहऱ्यावर होता.

"देखो साब, मेरी रोजीरोटी इस रिक्षा से चलती है... रस्तेपरसे नहीं और रही बात, शरम लगनेकी... मुझे बताईये, रस्तेपर थूकनेवाला मैं अकेलाही हूँ क्या?... तो मेरे ना थूकनेसे क्या आपको लगता है कि मुंबई साफ रहेगी?... मैं तो थुकूंगा. और एक बात. मैं पूरा दिन रस्तेपर ही गाडी चलाता रहता हू... बीच में कभी पेशाब के लिए रुकना तो पडता है ना?... लेकिन अगर जगहजगह पर पेशाबघर हैही नहीं, तो क्या मैं ऐसेही, किसी रस्ते के बाजू में खडा होकर पेशाब नहीं करूंगा?... इससे भी तो गंदगी होती है. क्या उस गंदगी के लिए आप मुझे जिम्मेदार ठहराओगे या सिस्टमको?"

...उत्तराची वाट न पाहता रिक्षावाला समोर बघू लागला. सिग्नल पडला आणि पुन्हा एकदा रस्त्यावर पचकन थुंकून त्याने गाडी दामटली!

एका जुन्या पावसाळी दिवशी, मुंबईच्या रस्त्यावरून प्रवास करताना आलेला असाच एक अनुभव... 'बेस्ट'ची एक खच्चून भरलेली बस. पुरुष प्रवासी पॅसेजमधेही उभे आहेत. महिलांसाठी राखीव बाकडी मात्र, एका महिला प्रवाशासाठी पूर्ण बाकडे अशा हिशेबाने भरलेले! लक्षपूर्वक ध्यान दिले, तर जवळपास प्रत्येक महिलेच्या चेहऱ्यावर, पुरुष प्रवाशांना खुन्नस दिल्याचा भाव दिसतोय! अचानक पावसाची सणसणीत सर आल्याने खिडक्यांच्या काचा फटाफट खाली ओढल्या जातात आणि पावसामुळे ट्रॅफिकही जाम होते. कितीतरी वेळ गाडी जागेवरच उभी होती! दोन-चार मिनिटांत उकाड्याने गर्दी कासावीस होऊ लागते. घामाच्या धारा सुरू होतात. अशा वेळी अस्वस्थता येते. चिडचिड होते. गर्दीतल्या कुणाचा स्पर्शही नकोसा वाटू लागतो आणि आपण असे हाल सोसत असताना दुसरं कुणी मात्र आराम एन्जॉय करतोय हे पाहणे तर आणखीनच बेचैन करणारे असते! अशाच वातावरणात, महिलांसाठी राखीव असलेल्या एका बाकड्यावर ऐसपैस बसलेल्या एका प्रवासी महिलेने पर्स उघडली. कंगवा काढला. केस मोकळे करून मनसोक्त मान हलवली. एखाद्या मोराने पिसारा फुलवून थिरकवावा, तसे आपले केस मान हलवूनच फुलविले आणि भरलेल्या बसमध्ये, स्वमग्नपणे, आत्मानंदी टाळी लागल्याच्या पारमार्थिक आनंदात, केस विंचरण्याचा सोहळा सुरू झाला... केसातून फिरणारा कंगवा बाहेर आला की त्यात अडकलेली गुंतवळ बोटाने सोडवून केसांना अलगदपणे बसमध्येच सीटखाली सोडणे सुरू झाले. केसांची गुंतवळ एकत्र केली तर बचकाभर तरी होईल, असे ते ऐतिहासिक दृश्य पाहणाऱ्या प्रत्येक प्रवाशास वाटत असावे, हे त्यांच्या मळमळलेल्या चेहऱ्यांवरच दिसत होते. ती महिला मात्र, आसपासची तमा न करता, बसला कचराकुंडी समजून केसांची गुंतवळ अर्पण करतच होती.

.... वाहतूक कोंडीत खोळंबून थांबलेल्या बसमधूनच रस्त्याकडेच्या एका भिंतीवर स्वच्छ भारतच्या जाहीरातीचे भलेमोठे पोस्टर दिसत होते. त्यावर मोदींचं चित्र पाहून एक प्रवासी उखडला.

"ये अकेला आदमी क्या करेगा स्वच्छ भारत?" तो जोरात बोलला.

गर्दीकडे लक्षही न देता आत्ममग्नपणे केस विंचरणाऱ्या त्या महिलेने कंगव्यातला अखेरचा पुंजका सीटखाली सोडला आणि केस पुन्हा बांधून ती नीटनेटकी झाली! स्वच्छ!!

...पण अजूनही या मोहिमेच्या यशाची आशा संपलेली नाही. स्वच्छता हे देवाचे दुसरे नाव आहे, हा सुविचार एव्हाना मुंबईसारख्या महानगरातील रस्त्यारस्त्यावर दिसूही लागला आहे. रस्त्यावरून ये-जा करणाऱ्या प्रत्येकास तो पाठ झाला आहे आणि मोदी नावाच्या माणसाने देशात राष्ट्रीय स्तरावर स्वच्छतेची मोहीम सुरू करून महात्मा गांधींचे स्वच्छ भारताचे स्वप्न साकार करण्याचा ध्यास अजूनही सोडलेला नाही, हेही अनेकांस माहीत आहे. कदाचित म्हणूनच, एखादा टाकाऊ कागद, प्लॅस्टिक, बाटली वगैरे वस्तू वापर संपताच लगेचच फेकून देण्याआधी लोक हळूच इकडेतिकडे पाहातात, असे लक्षात येते. आपल्याला कुणी पाहात नाहीये ना, याची खात्री झाल्यावर मगच या वस्तू इतस्तत: फेकाव्यात एवढी समज निर्माण झाली आहे... याचा अर्थ, पहिलेसारखा बेदरकारपणा आता अशा कृतीत फारसा दिसत नाही.

एवढ्या बदलास दहा वर्षे लागली असा हिशेब केला, तर वाटेल तेथे फेकून कचरा माजवू नये हा संपूर्ण विचार मनात रुजण्यासाठी पुढची पंचवीस वर्षे तरी लागतील, असा अंदाज आहे. तसेही, उत्क्रांती ही संथपणे पुढे सरकणारीच प्रक्रिया आहे.

माणसाला पूर्वी शेपूट होते असे म्हणतात. ते नष्ट व्हायला हजारो वर्षांची वाट पाहावी लागली होतीच की!

dineshgune@gmail.com

## रविवारची पत्रे

### प्रवास अपूर्णतेकडून पूर्णतेकडे...

'ॐ पूर्णमदः पूर्णमिदं पूर्णमेवावशिष्यते । ॐ शांति शांति शांतिः' हा शांतिमंत्र अनेक वर्षांपासून आपण ऐकतो आहे, वाचतो आहे, समजून घेण्याचा प्रयत्न करतो आहे. जेथून उत्पन्न झालो ते पूर्ण, जिथे स्थित आहोत तेही पूर्ण, त्या पूर्णातून काढले तेही पूर्ण, त्या पूर्णात सामावले तेही पूर्ण, असे उपनिषदे सांगतात. गुरुमुखातून अनेकदा ऐकले, तरीही अपूर्णतेची जाणीव सतत का होत असते? ही विष्णू माया अनेक ज्ञानी लोकांना पुनःपुन्हा त्या मायेत अडकवते. ग्रंथसंपदा ग्रंथी सोडवतात म्हणे! अनेक ग्रंथ, पुस्तके, गाथा जवळ असल्या, तरीही त्यातील काय घ्यावे हे कोण सांगणार? प्रस्थान त्रयींमध्ये आपल्या ऋषिमुनींनी सांगितले आहे, श्रवण, मनन,? निदिध्यासन. म्हणजेच ग्रंथ आपल्याला कोणती शिकवण देत आहे, हे श्रवणाने उमगते. त्यातून काय साध्य करायचे आहे, हे प्रवचनातून समजले की, त्यानंतरच ग्रंथ वाचनाने काहीतरी आकलन होते. पूर्ण ब्रह्मांडाचे ज्ञान जरी झाले तरी तो ब्रह्मांड निर्माण करणाऱ्याचा शोध लागत नाही. तो 'दशांगुळे उरला' असे ज्ञानी म्हणतात. तत्त्वज्ञानाने मनाची शांती होत नाही. बालवाडीतील शिक्षिका बोट धरून भौतिक शिक्षणाचे धडे गिरवून घेतात. जगण्याचे धडे कोणी शिकवावे? येथे एकनाथांची शिकवण आठवते.

**'जरी होते ग्रंथ गुरू तरी का घेणे लागे अवतारु'**

प्रत्येक अपत्याच्या वृत्तीनुसार, पिंडानुसार आई आपल्या बाळाला घास भरवते, वाढवते, काळजी घेते. गुरुमाउली तशाच प्रकारे शिष्यास सांभाळते. मनुष्याचा एकांगी दृष्टिकोन बदलावा. आधिभौतिक प्रगती, आधिदैविक शक्ती, आध्यात्मिक समाधान या तिन्ही अंगाने शिष्याचा विकास साधण्यासाठी प्रयत्न करते. याच त्रिविध तापांतून होरपळलेल्या जिवाला ईश्वरभक्तीची फुंकर गुरुमाउली घालते. प्रपंचात येणाऱ्या सुख-दुःखाला सामोरे जाण्याचे बळ देते. गरुडझेप घालून येणाऱ्या दुःखाने उद्ध्वस्त झालेल्या तनाला मनाला शांती मिळावी म्हणून प्रयत्न करते. गुरू वाक्य कानावर पडले की समाधानाचा, तृप्तीचा भाव जाणवतो. मात्र, काही क्षणातच पुन्हा मायेच्या, मोहाच्या, ममत्वाच्या गर्तेत मनुष्य सापडतो.

**'बहुत सुकृताची जोडी म्हणुनी विठ्ठली आवडी ।'**

गतजन्मीचे कर्म साथीला होते म्हणून भगवतीची उपासना घडली. सद्गुरूंचे चरणी नतमस्तक होणे घडले. देहधारी होऊन ईश्वर आपल्यासाठी ईश्वरतुल्य गुरुदेव पाठवतो. गुरू मळलेल्या, माखलेल्या या साधकाला शिष्यत्व बहाल करतात. त्याला स्वच्छ करून ईश्वराकडे जाण्याच्या मार्गावर अलगदपणे पोहोचवतात. प्रारब्धातील घटनेला अनुसरून आपण स्वतःला सांभाळावे असे शिकवतात, बळ देतात. अनपेक्षित धक्क्याने कोसळलेल्या, कोलमडून पडलेल्या, उन्मळून पडलेल्या या साधकाला पुन्हा नव्याने उभं राहायला मदत करतात. 'पुन्हा नव्याने जन्मले मी' ही भावना मनात येईपर्यंत गुरुमाउली सांभाळते. भौतिक सुखाच्या सोहळ्यात तू जशी समरसून जातेस तशीच आत्मिक सुखाच्या आनंदात रमशील, असे शिवधनुष्य माउली नादान लेकरासाठी उचलते. आधिदैविक, आधिभौतिक, आध्यात्मिक अशा तीनही शांतीच्या या मंत्राच्या अनुभूतीसाठी गुरुकृपा हवी. गुरूंचा वरदहस्त हवाच. कुलमातेचा आशीर्वाद हवा. कर्तव्याचा मार्ग दाखविणाऱ्या गुरू चरणी समर्पित व्हावे, असे आशीर्वादही गुरूने द्यावेत, भगवतीने द्यावेत, एवढेच.

॥ अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त ॥

**डॉ. उज्ज्वला सतीश देशमुख**/९४२२८०७२४७

### श्री नृसिंह सरस्वती महाराज जयंती

श्री नृसिंह सरस्वती महाराज यांची जयंती, यावर्षी पौष शुद्ध द्वितीया म्हणजे २२ डिसेंबरला आहे. श्री दत्तात्रेयांचे दुसरे अवतार श्री नृसिंह सरस्वती महाराज यांचा जन्म १३७८ साली विदर्भातील कारंजा लाड येथे झाला. श्रीपाद श्रीवल्लभ यांच्या नंतरचे दत्तात्रेयांचे पूर्ण अवतार नृसिंह सरस्वती स्वामींना मानले जाते. नृसिंह सरस्वती हे संन्यासी होते. श्री गुरुचरित्र या दत्त संप्रदायातील वेदतुल्य ग्रंथांमध्ये श्री नृसिंह सरस्वती महाराजांचे जीवनकार्य आणि लीलांचे वर्णन आले आहे. हा ग्रंथ दत्तभक्तांचा वेद मानला जातो. नृसिंह सरस्वती महाराजांमुळे महाराष्ट्रात दत्त संप्रदायाचा मोठ्या प्रमाणात प्रसार झाला. गुरुचरित्र कथेनुसार नृसिंह सरस्वती यांनी जन्मताच ओंकाराचा उच्चार केला .सात वर्षे ते याशिवाय एकही शब्द बोलले नाही. त्यानंतर त्यांनी माता-पित्यांना उपनयन करण्याविषयी सुचविले. उपनयन होताच त्यांच्या मुखातून वेदवाणी बाहेर पडली. त्यानंतर ते माता-पित्यांचा आशीर्वाद घेऊन बद्रिकेदार येथे गेले. काशी मुक्कामी त्यांना संन्यासी कृष्ण सरस्वती यांनी संन्यास दीक्षा दिली. त्यानंतर एकदाच ते कारंजाला आले. नंतर सतत भ्रमंतीवरच राहिले. अमरापूर या कृष्णा पंचगंगा संगम असलेल्या गावी ते बारा वर्षे राहिले. त्यांच्या या प्रदीर्घ निवासामुळे या गावाला नृसिंहवाडी म्हणजेच नरसोबाची वाडी हे नाव पडले.

त्यानंतर गाणगापुरी (भीमा- अमरजा नद्यांचा संगम असलेलं कर्नाटकातील गाव) ते २४ वर्षे राहिले. नृसिंह सरस्वतींनी श्रीपाद श्रीवल्लभांचे कार्य पुढे चालवले आणि दत्त संप्रदायाचा प्रसार केला. त्यांनी संपूर्ण भारतातच संचार केला. त्यांचा मोठा शिष्यवर्ग तयार झाला. त्यांचे प्रमुख सात शिष्य होते. माधव सरस्वती, कृष्ण सरस्वती, बाळकृष्ण सरस्वती, उपेंद्र सरस्वती, सदानंद सरस्वती, ज्ञानज्योती सरस्वती आणि सिद्ध सरस्वती. यांनीही दत्तपरंपरेचा प्रसार केला. स्वामींनी जिथे जिथे तपश्चर्या केली, कार्य केले, ती ठिकाणे औदुंबर, नृसिंहवाडी, गाणगापूर ही दत्त संप्रदायातील अतिशय पवित्र स्थाने झाली. त्यांच्याच कार्यकाळात श्री गुरुचरित्र हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथाची महाराष्ट्रात दत्तभक्त पारायण करतात. नृसिंह सरस्वती हे या ग्रंथाचे चरित्र नायक आहेत. गुरुचरित्राच्या ११ ते ५१ या अध्यायात त्यांचे लीला चरित्र आले आहे. नरसोबाची वाडी, औदुंबर आणि गाणगापूर येथे त्यांच्या पादुका असून, लाखो भक्त दर्शनासाठी आणि सेवेसाठी येतात. दत्त जयंतीला सप्ताहात लाखो दत्तभक्त श्री गुरुचरित्राचे पारायण करतात आणि अनुभूती घेतात. कारंज्याला त्यांच्या जयंतीपासून त्यांच्या शैलागमनापर्यंत दीड महिना उत्सव असतो. या पुण्यकाळात दत्तभक्तांनी नक्की कारंजाला भेट द्यावी.

**माधवी पत्की**/नागपूर

### बांगलादेशातील जिहादी उन्माद




काल बांगलादेशात घडलेली घटना ही केवळ एका देशातील बातमी नाही; ती काळाच्या कपाळावर कोरलेली चेतावनी आहे. एका हिंदू युवकाला झाडाला बांधून जिवंत जाळले गेले आणि त्या अमानुष क्षणी जमावाच्या तोंडून अल्लाहू अकबरचे नारे निघाले. ही कट्टर जिहादी विकृत मानसिकतेची रणभेरी होती. ही आग शरीरापुरती मर्यादित नव्हती; ती माणुसकीच्या मुळांनाच जाळणारी होती. जिथे धर्म करुणेऐवजी क्रौर्य शिकवू लागतो, तिथे तो धर्म राहत नाही तो जिहादी उन्माद बनतो.

कट्टरतावादाचा चेहरा नेहमीच एकसारखा असतो: तो प्रश्नांना घाबरतो, विचारांना दडपतो आणि भीतीला देवत्व बहाल करतो. जमावाच्या नशेत विवेक हरवतो आणि मग माणूस माणसाचा शत्रू ठरतो. अशा उन्मादात सत्य गुदमरते, न्याय पळून जातो आणि कायदा थरथरतो. आज शेजारी घडलेली ही घटना उद्याचा आपला आरसा ठरू शकते जर आपण डोळे उघडे ठेवले नाहीत तर. भारताने शतकानुशतके सहअस्तित्वाचा धडा दिला आहे. इथल्या हिंदूने कधीही गैर हिंदूंना त्रास दिलेला नाही किंवा त्यांच्या विरोधात धार्मिक उन्मादाचे प्रकटीकरण सुद्धा केले नाही. परंतु हिंदूंच्या या सौजन्यतेचा अनेकदा चुकीचा अर्थ घेतला गेला आणि त्यांना सॉफ्ट टार्गेट समजून त्यांच्या श्रद्धा आणि मानबिंदूंवर आघात करण्यात आला. हिंदू समाज जैविकदृष्ट्या सहिष्णूच आहे. पण सहिष्णुतेचा अर्थ आत्मसमर्पण नसतो. शांततेचा अर्थ अन्याय सहन करणे नसतो. जिथे निर्दोषाला लक्ष्य केले जाते, तिथे ठाम भूमिका घेऊन प्रतिकार करणे हाच सहिष्णुतेचा खरा अर्थ आहे.

हिंदूंनी आणि समाजातील प्रत्येक सजग नागरिकाने संघटित व्हावे, कारण हिंदू संघटन हे कुठल्याही गैरहिंदूंच्या विरोधात नसून हिंदू समाज आणि सनातन संस्कृती यांच्या उत्कर्षासाठी उचललेले एक सकारात्मक पाऊल होय. असे करणे ही स्वाभिमानाची शिस्त आहे. सामाजिक जागृती म्हणजे उन्माद नव्हे; ती सत्याची मशाल आहे. सजग व्हावे, कारण सजगता म्हणजे कायद्याबाहेर जाणे नव्हे; तर कायद्याला बळ देणे आहे. विचारांनी, शब्दांनी आणि कृतींनी परंतु संविधानाच्या चौकटीत कट्टरतेला थोपवणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे.

आपण इतिहासातून काही शिकणार आहोत का, की पुन्हा पुन्हा त्याच चुका करणार? ज्या आगी आज सीमापार पेटतात, त्या उद्या आपल्या अंगणात येऊ शकतात हे भाकीत नाही, हा अनुभव आहे. इकडे बांगलादेशातील हिंदू असुरक्षित आहे ही लाट भारतात यायला वेळ लागणार नाही, आज बांगलादेशातील हिंदू जात्यात आहे तर भारतातला हिंदू सुपात आहे. आपला समाज स्वतःच्या घराला आग लागण्याची का वाट बघतो आहे? शेजारी लागलेली आग आज आपण विझवायला बाहेर आलो नाही तर उद्या तीच आग आपल्याही घराला लागू शकते तेव्हा आपण समाजाकडून काहीही अपेक्षा ठेवू शकणार नाही. म्हणूनच शिक्षण, संवाद, सामाजिक एकजूट आणि कायदेशीर ठामपणा या चार दिशांनी एकाच वेळी पावले टाकावी लागतील. पीडितांसाठी आवाज बुलंद करावा लागेल, असत्याचा मुखवटा फाडावा लागेल आणि मजहबी कट्टर जिहादी उन्मादाला चोख प्रत्युत्तर द्यावे लागेल.

**विवेक गडकर**/९३७०३२४१०५

### रामदर्शनाने फरक पडेल

'संसद अधिवेशनाचे फलित आणि बोध' हा २० डिसेंबरचा अग्रलेख वाचला. २०१४ पासून काँग्रेससह सर्वच विरोधी पक्षनेत्यांना हिंदू धर्म आणि रामद्वेषाने एवढे पछाडलेले आहे की त्यांचे हे भूत उतरवणे सोपे नाही. हिरवा चष्मा घातलेल्या माणसाला जसे सगळे जग हिरवे दिसते, तसेच रामद्वेषाची कावीळ झालेल्या विरोधी पक्षांना सगळीकडेच प्रभू श्रीराम दिसू लागले आहेत. त्यांचा हा रोग पराकोटीचा वाढला आहे. एखाद्या योजनेला बापूंचे किंवा गांधी नेहरू परिवारातील एखाद्या सदस्याचे नाव दिले की भ्रष्टाचार करणाऱ्यांना भ्रष्टाचाराचे कुरण चरायला मोकळे मिळते, अशी सवय झालेल्या भ्रष्टाचाऱ्यांना प्रभू श्रीराम यांचे नाव कसे चालेल? कोणत्याही विषयावर संसदेत गोंधळ घालून करदात्यांचे पैसे वाया घालवणे एवढेच काम विरोधकांना राहिलेले आहे.

यावर एक उपाय सुचवावासा वाटतो. लोकसभा आणि राज्यसभेच्या सर्वच विरोधी पक्षनेत्यांनी एकदा अयोध्येला जाऊन प्रभू श्रीराम यांचे मनोभावे दर्शन घेतले तर काही नेत्यांच्या वर्तणुकीत सकारात्मक बदल घडू शकतो. ते करूनही जर काही बदल घडला नाही तर विरोधी पक्षनेते जन्मोजन्मीचे कपाळकरंटे, कर्मदरिद्री आणि गलितगात्र आहेत असे समजून, त्यांच्या सगळ्या तमाशांकडे सरकारने संपूर्ण दुर्लक्ष करावे. कोणत्याही विरोधी पक्षनेत्यांनी केलेल्या वक्तव्यांना किंमत देऊ नये, प्रतिसाद देऊ नये आणि जनहितार्थ कामांसाठी संसदीय अधिवेशनाच्या वेळेचा सदुपयोग करावा. 'साथ दोगे तो साथ लेकर वरना तुम्हारे बगैर' हे धोरणच सद्यस्थितीत सरकारला साहाय्यभूत ठरेल.

**शिवराम वैद्य**/९८५०५१८०१८

### जन संगोष्ठीतून लोकांचे मत परिवर्तन शक्य

समाजात परिवर्तन झाल्याशिवाय समाज एकसंध कसा होईल? राष्ट्र सामर्थ्यशाली कसे बनेल? यासाठी काही तथ्ये आणि पथ्याचे भान ठेवणे तितकेच गरजेचे ठरते. समाजाकडून योग्य दिशेने आणि प्रामाणिकपणे सत्य प्रयत्न करण्यामुळेच समाजातील तेढ कमी होईल. यासाठी योग्य दिशेने समाजात परिवर्तन झाले, नागरिकांमध्ये कर्तव्य जाणीव झाली पाहिजे. स्वदेशी तत्त्वांचे पालन करायला पाहिजे. मात्र हे स्व पासून सुरुवात केल्याशिवाय अशक्य आहे. प्रत्येक नागरिक आपल्या हक्काबद्दल सजग असतोच ना! ही तथ्ये विचारात घेतली, तरी प्रत्येक नागरिकाने आपल्या कर्तव्याचे प्रामाणिकपणे पालन करायला नको का? नागरिकांच्या कर्तव्याच्या संदर्भात उदाहरणादाखल राष्ट्रीय कर्तव्य समजून मतदान करणे आवश्यक आहे. यातच खरे नागरिकत्व दडले आहे. नागरी कर्तव्याची जाणीव झाल्याशिवाय कुटुंब प्रबोधनाचे खरे कार्य कसे करता येईल? खरे तर आपण संस्कृतीचे रक्षक असल्यामुळे तिचे रक्षण करणे हे आद्य कर्तव्य समजायला पाहिजे. यासाठीच कुटुंबाचे प्रामाणिकपणे प्रबोधन करणे आवश्यक असते. याचमुळे कुटुंबाला समाज जीवनाची शाश्वत पाठशाळा म्हटले आहे. परंतु कुटुंब प्रबोधनाची सुरुवात स्व पासून झाली पाहिजे. कुटुंबात जाणीव जागृती झाल्यास समाजातील द्वेष, तिरस्कार मत्सर, कमी होऊन कुटुंब खऱ्या अर्थाने समाज जीवनाची पाठशाळा बनेल आणि ती बळकट आणि मजबूत राष्ट्रीय एकात्मतेसाठी आवश्यक आहे. आणि हे स्व प्रबोधनांसोबत दुसऱ्यांना सहकार्य करणे देशनिष्ठा ठरेल.

**प्रा. कमलाकर हणवंते**/९४२३६५४२८६

### मानसिक आरोग्यासाठी ध्यानधारणा

आज २१ डिसेंबर हा दिवस जागतिक ध्यान दिन म्हणून साजरा केला जातो. जागतिक ध्यान दिन संपूर्ण जगात साजरा केला जावा, या उद्देशाने संयुक्त राष्ट्रसंघात मसुदा तयार करून प्रस्तावासाठी पाठविण्यात आला होता. लिकेस्टिन, श्रीलंका, नेपाळ, मेक्सिको आणि एडेरा या देशांच्या समूहाने १९३ सदस्य असलेल्या संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेत जागतिक ध्यान दिवस या शीर्षकाच्या प्रस्तावाला सर्वानुमताने पारित करण्यासाठी प्रयत्न केले होते. शारीरिक आणि मानसिक आरोग्याच्या दृष्टीने ध्यान हे मानवी जीवनासाठी अत्यंत गरजेचे आहे. आजच्या धकाधकीच्या जीवनात शारीरिक विश्रांती, मानसिक आणि भावनिक शांतीसाठी ध्यान करणे हितावह ठरते. ध्यानामुळे चिंता, नैराश्य, रक्तदाब कमी करणे, शारीरिक वेदनेवर मात करणे किंवा



व्यवस्थापित करण्यासाठी ध्यान मोलाची भूमिका बजावते. ध्यान केवळ विश्रांतीसाठीच नव्हे, तर जीवनाला एक नवीन दिशा देण्यासाठी आवश्यक आहे. ध्यानाच्या नियमित सरावामुळे आपले मन वर्तमानावर केंद्रित राहते आणि भविष्यकाळातील चिंतेपासून दूर राहता येते. जीवनातील सर्व आव्हानांचा सामना करण्यासाठी आणि मानसिक शांती मिळविण्यासाठी आणि नियमितपणे ध्यान करणे अत्यंत महत्त्वाचे ठरते. ध्यानामुळे निव्वळ वैयक्तिक फायदाच नव्हे तर ध्यान सहानुभूती, सहयोग आणि सामाजिक उद्देशांची भावना वृद्धिंगत करते, असे जागतिक आरोग्य संघटनेने मान्य केले आहे. म्हणून गतवर्षीपासून २१ डिसेंबर हा दिवस जागतिक ध्यान दिवस म्हणून संपूर्ण जगभरात साजरा केला जातो.

बदलती जीवनशैली व वाढत्या ताण-तणावामुळे आज आत्महत्येचे प्रमाण वाढलेले दिसून येते. या वाढत्या आत्महत्येवर समुपदेशनासोबतच मानसिक आरोग्यासाठी ध्यान करणे तेवढेच महत्त्वाचे ठरत असते. त्यामुळे शरीरातील कोर्टीसॉल या स्ट्रेस हार्मोनची पातळी कमी होते. ज्यामुळे मानसिक शांती लाभते. ध्यानामुळे सकारात्मक विचार वृद्धिंगत होतात. परिणामी नैराश्य ताणतणाव कमी होण्यास मदत मिळते. स्वतःच्या विचारांकडे आणि भावनांकडे तटस्थ पाहण्याची दृष्टी विकसित होते. आज मानसिक तणावामुळे आपल्या नियमित कार्यांवर लक्ष केंद्रित करण्यासाठी ध्यानधारणेसारखा दुसरा सुलभ मार्ग नाही. एकंदरीत ध्यानधारणा म्हणजे तुमचे मन एकाग्र करण्यासाठी किंवा शांत करण्यासाठी, जाणीवपूर्वक लक्ष केंद्रित करण्यासाठी; एक प्रक्रिया आहे. ज्यात श्वासांवर किंवा एखाद्या विशिष्ट गोष्टींवर लक्ष केंद्रित केले जाते. ज्यामुळे मानसिक तणाव कमी होतो आणि आत्मिक शांती व जागरूकता वाढते. म्हणूनच आपल्या देशात ध्यानाला आध्यात्मिक व हजारों वर्षांची पौराणिक काळात सुद्धा महत्त्वाचे स्थान होते.

**शशिकांत तोटे**/९१३०८३५४५८

## आजचे संघगीत-७९

रविवार, २१ डिसेंबर २०२५

### भारत अमुचा असे अम्हाला प्राणाहुनिही प्यार

भारत अमुचा असे आम्हाला प्राणाहुनिही प्यार
या देशाच्या कणाकणास्तव वाहिल शोणित धार ॥धृ॥

ब्रीद आमुचे जरी शांतिचे
इथे तळपती सूर्य क्रांतिचे
नसात खेळे रक्त शिवाचे
या भूमीवर दानवतेचे बीज न कधि रुजणार ॥१॥

ईश्वर अमुचा भोळा शंकर
क्षणात होइल परि प्रलयंकर
कंपित होइल धरणी, अंबर
हिमालयाच्या बर्फातुनही उफाळेल अंगार ॥२॥

विश्वबंधुता इथली शिकवण
मानवता हे इथले जीवन
दुष्टांचे परि येथे मर्दन
होतिल त्यांच्या समिधा जे जे येतिल करण्या वार ॥३॥

इतिहासाच्या पानोपानी
इथे स्फूर्तिच्या अक्षय खाणी
दुबळी नच ही भारत जननी
अणूअणूतुन इथे शक्तिचा-घडेल आविष्कार ॥४॥

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# जिल्हयात पालिका निवडणूकीत भाजपा, शिंदे सेना, अजित पवार गटास मिळाले यश



## जिंतूर व सेलूत भारतीय जनता पक्षाचा झेंडा फडकला

### जिंतूर पालिका अध्यक्षपदी देशमुख यांचा ३१६७ मतांनी दणदणीत विजय

**रामप्रसाद कंठाळे**

**जिंतूर,/प्रतिनिधी-** नगरपरिषद निवडणूक २०२५ चा निकाल जाहीर होताच शहराच्या राजकारणात मोठी उलथापालथ पाहायला मिळाली. अध्यक्षपदाच्या थेट निवडणुकीत भारतीय जनता पक्षाचे उमेदवार प्रताप देशमुख यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या सबिया बेगम कफिल फारुकी यांचा पराभव करत ३१६७ मतांनी दणदणीत विजय मिळवला आहे.

प्रताप देशमुख यांना एकूण १३,१२२ मते मिळाली, तर सबिया बेगम कफिल फारुकी यांना ९,९५५ मते प्राप्त झाली. या निकालामुळे नगरपरिषदेत भाजपाचे वर्चस्व अधिक मजबूत झाले आहे.

प्रभागनिहाय निकाल असा

नगरपरिषद निवडणुकीत एकूण १२ प्रभागांमध्ये विविध पक्षांना यश मिळाले असून राजकीय समतोल पाहायला मिळाला.

प्रभाग क्रमांक १: राष्ट्रवादी काँग्रेस १, भाजपा १

प्रभाग क्रमांक २: काँग्रेस, प्रभाग क्रमांक ३: भाजपा

प्रभाग क्रमांक ४: भाजपा, प्रभाग क्रमांक ५: काँग्रेस

प्रभाग क्रमांक ६: भाजपा, प्रभाग क्रमांक ७: भाजपा

प्रभाग क्रमांक ८: भाजपा, प्रभाग क्रमांक ९: राष्ट्रवादी काँग्रेस

प्रभाग क्रमांक १०: राष्ट्रवादी काँग्रेस

प्रभाग क्रमांक ११: भाजपा, प्रभाग क्रमांक १२: भाजपा

या निकालानुसार भाजपाला सर्वाधिक प्रभागांमध्ये यश मिळाले असून नगरपरिषदेत भाजपाचा प्रभाव स्पष्टपणे दिसून येतो.

### सेलू, जिंतूर - भाजपा १, पाथरी शिंदे सेना १, मानवत, गंगाखेड अजित पवार गटास १ तसेच पूर्णेतील यशवंत सेनेस १, सोनपेठ मधील परिवर्तन आघाडी १ जागा मिळविण्यात यश


**मोहन धारासूरकर**

**परभणी,/प्रतिनिधी-** जिल्हयातील सात नगरपालिका निवडणूकीचा निकाल रविवार दि.२१ डिसेंबर रोजी लागला असून यामध्ये भाजपास २, शिंदे सेनेस १ , अजित पवाद गटास २ तर अन्य पॅनलच्या उमेदवारास २ जागा मिळविण्यात यश आले असून जनतेने यावेळी दिलेला निकाल संमिश्र असा ठरला असून कोणत्याही एका मोठया पक्षास यश मिळाले नाही.

जिल्हयात स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणूकांचा कार्यक्रम जाहिर होताच पहिल्या टप्यात जिल्हयातील सातही नगरपालिका निवडणूकीचा कार्यक्रम दि.१० नोंव्हेंबर रोजी निवडणुक आयोगाच्यावतीने जाहिर करण्यात आला होता. त्याअनुषंगाने दि.१७ नोव्हेंबर पासून उमेदवारी अर्ज दाखल करण्यास सुरुवात झाली होती. याशिवाय उमेदवारी अर्ज मागे घेणे, अंतिम उमेदवार यादी, तसेच चिन्हांचे वाटप दि.२६ नोव्हेबर रोजी अंतिम होते. त्यानंतर २७ नोव्हेंबर पासून पालिका निवडणूकीसाठी उभे टाकलेले नगराध्यक्ष तसेच नगरसेवक यांनी आपचा प्रचार सुरु केला. यावेळी काही ठिकाणी प्रचारावेळी छोटया-मोठया घटना घडल्या.त्यानंतरही दि.२ डिसेंबर रोजी मतदार प्रक्रिया पार पडली. तसेच दि.३ डिसेंबर रोजी निकाल जाहिर होणार होता परंतू निवडणूक आयोगाच्या निर्णयानंतर हा निकाल दि.२१ डिसेंबर रोजी जाहिर झाला.

यावेळी जिल्हयात महाविकास आघाडी व महायुती यांच्यात संघर्ष होणार होता. परंतू महाविकास आघाडीतील वाद व महायुतीतील वाद याचा लाभ त्यांना यावेळी घेता आला नाही. त्याचा परिणाम त्यांना मोठया प्रमाणात जाणवला.

याप्रसंगी जिल्हयाच्या पालकमंत्री मेघना साकोरे यांच्या बालेकिल्ला म्हणजेच जिंतूर व सेलू याठिकाणी त्यांना नगराध्यक्ष पदाचे उमेदवार प्रताप देशमुख यांना ११६७ व सेलूतील उमेदवार मिलिंद सावंत यांनी ३१७ मतांनी विजय मिळविता आला. यशिवाय जिंतूर मधील एकूण १२ प्रभागातील २५ जागांवर भारतीय जनता पक्षास १६, राष्ट्रवादी अजित पवार गट ५ तर काँग्रेस पक्षास ४ जागा मिळविण्यात यश आले आहे.




तसेच सेलूतील २५ जागांपैकी भारतीय जनता पक्षास १४, कॉंग्रेस ७ ,शिवसेना शिंदे गट ४ व अन्य १ अशा जागा मिळविण्यात आल्या आहेत. दरम्यान जिंतूर व सेलूमध्ये भारतीय जनता पक्षाचा बोलबाला झालेला दिसून येत आहे.

तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पाथरीत असलेली तब्बल ३५ वर्षापासून माजी आ. बाबाजानी दुर्राणी यांची सत्ता संपूष्टात आणली असून याठिकाणी आसेप खान यांना यांनी जुनेद दुर्राणी यांचा चांगलीच टक्कर दिली असून शेवटच्या दोन प्रभागातच खान यांना विजय मिळविण्यात आला. याठिकाणी काँग्रेस पक्षास १२, शिवसेना शिंदे गटास ९ राष्ट्रवादी अजित पवार गटास २ जागा मिळविण्यात आले आहे.

मानवत नगरपालिकेचे अजित पवार गटाचे नगराध्यक्षपदाचे उमेदवार सौ.राणी अंकुश लाड यांनी तब्बल ५३९१ मतांनी विजय मिळविला. याशिवाय एकूण ११ प्रभागात २२ जागापैकी राष्ट्रवादी अजित पवार गटास १६, शिवसेना शिंदे गटास ४, भाजपा १ शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे गटास १ जागा मिळविण्यात यश आले आहे. तर सोनपेठ नगरपरिषद निवडणूकीत तब्बल २५ वर्षापासून असलेली सत्ता पालट करित परिवर्तन आघाडीचे उमेदवार परमेश्वर कदम यांनी ३०५ मतांनी विजय मिळविला असून यावेळी पालिकेतील एकूण १० प्रभागातील २० जागावर राष्ट्रवादी अजित पवार गटास १२ तर शहर विकास आघाडीस ८ जागा मिळविण्यात यश आले आहे. आ.राजेश विटेकर यांना मात्र त्यांच्याच तालुक्यात नगराध्यक्ष पद राखता आले नाही. मात्र नगरसेवकांची संख्या जास्त निवडूण आणण्यात त्यांना यश मिळाले आहे.

अशीच काही परिस्थीती गंगाखेड व पूर्णा तालुक्यात अनुभवयास मिळाली आहे. याठिकाणी देखील गंगाखेड पालिकेत यशवंत सेना व शहर विकास आघाडीचे उमेदवार यांनी आपले वर्चस्व दाखवले खरे परंतू सौ.उर्मिला मधूसुदन केंद्रे यांनी ६७८ मतांनी विजय मिळविला आहे. तसेच यावेळी पक्षीय बलाबलाची संख्या नुसार एकूण १३ प्रभागातील २६ जागा असून यात शहर विकास आघाडी यशवंत सेना १५, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट ७, शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे गटास ३ व भाजपा १ असे जागा पटकाविण्यात यश आले आहे.

तर पूर्णा पालिका निवडणूकीत यशवंत सेनेचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार विमल लक्ष्मण कदम यांनी दहाव्या पेरी अखेर १६११ मतांची आघाडी घेवून विजय मिळविण्यात यशस्वी झाल्या आहेत.

दरम्यान या जिल्हयातील सातही पालिका निवडणूकीचा स्ट्राईक रेट पाहता भारतीय जनता पक्ष, शिंदे यांची शिवसेना व राष्ट्रवादी अजित पवार गटास जागा मिळविण्यात यश आले आहे. तर अन्य ठिकाणी संमिश्र प्रतिसाद मिळालेला दिसून येत आहे.



## पूर्णेत सौ.कदम यांचा ३२४ मतांनी विजय

**संपत तेली**

**पूर्णा,/प्रतिनिधी-** पूर्णा नगरपालिकेच्या नगराध्यक्षपदी आमदार डॉ. रत्नाकर गुट्टे पुरस्कृत यशवंत सेनेच्या विमलबाई लक्ष्मणराव कदम या विजयी झाले असून त्यांनी उबाठाच्या प्रेमला संतोष एकलारे यांचा ३२४ मतांनी पराभव केला आहे पूर्णा नगरपालिकेच्या सार्वजनिक निवडणुकीची मतमोजणी २१ डिसेंबर रविवार रोजी पूर्णा तहसील कार्यालयात सकाळी दहा वाजता निर्वाचन अधिकारी माधवराव बोथीकर यांच्या उपस्थितीत घेण्यात आली दुपारी तीन पर्यंत सर्व निवडणुकीचे निकाल जाहीर झाले होते यामध्ये पूर्णा नगराध्यक्षपदाच्या निवडणुकी यशवंत सेनेच्या विमलबाई लक्ष्मणराव कदम या विजयी झाल्या असून त्यांना ६७७४ मते मिळाली त्यांनी ३२४ मतांनी विजय मिळविला तर पराभूत उमेदवार प्रेमला संतोष एकलारे यांना ६४५० मते मिळाली तर तिसऱ्या क्रमांकावर भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या शेख हसीना बेगम लतीफ यांना ५४८१ मते मिळाली तसेच नगरसेवक पदा च्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाला दोन, काँग्रेस सहा, यशवंत सेना सात, उद्धव बाळासाहेब ठाकरे गट दोन ,शिवसेना दोन, अपक्ष दोन, जनता सेक्युलर दोन अशा प्रमाणे उमेदवार विजयी झाले यामध्ये प्रभाग एक अ मध्ये जोहराबी अहमद गौस भारतीय राष्ट्रीय काँग्रेस १५२७ विजयी झाल्या,एक ब मधून जाकीर रेहमुद्दीन कुरेशी १२३३ मते विजयी झाले, प्रभाग नंबर दोन अ मधून मीरा विश्वनाथ होळकर यशवंत सेनेच्या ४४३ तर ब मधून भारतीय जनता पक्षाचे लक्ष्मीकांत गंगाराम कदम ४६० मध्ये विजयी झाले, प्रभाग क्रमांक तीन अ राजनंदिनी दादाराव पंडित उबाठा ६०३ मते घेऊन विजयी झाले,प्रभाग क्रमांक तीन ब मधून उबाठा शेख रौफ शेख मेहबूब ७९७ मध्ये घेऊन विजयी झाले प्रभाग क्रमांक चार अ मधून उत्तम मुगाची खंदारे अपक्ष ८६० मते घेऊन विजयी झाले चार ब मधून अपक्ष जनाबाई ज्ञानोबा जोंधळे ६६६ मते घेऊन विजयी झाले, प्रभाग क्रमांक पाच अ मधून मुकुंद विठ्ठल भोळे यशवंत सेना ६९८ मते घेऊन विजयी झाले तर प्रभाग क्रमांक पाच ब मधून अर्चना मिलिंद कांबळे यशवंत सेनेच्या १३१२ मते घेऊन विजयी झाले. प्रभाग क्रमांक सहा अ मधून वंदना सत्यभान कुलदीपके काँग्रेसच्या ८२२ मध्ये घेऊन विजयी झाल्या तर ब मधून यशवंत सेनेच्या मुजीब अब्दुल हबीब १०४७ मध्ये घेऊन विजयी झाले प्रभाग सात अ मधून यशवंत सेनेच्या लक्ष्मीकांत विष्णुकांत भालेराव १५३९ मध्ये घेऊन विजयी झाले तर सात ब मधून मीनाक्षीबाई विजय कुमार कदम शिवसेनेच्या १३८२ घेऊन विजयी झाले प्रभाग आठ अ मधून प्रेमला भगवान सोळंके भाजपच्या १०१६ मते घेऊन ईश्वर शिट्टीने विजय झाल्या आठ ब मधून पूजा सचिन कदम शिवसेनेच्या ९७८ मते घेऊन विजयी झाल्या प्रभाग नऊ मधून पद्मिनी नामदेव एंगडे काँग्रेसच्या २२६६ मते येऊन विजयी झाले प्रभाग ९ ब मधून हाजी खलील कुरेशी काँग्रेस २१५८ मते घेऊन विजयी झाले नऊ क मधून शमीम बेगम शेख शरीफ काँग्रेस १९७९ मध्ये घेऊन विजयी झाले प्रभाग १० अ मधून कौशल्या मारुती भोसले यशवंत सेनेच्या ६३५ मध्ये विजय झाल्या तर ब मधून सुनील लक्ष्मण जाधव यशवंत सेनेचे १११८ मते घेऊन विजयी झाल्या ११ अ मधून रेखा अनिल खर्ग खराटे जनता दल सेक्युलरच्या ११२० मते मिळाली तर ब मधून प्रकाश बन्सी कांबळे जनता दल सेक्युलर १०९९ मध्ये घेऊन विजयी झाले मतमोजणी प्रक्रिया सुरळीत व शांततेत त पार पडली.

**प्रभाग क्रमांक आठ अ मधून दोन्हीही उमेदवारांना समसमान मते मिळाल्यामुळे निवडणूक अधिकाऱ्यांनी दोन्ही उमेदवारांना बोलावून चिठ्ठी काढून विजय घोषित केले. यामध्ये भारतीय जनता पक्षाचे उमेदवार प्रेमला भगवान सोळंके या विजयी झाल्या.**



## सेलू पालिका निवडणूकीत गड आला पण सिंह गेला

### सेलू नगराध्यक्षपदासाठी मिलिंद सावंत ३१७ मतांनी विजयी

**सेलू,/प्रतिनिधी:** सेलू नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणूक २०२५ मध्ये सेलू नगर परिषदेवर भाजपाचा एक हाती झेंडा फडकला असून एकूण २६ पैकी १४ जागेवर भारतीय जनता पक्षाचे उमेदवार निवडून आले आहेत. मात्र भारतीय जनता पक्षाचे पॅनल प्रमुख विनोद बोराडे यांचा पराभव झाल्यामुळे भाजपचा गड आला पण सिंह गेला अशीच म्हणण्याची वेळ आली आहे.

सेलू नगर परिषदेच्या एकूण १३ प्रभागातील २६ नगरसेवक पदाच्या निवडणुकीत तब्बल १४ जागेवर भारतीय जनता पक्षाचे नगरसेवक निवडून आले आहेत तर काँग्रेसचे सात नगरसेवक व शिवसेना शिंदे गटाचे चार तर एक अपक्ष अशी परिस्थिती सेलू नगर परिषदेत निर्माण झाली असून काँग्रेस चे पॅनल प्रमुख हेमंतराव आडळकर यांच्या पत्नी सौ महानंदा आडळकर तसेच माजी नगराध्यक्ष व त्यांचे पुत्र पवन राजे आडळकर यांनी देखील एक हाती विजय मिळवला आहे.

भारतीय जनता पक्षाचे अध्यक्ष पदाचे उमेदवार मिलिंद सावंत यांना १३९६० तर त्यांचे प्रतिस्पर्धी काँग्रेसचे अध्यक्ष पदाचे उमेदवार आत्माराम साळवे यांना १३६४६ एवढी मते





मिळाली त्यामुळे मिलिंद सावंत हे ३१७ मतांनी विजयी झाले आहेत.

सकाळी दहा वाजता मतमोजणीस प्रारंभ झाला. मतमोजणीच्या एकूण पाच फेऱ्या झाल्या. दुपारी एकच्या सुमारास पाचही फिर्यातील व १३ प्रभागातील २६ उमेदवारांची मतमोजणी पूर्ण होऊन निकाल जाहीर करण्यात आला. त्यात भारतीय जनता पक्षाला १४ जागेवर यश मिळाले त्यामुळे भाजपाला स्पष्ट बहुमत देखील मिळाले मात्र. भारतीय जनता पक्षाचे पॅनल प्रमुख व गेल्या २५ वर्षापासून नगरपरिषदेत आपले अधिराज्य गाजवणारे विनोद बोराडे हे मात्र पराभूत झाले आहेत. त्यांना काँग्रेसचे मिलिंद पवार यांनी ८८२ मते घेत विनोद बोराडे यांचा ११५ मतांनी पराभव केला. त्यामुळे भारतीय जनता पक्षाचे पॅनल प्रमुख व माजी नगराध्यक्ष विनोद बोराडे यांचा पराभव झाल्यामुळे सेलू नगर परिषदेवर भारतीय जनता पक्षाची सत्ता आली असली तरीही गड आला पण सिंह गेला असेच म्हणावे लागेल. त्यामुळे भारतीय जनता पक्षाला मोठा धक्का बसलेला आहे.

तर काँग्रेस पक्षाला एकूण सात जागावर विजय प्राप्त करता आला त्यात महत्त्वाचे म्हणजे काँग्रेसचे बॅनर प्रमुख हेमंतराव आडळकर यांच्या पत्नी सौ महानंदा आडडळकर या पहिल्यांदाच तर त्यांचे चिरंजीव माजी नगराध्यक्ष पवनराजे आडळकर यांचा प्रभाग १० मधून दणदणीत विजय झाला.

प्रभाग एक हा देखील एक महत्त्वाचा प्रभाग म्हणून संबोधल्या गेला असून प्रभाग एक ब प्रभागातून विनोद बोराडे यांचे पुतणे साईराज मुकेशराव बोराडे हे विजयी झाले असून त्यांना ८३५ मते मिळाली आहेत.

तर शिवसेना शिंदे गटाला चार जागी विजय मिळाला असून संदीप लहाने, डॉ अनिकेत जोगदंड, श्रीमती देवधर, यांचा विजय झाला असून भारतीय जनता पक्षाने तिकीट न दिल्यामुळे अपक्ष म्हणून उभे राहिलेले कपिल फ लारी हे देखील विजयी झालेले आहेत.




## गंगाखेड नगराध्यक्ष पदाच्या निवडणूकीत राष्ट्रवादी पवार गटाच्या सौ. उर्मिला केंद्रे विजयी

### विद्यमान आमदार डॉ. रत्नाकर गुट्टे यांच्या शहर विकास आघाडीस सदस्य पदाच्या निवडणूकीत बहुमत : भारतीय जनता पार्टीचा धुव्वा

**गंगाखेड,/प्रतिनिधी-** गंगाखेड येथील नगर पालिकेंतर्गत नगरध्यक्ष पदाच्या निवडणूकीत राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे माजी आमदार डॉ. मधुसुदन केंद्रे यांच्या सौभाग्यवती सौ. उर्मिला मधुसूदन केंद्रे यांनी त्यांच्या विरोधक तथा विद्यमान आमदार डॉ. रत्नाकर गुट्टे यांच्या नेतृत्वाखालील शहर विकास आघाडी यशवंत सेनेच्या सौ. निर्मलादेवी गोपालदास तापडिया यांचा ६७८ मतांनी पराभव केला.

येथील नगराध्यक्ष पदाच्या निवडणूका चौरंगी झाल्या. या निवडणूकीत माजी आमदार डॉ. केंद्रे व विद्यमान आमदार डॉ. गुट्टे यांची राजकीय प्रतिष्ठा पणास होती. या प्रतिष्ठेच्या व अटीतटीच्या लढतीत कोण बाजी मारणार या विषयी उत्कंठता निर्माण झाली होती. अखेर अध्यक्ष पदाच्या निवडणूकीत सौ. उर्मिला केंद्रे यांनी त्यांच्या प्रतिस्पर्धी सौ. निर्मला तापडिया यांचा ६७८ मतांनी पराभव केला. सौ. केंद्रे यांना १००५४ तर सौ. तापडिया यांना ९३७६ मते मिळाली. या निवडणूकीत काँग्रेसच्या उजमा माईन समीर शेख युनुस नेते यांनी ६ हजार २४२ मते मिळविली. तर भारतीय जनता पार्टीच्या सौ. जयश्री रामप्रभु मुंडे यांना ६२२१ मते मिळाली. अपक्षा श्रीमती कमलाबाई गिर यांना २५९ मते मिळाली. या व्यतिरिक्त नोटा २०५ मते मिळाली.

सदस्य पदाच्या निवडणूकीत एकूण १३ प्रभागात २६ जागांपैकी डॉ. गुट्टे यांच्या नेतृत्वाखालील शहर विकास आघाडी यशवंत सेनेने १५, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाने ७ तर शिवसेना उबाठा गटाने ३ व भारतीय जनता पार्टीने केवळ १ जागी यश मिळविले आहे. या सदस्य पदाच्या निवडणूकीत भारतीय जनता पार्टी व काँग्रेसचा मोठा धुव्वा उडाला.

## मानवत नगराध्यक्ष पदाच्या निवडणूकीत सौ. राणी अंकुश लाड प्रचंड मताधिक्याने विजयी

**महेश दिशागत**



**मानवत,/प्रतिनिधी:** मानवत नगरपालिकेंतर्गत नगराध्यक्ष पदाच्या निवडणूकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गटाचे उमेदवार सौ. राणी अंकुश लाड यांनी शिवसेना शिंदे गटाच्या उमेदवार सौ. अंजली महेश कोक्कर यांचा ५ हजार ३९१ एवढ्या मोठ्या मताधिक्याने पराभव केला. येथील प्रभागनिहाय लढतीत सुध्दा राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे विद्यमाने आमदार राजेश विटेकर व माजी नगराध्यक्ष अंकुश लाड यांचे बहुतांशी समर्थक सदस्य निवडून आले आहेत.

मानवत येथील तहसील कार्यालयाच्या सभागृहात आज रविवार रोजी सकाळी १० वाजेच्या सुमारास नगराध्यक्षांसह सदस्य पदाकरीता निवडणूकीतील मतमोजणीस प्रारंभ झाला. नगराध्यक्षपदासाठी दुरंगी लढतीत सौ. लाड यांना १४ हजार ५८७ तर त्यांच्या प्रतिस्पर्धी सौ. कोक्कर यांना ९ हजार १९६ एवढी मते मिळाली. त्यात सौ. लाड ५ हजार ३९१ मतांनी विजयी झाल्या. दरम्यान, या पालिकेंतर्गत सदस्य पदाच्या निवडणूकीतसुध्दा राष्ट्रवादी अजित पवार गटाने स्वतःचे वर्चस्व कायम राखले. या निवडणूकीत ११ प्रभागात २२ जागांकरीता प्रतिष्ठेच्या लढती झाल्या. परंतु, विटेकर व लाड गटाने २२ पैकी १६ जागा पटकावल्या. विरोधकांना म्हणजे शिवसेना शिंदे गटास ४, भारतीय जनता पार्टीस १, शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे गटास १ जागा मिळाली...

## २५ वर्षांची सत्ता उलथवली;परिवर्तन आघाडीच्या कदम यांची मुसंडी!

**बाबासाहेब गर्जे**

**सोनपेठ ,/प्रतिनिधी-** नुकत्याच पार पडलेल्या सोनपेठ नगरपालिकेच्या निवडणुकीतील निकाल धक्कादायक लागला असून मागील तब्बल २५ वर्षांपासून सत्तेवर असलेल्या चंद्रकांत राठोड यांच्या राजकीय वर्चस्वाला परिवर्तन आघाडीचे उमेदवार परमेश्वर कदम यांनी जबर धक्का दिला आहे.या निवडणुकीत नगराध्यक्ष पदाच्या सर्वच राजकीय पक्षाचा, परिवर्तन आघाडीचे परमेश्वर कदम यांनी पराभव करत संपूर्ण तालुक्यात राजकीय खळबळ उडवून दिली आहे.

सोनपेठ नगर परिषदेवर मागील २५ वर्षापासून राष्ट्रीय काँग्रेस पक्षामध्ये राहून चंद्रकांत राठोड यांनी एक हाती सत्ता राखली होती. परंतु यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) पक्षाच्या घड्याळाच्या चिन्हावर आपल्या २० नगरसेवकांसह नगराध्यक्ष पदाची निवडणूक लढवली होती. या निवडणुकीमध्ये त्यांनी आमदार राजेश विटेकर यांचे नेतृत्वाखाली निवडणुकीची मोर्चे बांधणी करून अतिशय चुरशीने निवडणूक लढवली होती. परंतु यावेळी नगराध्यक्ष पदासाठी चंद्रकांत राठोड यांना निसटता पराभव पत्करावा लागला. विशेष



म्हणजे हा पराभव राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार राजेश विटेकर यांच्यासाठी मोठा धक्का मानला जात आहे. नगराध्यक्ष पदाचे उमेदवार परमेश्वर कदम यांनी

### चंद्रकांत राठोड यांचा पराजय, आ.राजेश विटेकर यांना राजकीय धक्का!

३०५ मताने आघाडी घेऊन विजय मिळवला. यात चंद्रकांत राठोड यांना ५६७८ तर परमेश्वर कदम यांना ५९८३ मते मिळाली. चंद्रकांत राठोड यांनी गेल्या २५ वर्षांत स्थानिक स्वराज्य संस्थांवर आपले वर्चस्व टिकवून ठेवले होते.मात्र यावेळी जनतेच्या परिवर्तनाच्या अपेक्षा आणि राष्ट्रवादी पक्षाचा कंटाळा या कारणांमुळे मतदारांनी परिवर्तन आघाडीला संधी दिल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.

परमेश्वर कदम यांनी प्रचारादरम्यान युवकांचे प्रश्न आक्रमकपणे मांडले. ''सत्ता नव्हे तर सेवा''हा संदेश थेट मतदारांपर्यंत पोहोचवण्यात ते यशस्वी ठरले.त्याचा थेट परिणाम मतपेटीत दिसून आला. या पराभवामुळे राष्ट्रवादी काँग्रेसच्या गटात अस्वस्थता पसरली आहे.दरम्यान विजयानंतर परमेश्वर कदम समर्थकांनी गावात जल्लोष केला. ''हा विजय सर्वसामान्य जनतेचा आहे,'' अशी प्रतिक्रिया देत कदम यांनी मतदारांचे आभार मानले.यावेळी १० प्रभागातील २० सदस्यांचा निकालही जाहीर करण्यात आला यात राष्ट्रवादी काँग्रेसचे चंद्रकात राठोड यांच्या पॅनेलचे १२ तर परमेश्वर कदम यांच्या पॅनेलचे ८ सदस्य निवडून आले आहेत. या निकालामुळे तालुक्यातील राजकीय समीकरणे बदलण्याचे संकेत मिळाले असून परिवर्तन आघाडीचा प्रभाव वाढल्याचे स्पष्ट झाले आहे.आगामी काळात याचे पडसाद जिल्हा व राज्य पातळीवरील राजकारणातही उमटण्याची शक्यता नाकारता येत नाही.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## गेवराई, अंबाजोगाई, भाजपाकडे; धारूर, परळी, बीड घड्याळाकडे, माजलगावमध्ये तुतारी

# गेवराईत गीता पवार यांचा दणदणीत विजय, पंडितांना धक्का







**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२१ डिसेंबर**

बीड जिल्ह्यातील सहा नगर परिषदेचा निकाल लागला असून सहा पैकी २ नगर परिषद या भाजपाला मिळाल्या तर तीन नगर परिषदमध्ये अजित पवारच्या राष्ट्रवादीने विजय संपादीत केला असून माजलगावमध्ये तुतारीने खाते उघडले आहे. बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार असल्याने त्यांच्यावर जनतेने विश्वास ठेवल्याने राष्ट्रवादी अजित पवार गटाला ३ नगर परिषदमध्ये भरघोस यश मिळाले आहे. बीड नगर परिषदमध्ये परिवर्तन करून सत्ता माझ्याकडे द्या विकास कसा असतो मी दाखवून देतो असे आश्वासन निवडणुकीच्या कालावधीत पवारांनी बीडकरांना दिले होते. त्याच्यावर विश्वास ठेवून बीड नगर परिषदेची एकहाती सत्ता अजित पवारच्या राष्ट्रवादीला दिली आहे. त्यामुळे पालकमंत्री म्हणून बीड शहराचा नगर परिषदेच्या माध्यमातून विकास घडवून आणणे हीच प्राथमिकता असावी अशी बीडच्या जनतेची अपेक्षा आहे. बीड शहरामध्ये प्रमुख लढत ही राष्ट्रवादी शरद पवार गट व भारतीय जनता पक्ष यामध्येच होईल अशी परिस्थिती होती. मात्र अजित पवार यांनी दिलेल्या विश्वासाने व जनतेने त्यांच्यावर टाकलेल्या विश्वासाने अजित पवार राष्ट्रवादी च्या उमेदवार प्रेमलता पारवे या चांगल्या मताधिक्याने विजय झाल्या आहेत. तर नगरसेवक १९ जनतेने निवडून दिले आहेत. भारतीय जनता पक्षाचे पहिल्याच वेळी १५ नगरसेवक निवडूण देऊन जनतेने परिवर्तन घडवून आणले आहे. आ.संदिप क्षीरसागर यांच्या राष्ट्रवादी शरद पवार गटाला १३ नगरसेवक मिळाले असून इतर ३ ठिकाणी अपक्ष, शिंदे गट, मशाल यांना जागा मिळाल्या आहेत.



बीड नगरपरिषद निवडणुकीत भाजपने ऐतिहासिक यश संपादन करत शहराच्या राजकारणात आपली ताकद दाखवून दिली आहे. बीड नगरपरिषदेच्या एकूण ५२ जागांपैकी भाजपचे तब्बल १५ नगरसेवक विजयी झाले असून, बीडच्या इतिहासात प्रथमच भाजपने एवढ्या मोठ्या संख्येने नगरसेवक निवडून आणण्याची कामगिरी केली आहे. यापूर्वी भाजपचा केवळ एक नगरसेवक असायचा. यावेळी नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार डॉ.ज्योती घुंबरे यांचा मात्र निसटता पराभव झाला.

नगराध्यक्ष पदासाठी भाजपच्या उमेदवार डॉ.ज्योती घुंबरे यांनी अत्यंत चुरशीची व अटीतटीची लढत दिली. मात्र, शेवटच्या टप्प्यात अतिशय कमी मतांनी त्यांचा निसटता पराभव झाला. या निवडणुकीत डॉ.घुंबरे यांना ३२ हजार ३३ मते मिळाली असून, हा वाढता जनाधार भाजपसाठी भविष्यात निश्चितच बळ देणारा आहे, असे पक्षाच्यावतीने सांगण्यात आले. बीड नगरपरिषदेची निवडणूक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजप नेत्या, मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली लढविण्यात आली. ऐन निवडणुकीच्या तोंडावर डॉ.क्षीरसागर यांनी भाजपमध्ये प्रवेश करून निवडणुकीची जबाबदारी स्वीकारली होती. त्यांना खंबीर साथ देत जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांच्यासह सर्वच पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी निवडणुकीत परिश्रम घेतले.

भाजपच्या विजयी नगरसेवकांची प्रभागनिहाय नावे

प्रभाग क्र.२ मधून शुभम दिलीप धूत, सावित्री नितीन साखरे, ४ मधून मीनाताई जाधव, ५ मधून मीना रणजितसिंह चव्हाण, ७ मधून भाग्यश्री देशपांडे, जगदीश गुरखदे, ८ मधून राहुल गुरखुदे, १० मधून मंगेश धोंगडे, भाग्यश्री तांबारे, १२ मधून पूजा राजाभाऊ गुजर, १३ मधून समीक्षा शेटे, सय्यद मुस्तफा, १५ मधून डॉ.सारिका क्षीरसागर, आदित्य माने, २५ मधून ज्योती नंदकिशोर पिंगळे अशी भाजपच्या विजयी नगरसेवकांची नावे आहेत.

भाजपचा पहिला मुस्लिम नगरसेवक सय्यद मुस्तफा; शुभम धूत सर्वाधिक मतांनी विजयी

स्व.गोपीनाथराव मुंडे यांना मानणारे आणि भाजपचे नगरसेवक पदाचे उमेदवार मुस्तफा सय्यद यांचा मोठ्या मताधिक्याने विजय झाला आहे. त्यांच्या रूपाने बीडमध्ये भाजपचा पहिला मुस्लिम नगरसेवक झाला. तसेच, शुभम धूत हे सर्वाधिक १५८४ मतांनी विजयी झाले आहेत.

## नगराध्यक्ष पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी १५,६६४ मतांच्या लीडने विजयी

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.२१ डिसेंबर**

परळी नगर परिषदेच्या निवडणुकीत धनंजय मुंडे व पंकजाताई मुंडे या बहीण भावांनी मिळून महायुतीच्या माध्यमातून पुन्हा एकदा एकहाती विजय मिळवत, नगरपरिषदेसह मतदारसंघात आपले वर्चस्व सिद्ध केले आहे. महायुतीच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवार सौ. पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी या तब्बल १५ हजार ६६४ मतांनी विजयी झाल्या आहेत.

दरम्यान परळीतील ३५ पैकी २५ जागांवर महायुतीचे उमेदवार निवडून आले असून सहा जागांवरती महायुतीतील बंडखोर असलेले सहा उमेदवार अपक्ष निवडून आले असून, या सहापैकी पाच उमेदवारांनी महायुतीच्या पॅनलला निकाला दिवशीच पाठिंबा दिला आहे; तर उर्वरित एक उमेदवार ही लवकरच पाठिंबा देणार असल्याचे कळते.

दुसरीकडे तुतारी गटाला केवळ दोन जागांवर विजय प्राप्त करता आला असून, पॅनल प्रमुख दीपक देशमुख यांचा वार्ड क्रमांक सहा मध्ये दारून पराभव झाला आहे. दरम्यान धनंजय मुंडे यांनी मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या यश:श्री निवासस्थानी जाऊन पंकजाताईंना शुभेच्छा देत विजयी जल्लोष साजरा केला.परळीच्या जनतेने आम्हाला वेळोवेळी आशीर्वाद दिले, मात्र मागील काही दिवसांमध्ये परळीच्या मातीची आणि इथल्या माणसांची जी बदनामी राजकीय द्वेषातून केली जात होती, त्याला आज परळीच्या जनतेने मतांमधून उत्तर दिले असल्याचे वक्तव्य धनंजय मुंडे यांनी केले आहे. तर पंकजाताई मुंडे यांनी देखील महाराष्ट्रातील क्वचितच घडलेला संपूर्ण महायुतीचा हा परळी येथील प्रयोग यशस्वी ठरला असून आगामी निवडणुकांमध्ये देखील परळी मतदारसंघात महायुती म्हणूनच आम्ही सामोरे जाऊ असे सूतोवाच करत सर्व विजयी उमेदवारांचे अभिनंदन केले आहे.

> ३५ पैकी २५ जागांवर महायुतीचे उमेदवार विजयी, ६ अपक्ष, तर तुतारी गटास केवळ दोन जागा



## माजलगाव नगराध्यक्षपदी महरीन शिफा चाऊस विजयी

### माजलगाव नगर परिषदेवर रा. काँ शरद पवार गटाचे वर्चस्व

### दोन माजी नगराध्यक्षांना प्रभावाचा धक्का

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२१ डिसेंबर**

माजलगाव नगर परिषदेच्या निवडणुकीत राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या महरीन शिफा चाऊस बिलाल चाऊस यांनी भाजपच्या संध्या मेंढके यांचा पराभव करून अध्यक्षपदी विजयी प्राप्त केला आहे.

माजलगाव नगरअध्यक्ष पदे महिला नागरिकांचा प्रवर्ग साठी राखीव होते या निवडणुकीत अध्यक्ष पदाच्या निवडणुकीत शरद पवार घराच्या मेहरण शिपा बिलाल चाऊस भाजपच्या संध्या मेंडके व शरद अजित दादा पवार गटाच्या मेहर खालील पटेल यांच्यात तिरंगी लढत झाली यामध्ये यांचा २६२३ मतांनी पराभव करत विजय संपादन केला तर खालील पटेल यांच्या पराभवामुळे तिसऱ्या खालील पटेल यांना तिसऱ्या स्थानावर समाधान मानावे लागले.माजलगावात १३ प्रभागातील नगरसेवक पदाच्या २६ जागेसाठी झालेल्या निवडणुकीत शरद पवार गटाचे १० तर अजित पवार गटाचे १० नगरसेवकास भाजप १, पंजा १, एमआयएम १ व ३ अपक्ष नगरसेवक निवडून आले आहेत. नगरसेवक पदाच्या निवडणुकीत भाजपच्या माजी नगराध्यक्ष सौ सुमन मुंडे व माजी नगराध्यक्ष शेख मंजूर यांना पराभवाचा धक्का बसला.तर माजलगाव मध्ये राजकीय क्षेत्रात वर्चस्व प्रस्थापित असलेल्या होके, रांजवन व डक परिवारातील उमेदवारांना पराभावाचा धक्का बसला आहे.



नगराध्यक्षपदाच्या उमेदवाराला झालेले मतदान
महरीन शिफा चाऊस रा. कॉ.श. प. गट) १२२५६
संध्या मेंढके (भाजप) ९६३३
मेहरूबी खलील पटेल (रा.कॉ. अ. प. ) ८७२७
संध्या पैंजने ( उबाठा) २९६
महरीन चाऊस २६२३ मतांनी विजयी

नगरसेवकपदाचे विजयी उमेदवार

प्रभाग १
अ) सौ.रेखा प्रल्हाद सरवदे (रा. कॉ. अजित पवार गट)
ब) शरद रामभाऊ यादव (रा. कॉ शरद पवार गट)

प्रभाग २
अ)जावळे उज्वला सचिन (रा कॉ श प)
ब)शेख इब्रान शेख बशीर (रा. कॉ. अ. प.)

प्रभाग ३ विजयी
अ) राज सय्यद अहमद (रा. कॉ. अ. प.)
ब)जुनेद पठाण ( रा.कॉ.अ.प.)

प्रभाग ४
अ) दीपक जालिंदर मेंढके ( भाजप)
ब)सौ. रेश्मा दीपक मेंडके (अपक्ष)

प्रभाग ५
अ) सौ.सुचिता भारत होके ( रा? कॉ.श.प.)
ब) राहुल सुखदेव लंगडे (रा.कॉ. अ. प.)

प्रभाग ६
अ) सौ.गंगाबाई भागवत भोसले (रा. कॉ. श प.)
ब) सय्यद लतीफ दिवाण (रा.कॉ.श. प.)

प्रभाग ७
अ) सौ.वैशाली प्रशांत शेटे ( रा.कॉ.अ.प.)
ब) विजय राजेभाऊ शिंदे ( रा.कॉ.अ.प.)

प्रभाग ८
अ) तहुरा मुजमील पटेल (अपक्ष )
ब) सहालबीन चाऊस (रा.कॉ. श.प)

प्रभाग ९
अ)आयशा फारुख आतार (अपक्ष)
ब) महमूद कुरेशी महमूद (रा. कॉ. श.प.)

प्रभाग १०
अ) सौ.नीला गोविंद इतापे (रा.कॉ.श.प)
ब)खान इम्रान आगा (रा.कॉ.श.प)

प्रभाग ११
अ) फरहाद इंद्रिस शेख (एम आय एम)
ब) शेख मतीन (रा.कॉ. अ. प.)

प्रभाग १२
अ) सौ.सुलोचना मरीबा प्रधान ( पंजा)
ब) सय्यद रफिक अली (रा.कॉ.अ.प.)

प्रभाग १३
अ) उषा अशोक लांडगे (रा.कॉ.श.प.)
ब) रेहानबी हरून शेख (रा.कॉ.अ.प.)

## ऐतिहासिक ठिकाणातून विद्यार्थ्यांनी घेतला सहलीचा आनंद

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२१ डिसेंबर**

नानाजी देशमुख विद्यामंदिर मधिल स्वच्छंद व प्रल्हाद गटातील विद्यार्थ्यांची सहल शिदोड येथील महालक्ष्मी मंदिर येथे दिनांक-२०.१२.२५ शनिवार रोजी एक दिवसीय सहल नेण्यात आली. मा.सुनंदाताई कुलकर्णी, नानाजी देशमुख विद्यामंदिरच्या प्रभारी मुख्याध्यापिका मा. मोराळे ताई, सुरवसे ताई, जयश्रीताई देशपांडे, गोकुळ शिशू वाटिका प्रमुख आरती ताई कंपू, मुळे ताई, जगदाळे ताई, वैष्णवी ताई कदम व गटातील ४९ विद्यार्थी सहलीसाठी निघाले होते.



शिदोड मधील महालक्ष्मी मंदिर हे ऐतिहासिक आणि धार्मिकदृष्ट्या महत्त्वाचे आहे. ते कोल्हापूरच्या अंबाबाईची एक रूप मानले जाते. त्यानंतर महादेवाचे मंदिर देखील तेथे आहे. विद्यार्थ्यांनी दर्शन घेतले व मा.सुनंदाताई कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना माहिती सांगितली. एकत्र मुले खेळली व सहभोजनाचा आनंद घेतला.

विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आला. काही विद्यार्थ्यांनी प्रात्यक्षिके देखील सादर केली. जयश्रीताई देशपांडे यांनी विद्यार्थ्यांना गोष्ट सांगितली. क्रांतीताई पोरवाल यांनी विद्यार्थ्यांसाठी गाणे म्हणले. त्यामध्ये नृत्य, गाणे यांचे सादरीकरण झाले. व तेथून परतताना खंडेश्वरी देवीचे दर्शन घेतले. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

## परळीत ना.पंकजा मुंडे यांनी केले विजयी उमेदवारांचे अभिनंदन

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.२१ डिसेंबर**

परळी नगर परिषद सार्वत्रिक निवडणुकीत शहरातील मतदारांनी ना. पंकजाताई मुंडे आणि आ. धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत भाजपा, राष्ट्रवादी आणि शिवसेना महायुतीच्या उमेदवारांना अभूतपूर्व मताधिक्यानी विजयी केले आहे. नगरपरिषद निवडणुकीत मोठा विजय मिळाल्यानंतर महायुतीच्या विजयी उमेदवार आणि पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी ना. पंकजाताई मुंडे यांच्या यश:श्री निवासस्थानी जल्लोष करत विजय साजरा केला.



महायुतीच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षा पद्मश्री धर्माधिकारी, बाजीराव धर्माधिकारी, नगरसेवक वंदना आघाव, जयश्रीताई मोगरकर, अंजली माळी, पवन मुंडे, पूजा तोतला, योगेश मेनकुदळे आदींसह राष्ट्रवादी काँग्रेसच्या विजयी नगरसेवकांनी विजयी झाल्यानंतर ना. पंकजाताई मुंडे यांची यश:श्री निवासस्थानी भेट घेऊन आभार व्यक्त केले. याप्रसंगी ना. पंकजाताई यांनी सर्वांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. आमदार धनंजय मुंडे हे देखील याप्रसंगी उपस्थित होते, त्यांनी देखील हर्षोल्हासात पंकजाताईंना शुभेच्छा दिल्या. दरम्यान महायुतीच्या कार्यकर्त्यांनी यश:श्री निवासस्थानी गुलालाची उधळण करत फटाक्यांची आतिषबाजी केली. याप्रसंगी मंडे टू संडे, गोपीनाथ मुंडे, मुंडे साहेब अमर रहेच्या घोषणांनी परिसर दणाणून गेला होता.

# ६१ वी पुरुष-महिला राज्य अजिंक्यपद खो-खो स्पर्धा

### महिलांमध्ये धाराशिव वि. पुणे तर पुरुषांमध्ये पुणे वि. मुंबई उपनगर अंतिम फेरीत भिडणार

### पुण्याचे दोन्ही संघ अंतिम फेरीत; बीडमध्ये अंतिम थरार शिगेला

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२१ डिसेंबर**

बीड येथील श्रीमती योगी छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुलात सुरू असलेल्या ६१ व्या पुरुष व महिला राज्य अजिंक्यपद खो-खो स्पर्धेत अंतिम फेरीचे चित्र स्पष्ट झाले असून महिला गटात धाराशिव विरुद्ध पुणे तर पुरुषांमध्ये पुणे विरुद्ध मुंबई उपनगर यांच्यात विजेतेपदासाठी लढत रंगणार आहे. चारही संघांमध्ये आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्तरावरील खेळाडूंचा भरणा असल्याने हे अंतिम सामने कमालीचे चुरशीचे होण्याची अपेक्षा आहे.

महिला उपांत्य फेरीत धमाकेदार खेळाची झलक

धाराशिवने उडवला नाशिकचा धुव्वा

महिला गटातील पहिल्या उपांत्य सामन्यात धाराशिवने नाशिकचा एक डाव व १० गुणांनी (२६-१६) धुव्वा उडवत रुबाबात अंतिम फेरी गाठली. धाराशिवकडून संध्या सुरवसे (३.१० मि. संरक्षण), अश्विनी शिंदे (२.३० मि. संरक्षण व ४ गुण), मैथिली पवार (२ मि. संरक्षण व २ गुण) यांनी संघाच्या विजयात धमाकेदार खेळी करत उल्लेखनीय मोठा विजय साजरा करत प्रेक्षकांना जागेवर खिळवून ठेवले. तर पराभूत नाशिककडून ज्योती मेढेने चांगली कामगिरी केली.

पुण्याची ठाण्यावर निसटती मात

महिला गटातील दुसऱ्या उपांत्य सामन्यात पुण्याने ठाण्याचा ३ गुण व ५० सेकंद राखून (३२-२९) निसटता पराभव करत अंतिम फेरीत प्रवेश केला. दोन्ही डावांत ड्रीम रनच्या जोरावर पुण्याने ४ गुण मिळवत आघाडी घेतली, तर ठाण्याला केवळ १ ड्रीम रन गुणावर समाधान मानावे लागले. पुण्याकडून श्वेता नवले (२.२४ मि. संरक्षण), प्रियांका इंगळे (१.३० व २.०४ मि. संरक्षण व १० गुण), श्वेता वाघ (१.१४ मि. संरक्षण व ४ गुण), अपर्णा वर्धे (नाबाद १.३० व १.१६ मि. संरक्षण व २ गुण) यांनी निर्णायक खेळी करताना अंतिम फेरीची दारे



उघडली तर पराभूत ठाण्याकडून रेश्मा राठोड (२.२० व १.३२ मि. संरक्षण व ४ गुण), प्रियांका भोपी (१.२० व १.०३ मि. संरक्षण) यांनी झुंजार खेळ करताना विजयाची पराकाष्टा केली मात्र त्या अपयशी ठरल्या.

पुरुष उपांत्य फेरीत शेवटपर्यंत जुगलबंदी

पुण्याचा धाराशिववर थरारक विजय

पुरुष गटातील पहिल्या उपांत्य सामन्यात पुण्याने धाराशिववर १.१० मिनिटे राखून ४ गुणांनी (३७-३३) मात करत अंतिम फेरीत प्रवेश केला. चुरशीचा ठरलेला हा सामना प्रेक्षकांच्या हृदयाचे ठोके क्षणाक्षणाला वाढवत होते. पुण्याकडून शुभम थोरात (१.४५, २.३० मि. संरक्षण व ४ गुण), प्रतीक वाईकर (१.३०, १.३० व १.४० मि. संरक्षण व ८ गुण), सुयश गरगटे (१.००, १.३० मि. संरक्षण व २ गुण), रुद्र थोपटे (८ गुण) यांनी उत्कृष्ट खेळ करताना अंतिम फेरीत पोहचले तर पराभूत धाराशिवकडून विजय शिंदे (१.३०, १.०२ मि. संरक्षण व ४ गुण), श्री पेठे (१.२०, १.०२ मि. संरक्षण व ४ गुण) यांनी झुंजार लढत दिली.

मुंबई उपनगरची सांगलीवर निर्णायक बाजी

दुसऱ्या उपांत्य सामन्यात मुंबई उपनगरने सांगलीचा ३ मिनिटे ३७ सेकंद राखून २ गुणांनी (३६-३४) पराभव केला. उपनगरकडून अक्षय भांगरे (२.१० व १.१० मि. संरक्षण), अनिकेत चेंदवणेकर (१.३०, १.१० मि. संरक्षण व ८ गुण), प्रतीक देवरे (१० गुण), निहार दुबळे (१, १.०६ मि. संरक्षण व २ गुण) यांनी अष्टपैलू खेळ करत अंतिम फेरीचे दार ठोठावले तर पराभूत सांगलीकडून अक्षय मासाळ (१.०८ व १.३४ मि. संरक्षण व ४ गुण), अभिषेक केरीपाळे (१.१० मि. संरक्षण व ८ गुण) यांनी चमकदार कामगिरी नोंदवली.

अंतिम लढतीकडे लक्ष

महिलांमध्ये धाराशिव विरुद्ध पुणे तर पुरुषांमध्ये पुणे विरुद्ध मुंबई उपनगर या अंतिम लढतीकडे क्रीडारसिकांचे लक्ष लागले असून बीडमध्ये खो-खोचा अंतिम थरार शिगेला पोहोचला आहे.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# हिंगोलीत भाजपला मोठा धक्का, शिवसेनेच्या रेखा श्रीराम बांगर नगराध्यक्षपदी विजयी

## शिवसेनेचे १७, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे १०, भाजपचे ५ तर काँग्रेसचे दोन उमेदवार विजयी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २१ डिसेंबर**

हिंगोली नगर परिषदेच्या निवडणुकीची रविवारी मतमोजणी येथील नगर परिषदेच्या कल्याण मंडपम् सभागृहात पार पडली. या निवडणुकीत शिवसेना शिंदे गटाने भाजपला मोठा धक्का दिला आहे. नगराध्यक्षपदासाठी भाजपकडून नीता बाबाराव बांगर तर शिवसेना शिंदेगटाच्या रेखा श्रीराम बांगर या निवडणुक रिंगणात होत्या. मतमोजणीअंती शिवसेना शिंदे गटाच्या रेखा श्रीराम बांगर यांनी १० हजार ४६७ मतांनी भाजपच्या नीता बाबाराव बांगर यांचा दारूण पराभव करीत नगराध्यक्षपदी विजय मिळवला आहे. या निवडणुकीत सर्वाधिक १७ नगरसेवक शिवसेना शिंदे गटाचे विजयी झाले आहेत. तर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गटाचे १० नगरसेवकांचा, भाजपच्या ५ नगरसेवकांचा तर काँग्रेसच्या २ नगरसेवकांचा विजय झाला आहे. विशेष म्हणजे उबाठा शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट आणि मनसेचा एकही नगरसेवक निवडून आला नाही.

हिंगोली नगर परिषद निवडणुकीची मतमोजणी सकाळी १० वाजल्यापासून सुरू झाली. या निवडणुकीत खरी लढत भाजपच्या नीता बाबाराव बांगर आणि शिवसेना शिंदे गटाच्या रेखा श्रीराम बांगर यांच्यातच होती. भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे आणि शिवसेनेचे आ. संतोष बांगर यांनी ही निवडणुक प्रतिष्ठेची केली होती. एकमेकांवर प्रचार काळात वैयक्तिक पातळीवर दोन्ही पक्षांनी टीका केली. साम, दाम, दंड, भेद सर्व प्रकाराच्या तंत्रांचा वापर दोन्ही पक्षांकडून झाला.




मतमोजणीच्या सहा फेऱ्या झाल्या. पहिल्या फेरीत भाजपच्या नीता बाबाराव बांगर यांनी आघाडी घेतली होती परंतु त्यानंतर मात्र शिवसेना शिंदे गटाच्या रेखा श्रीराम बांगर यांनी त्यांची आघाडी कायम ठेवत शेवटी विजय खेचून आणला. या निवडणुकीत उबाठा शिवसेनेच्या अर्चना भिसे यांना अतिशय कमी मतदान झाल्यामुळे भाजपला त्याचा चांगलाच फटका बसला. विशेष म्हणजे मुस्लीम बहुल प्रभागात शिवसेना शिंदे गटाच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवार रेखा श्रीराम बांगर यांना मताधिक्य मिळाले. त्यामुळे शेवटच्या फेरी पर्यंत भाजपच्या नीता बांगर या पिछाडीवर राहील्या.

प्रभाग क्रमांक एक शोभा अशोकराव कळासरे व दिलीप बाबुराव चव्हाण दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट विजयी झाले. प्रभाग क्रमांक दोन राणी अजय गायकवाड हमीद पिरू प्यारेवाले दोन्ही भाजपा यांचा विजय झाला. प्रभाग क्रमांक तीन मध्ये भाजपच्या अनिता उमेश कुठे आणि शिवसेनेचे विश्वासराव नायक हे दोन उमेदवार विजयी, प्रभाग क्रमांक चार मध्ये भाजपच्या वैशाली राजेश गोटे आणि जीतसिंग अर्जुन सिंग शाहू हे दोन्ही उमेदवार विजयी, प्रभाग क्रमांक पाच मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या ज्योती सुखदेव बलखंडे आणि पठाण कयूम खान मस्तान खान हे दोन्ही उमेदवार विजयी, प्रभाग क्रमांक सहा मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या वसंताबाई पांडुरंग लुंगे आणि सय्यद अमीर अली हे दोन्ही उमेदवार विजयी, प्रभाग क्रमांक सात मध्ये काँग्रेसच्या डॉक्टर रितिका सुरेश अप्पा सराफ आणि शेख निखत हे दोन्ही उमेदवार विजयी, प्रभाग क्रमांक आठ मध्ये शिवसेनेच्या डॉक्टर सुरभी भरत चौधरी व कपिल जुगल किशोर खंडेलवाल हे दोन्ही उमेदवार विजयी, प्रभाग क्रमांक नऊ मध्ये शिवसेनेच्या इंदुबाई नंदकुमार लव्हाळे व बागवान अब्दुल माबूद बागवान हे दोन्ही उमेदवार विजयी, प्रभाग क्रमांक दहा शिवसेनेचे श्रीराम लक्ष्मण बांगर आणि सोनाली विशाल गोटरे हे दोन्ही उमेदवार विजयी, प्रभाग क्रमांक ११ मध्ये शिवसेनेचे रवींद्र तुकाराम वाढे आणि सुनीता गणेश बांगर यांचा विजय झाला आहे. भाग क्रमांक १२ मध्ये शिवसेनेचे सुभाष नारायण राव बांगर आणि ज्योती रामकिशन बांगर हे दोन्ही उमेदवार विजयी, प्रभाग क्रमांक १३ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गट मोहम्मद रुबीना वाजिद आणि शेख निहाल हाजी इस्माईल हे दोन्ही उमेदवार विजयी, प्रभाग क्रमांक १४ मध्ये शेख अंजुम शेख मुजीब आणि हाश्मी सय्यद बासित हाश्मी सय्यद हबीब हे दोन्ही उमेदवार विजयी, प्रभाग क्रमांक १५ मध्ये शिवसेनेचे सुमित दत्तराव कांबळे आणि शशिकलाबाई माधवराव बांगर हे दोन्ही उमेदवार विजयी, प्रभाग क्रमांक १६ मध्ये शिवसेनेच्या निधी संजय गोरे आणि श्याम अंबादासराव कदम हे उमेदवार विजयी झाले. प्रभाग क्रमांक १७ मध्ये शिवसेनेचे कुरेशी साद अहमद मोहम्मद अब्दुल खुद्दुस आणि पठाण नाझिया परवीन अफरोज हे दोन्ही उमेदवार विजयी झाले आहेत.

सकाळपासूनच सर्व राजकीय पक्षांचे समर्थकांनी मतमोजणीच्यावेळी मोठी गर्दी केली होती. शिवसेना शिंदे गटाच्या नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत रेखा श्रीराम बांगर यांचा विजय झाल्यानंतर त्यांच्या समर्थकांसह कार्यकर्त्यांनी शहरातून भव्य मिरवणुक काढीत जल्लोष साजरा केला. जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, सहायक जिल्हाधिकारी महेंद्रकुमार कांबळे, उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे, तहसीलदार श्रीकांत भुजबळ यांच्या मार्गदर्शनाखाली मतमोजणी पार पडली.

# दिग्रस कऱ्हाळे येथे जिजाऊ ब्रिगेडची ग्रामशाखा स्थापन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २१ डिसेंबर**



जिजाऊ ब्रिगेडचे विचार प्रसारित करण्यासाठी व ग्रामीण भागातील महिलांचे संघटन वाढविण्यासाठी हिंगोली जिल्ह्यात अनेक गावात ग्रामशाखा स्थापन करण्यात येत आहेत. तळागाळातील लोकांपर्यंत संघटनेचे विचार पोहचावेत यासाठी ग्रामशाखांची गरज आहे.

दि. २०-१२-२५ रोजी डिग्रस कऱ्हाळे येथे जिजाऊ ब्रिगेड ची नुतन ग्रामशाखा स्थापन करण्यात आली. छाया संजय कऱ्हाळे यांची अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली. वर्षा विनोद माने (उपाध्यक्ष), कौशलाबाई तुळशीराम दळवी (उपाध्यक्ष), वैशाली सुभाष कऱ्हाळे (कार्याध्यक्ष), जया विनोद कऱ्हाळे(सचिव), शितल शिवाजी कऱ्हाळे(सहसचिव), ज्योती उमेश वाळके(सहकार्याध्यक्ष), यमुना मारोती कऱ्हाळे (कोषाध्यक्ष), शारदा देवराव कऱ्हाळे (सहकार्याध्यक्ष), राधा नामदेव कऱ्हाळे (प्रसार प्रसिद्धी प्रमुख), वैशाली राजकुमार कऱ्हाळे (प्रसार प्रसिद्धी प्रमुख), जयश्री अनिल हलगे(प्रसार प्रसिद्धी प्रमुख), सिता मारोती कऱ्हाळे, आशा जगन्नाथ कऱ्हाळे, कु. जिजाऊ नामदेव कऱ्हाळे व प्रयाग मुंजाजी गोरे, निता संतोष कऱ्हाळे, गिता गजानन कऱ्हाळे, वनमाला संतोष राखोंडे, स्वाती सुनिल कऱ्हाळे, जयश्री देवराव कऱ्हाळे, यशोदा नामदेव कऱ्हाळे, द्रौपदी संभाजी कऱ्हाळे, लक्ष्मी संतोष कऱ्हाळे, रेखाबाई शंकर क्षिरसागर, संगिता बालासाहेब पवार, त्रिवेणी प्रकाश साखरे, कोमल तुकाराम कऱ्हाळे यांची सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली. कार्यक्रमास जिजाऊ ब्रिगेड प्रदेश उपाध्यक्ष ज्योतीताई कोथळकर, विभागीय सचिव अर्चनाताई मेटे, जिल्हाध्यक्ष प्रियंका भोयर, सलोखाताई इंगोले अंजली गाढे, शारदा दोडके, अर्चना वाघ, योगिता देशमूख व कल्पना सोळंखे, पदाधिकारी उपस्थित होत्या.



**हिंगोली- हिंगोली नगर पालिका निवडणुकीत विजयानंतर नगराध्यक्षा रेखा श्रीराम बांगर यांना उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे यांनी प्रमाणपत्र दिले. यावेळी आ. संतोष बांगर, श्रीराम बांगर, युवासेना जिल्हाध्यक्ष राम कदम, मुख्यधिकारी अरविंद मुंडे, तहसीलदार श्रीकांत भूजबळ यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते दिसत आहेत. छाया- विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांच्या मार्गदर्शनात चोख पोलिस बंदोबस्त



हिंगोली- जिल्ह्यातील हिंगोलीसह कळमनुरी आणि वसमत या तीनही नगर पालिकांची मतमोजणी रविवारी पार पडली. कायदा व सुव्यवस्थेचा अबाधित ठेवण्यासाठी पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांच्या मार्गदर्शनात चोख पोलिस बंदोबस्त लावण्यात आला होता. त्यामुळे कुठेही अनुचीत प्रकार घडला नाही. खुद्द पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी शहरातील विविध भागात पोलिस पथकांसह भेटी देत कार्यकर्त्यांना शांततेचे आवाहन केले. मिरवणुका न काढण्याचे आवाहन करीत जिल्ह्यातील तीनही नगर पालिका निवडणुकांच्या निकालानंतर सतत पथकासह पेट्रोलिंग केली. त्यांच्या आणि पोलिस दलाच्या कार्यामुळे निकालानंतर तीनही शहरात शांततेत मतमोजणी पार पडली आहे. ठिकठिकाणी चोख पोलिस बंदोबस्त लावण्यात आला होता. सर्व ठिकाणी कोकाटे यांनी भेटी देत दिवसभर पाहणी केली.

### जिल्हाधिकाऱ्यांची मतमोजणी केंद्राला भेट



हिंगोली- जिल्ह्यातील हिंगोलीसह कळमनुरी आणि वसमत या तीनही नगर पालिकांची मतमोजणी रविवारी पार पडली. यावेळी हिंगोली येथील कल्याण मंडपम् येथील मतमोजणी केंद्राला जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, अप्पर पोलिस अधीक्षक योगेशकुमार मीना यांनी भेट देत पाहणी केली. यावेळी उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे, तहसीलदार श्रीकांत भूजबळ, अरविंद मुंडे यांनी मतमोजणीसंदर्भात माहीती दिली. मतमोजणीच्या सहा फेऱ्यांसाठी विविध टेबल लावण्यात आले होते. सकाळी १० वाजता मतमोजणीला सुरूवात झाली. यावेळी प्रभाग निहाय उमेदवार किंवा त्यांच्या प्रतिनिधीला मतमोजणी कक्षात प्रवेश देऊन त्यानंतर मतमोजणी केल्या जात असल्याची दिसून आले. एकूण १७ प्रभागाची मतमोजणी करण्यात आली. यावेळी मतमोजणी परिसरात बॅरीकेटस आणि चोख पोलिस बंदोबस्त लावण्यात आला होता.

# वसमत नगर पालिकेच्या नगराध्यक्षपदी राष्ट्रवादीच्या सुनीत बाहेती यांचा विजय

## राष्ट्रवादीचा १६ जागा, भाजप, काँग्रेसला प्रत्येकी ४ तर शिंदेगट, उबाठाला प्रत्येकी २ जागा

**तभा वृत्तसेवा**
**वसमत, २१ डिसेंबर**



वसमत नगर पालिका निवडणुकीची मतमोजणी रविवार दि २१ डिसेंबर रोजी पार पडली. या मतमोजणीत राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवार सुनीता बाहेती यांना २० हजार १६५ तर काँग्रेसच्या सीमा अब्दुल हाफीज यांना १६ हजार ७१४ मते मिळाली. राष्ट्रवादीच्या सुनीता बाहेती यांनी ३४५१ मतांनी सीमा हाफीज यांचा पराभव करीत विजय मिळवला आहे. या निवडणुकीत राष्ट्रवादीला १६ जागांवर विजय मिळाला असून भाजप व काँग्रेसला प्रत्येकी ४ जागा, शिवसेना शिंदेगटाला २ आणि उबाठा शिवसेनेला २ जागांवर विजय मिळाला आहे. तर दोन जागांवर अपक्ष नगरसेवक विजयी झाले आहेत.

वसमत नगर पालिकेसाठी दि २० डिसेंबर रोजी मतदान पार पडले होते. मतदानानंतर लगेच दुसऱ्या दिवशी मतमोजणी देखील करण्यात आली. वसमत विधानसभेचे आ. राजु नवघरे यांच्या नेतृत्वात राष्ट्रवादीने या निवडणुका लढल्या आहेत. शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी यांची वसमतमध्ये युती होती. तर भाजपाला बाजूला ठेवण्यात आले होते. दुसरीकडे महाविकास आघाडीकडून माजी नगराध्यक्ष अब्दुल हाफीज यांच्या पत्नी सीमा अब्दुल हाफीज नगराध्यक्षपदाच्या रिंगणात होत्या. राष्ट्रवादी विरूध्द काँग्रेस अशी काट्याची टक्कर वसमत नगर पालिकेत पहावयास मिळाली. या निवडणुकीत राष्ट्रवादीने नगर पालिकेवर निर्विवाद वर्चस्व सिध्द केले आहे.

विजयी उमेदवारांमध्ये प्रभाग क्र १ मधून काँग्रेसचे अब्दुल हाफीज अब्दुल रहेमान, राष्ट्रवादीच्या शेख जाहीराबी जिलानी यांचा विजय झाला आहे. प्रभाग क्र २ मधून राष्ट्रवादीचे दिलीप पांडुरंग भोसले तर काँग्रेसच्या वर्षा युवराज आवटे, प्रभाग क्र ३ मधून काँग्रेसच्या सय्यद तबसुम बेगम स. इरफान तर राष्ट्रवादीचे चाऊस महमद अयफान अ रहेमान, प्रभाग क्र ४ मधून उबाठा शिवसेनेच्या रूक्मीणी संजय भोसले तर शिवसेनेचे प्रभाकर चंद्रभान क्षीरसागर, प्रभाग क्र ५ मधून भाजपचे सीताराम गणपत म्यानेवार तर उबाठा शिवसेनेच्या डॉ रेणुका गजानन पतंगे, प्रभाग क्र ६ मधून काँग्रेसच्या कुरेशी खुर्शिदा बेगम मजीद आणि शेख हबीब बशीर, प्रभाग क्र ७ मधून भाजपच्या सुनीता शिवाजी अडलिंगे आणि शिवदास नारायण बोड्डेवार, प्रभाग क्र ८ मधून राष्ट्रवादीच्या स्नेहा सुनील मनोहरे तर अपक्ष शेख मोहम्मद शेख कामरान शेख युनुस, प्रभाग क्र ९ मधून राष्ट्रवादीच्या कुरेशी आयेशा बेगम शेख खदीर आणि सय्यद नयुम पाशा, प्रभाग क्र १० मधून अपक्ष सौ शंकुतला गोपाळसा सातपूते तर राष्ट्रवादीचे संकेत माधवसा नामपल्ली, प्रभाग क्र ११ मधून राष्ट्रवादीच्या नंदा शशीकुमार कुलथे तर भाजपचे मयुर राधेश्याम नावंदर, प्रभाग क्र १२ मधून राष्ट्रवादीच्या उत्कर्षा कन्हैया बाहेती आणि सचिन विठ्ठल दगडू, प्रभाग क्र १३ मधून शिवसेनेचे राजेश लक्ष्मणराव पवार तर राष्ट्रवादीचय सारीका दिपक हळवे, प्रभाग क्र १४ मधून राष्ट्रवादीच्या ज्योती गौतम वाव्हळे आणि सय्यद इमरान जुल्हा स. नासेर अली जुल्हा, प्रभाग क्र १५ मधून राष्ट्रचादीचे राजकुमार रावण एंगडे आणि जयमाला धनंजय गोरे या विजयी झाल्या आहेत.

वसमत नगर पालिकेवर आ. राजु नवघरे यांच्या नेतृत्वात राष्ट्रवादी काँग्रेसने वर्चस्व मिळवले असून विजयानंतर विजयी उमेदवारांनी जल्लोष साजरा केला. उपविभागीय अधिकारी विकास माने, तहसीलदार शारदा दळवी यांच्या मार्गदर्शनाखाली मतमोजणी पार पडली.

# कळमनुरी नगर पालिकेच्या नगराध्यक्षपदी शिवसेनेच्या आश्लेषा चौधरी

**तभा वृत्तसेवा**
**कळमनुरी, २१ डिसेंबर**

कळमनुरी नगर पालिका निवडणुकीची मतमोजणी रविवारी पार पडली. या निवडणुकीत शिवसेना शिंदे गटाच्या आश्लेषा वैभव चौधरी यांनी राष्ट्रवादीच्या नुरूनीसा म नाजीम यांचा १३८३ मतांनी पराभव करीत विजय संपादन केला आहे. या निवडणुकीत शिवसेना शिंदे गटाने १३ जागा जिंकल्या तर राष्ट्रवादी अजित पवार गटाला ४, भाजपला २ आणि काँग्रेसला केवळ १ जागेवर समाधान मानावे लागले आहे. भाजपने यावेळी दोन जागा जिंकत आपली उपस्थिती नगर पालिकेत नोंदवली आहे.

कळमनुरी नगर पालिका निवडणुकीसाठी १० प्रभागात २० नगरसेवक पदासाठी तसेच जनतेतून नगराध्यक्षपदासाठी निवडणुक पार पडली होती. या निवडणुकीची मतमोजणी रविवार दि २१ डिसेंबर रोजी पार पडली असून या निवडणुकीत शिवसेना शिंदे गटाने निर्विवाद वर्चस्व मिळवले आहे. शिवसेनेचे आ. संतोष बांगर यांच्या नेतृत्वात कळमनुरीमध्ये पुन्हा एकदा नगर पालिकेवर वर्चस्व सिध्द केले असून नगराध्यक्षपदासाठी आश्लेषा वैभव चौधरी आणि राष्ट्रवादीच्या नुरूनीसा म नाजीम यांच्यात लढत झाली. यावेळी आश्लेषा चौधरी यांना ५६३५ मते मिळाली तर नुरूनीसा म नाजीम यांना ४२५२ मते मिळाली. यामध्ये आश्लेषा वैभव चौधरी यांचा विजय झाला आहे. कौसर बेगम निहाल कुरेशी यांना ३२८६ तर भाजपच्या वैशाली संजय कावडे यांना १६८४, उबाठा शिवसेनेच्या सुवर्णा देशमुख यांना ११९८ मते मिळाली आहेत. उबाठा शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट यांचा एकही उमेदवार विजयी झाला नाही.




तसेच नगर सेवकांमधून विजय उमेदवारांमध्ये प्रभाग क्र १ मधून शिवसेनेचे गंगाधर संभाजी बेले, अचैना सतीश खर्जूले, प्रभाग क्र २ मधून शिवसेनेचे राणी विलास शिंदे, कैलास गणेशराव पारवे, प्रभाग क्र ३ मधून किशोर नानाराव भालेराव, शेख रिजवाना बी शेख आसिफ, प्रभाग क्र ४ मधून पठाण फरहाना आवेश, शेख महमुद शेख मुसा, प्रभाग क्र ५ मधून भाजपच्या नम्रता प्रकाश नाईक, शिवसेनेचे रवि आप्पाराव शिंदे, प्रभाग क्र ६ मधून शिवसेनेचे प्रकाश यादवराव घुसे, शिवसेनेच्या निर्मलाबाई शामराव पाटील, प्रभाग क्र ७ मधून शिवसेनेचे शिवराज तुकाराम चौधरी, शिवसेनेचे प्रणीता बुर्से, प्रभाग क्र ८ मधून राष्ट्रवादी काँग्रेसच्या नाईक शफीया बेगम खाजा, राष्ट्रवादीचे पठाण अयुब खान, प्रभाग क्र ९ मधून राष्ट्रवादीचे शेख खाजा शेख अब्दुल, राष्ट्रवादीच्या पठाण फहीमुनीसा बेगम अब्दुल खान, प्रभाग क्रमांक १० मधून भाजपच्या वर्षा राजेश जाधव तर शिवसेनेचे शैलेश उबाळे यांचा विजय झाला आहे.

या निकालामुळे शिवसेनेचे आ. संतोष बांगर यांचे राजकीय वजन वाढले असून कळमनुरी आणि हिंगोली या दोन्ही नगर पालिकेवर शिवसेनेची सत्ता आणली आहे. या विजयामागे आ बांगर यांची भुमिका निर्णायक ठरल्याचे राजकीय वर्तुळात बोलेले जात आहे. संघटनात्मक ताकद, प्रचारातील आक्रमकता आणि स्थानिक समीकरणांची अचून मांडणी यामुळे शिवसेनेला हिंगोलीत यश मिळाले आहे. या निकालातून आ. संतोष बांगर यांनी जिल्ह्यातील आपले राजकीय वजन सिध्द केले आहे. दुसरीकडे हिंगोली वगळता भाजपच्या नगराध्यक्षांना अत्यंत कमी मतदान मिळाले असून शहरी भागात भाजपचे वर्चस्व असल्याचे बोलले जाते परंतु या निवडणुकीत भाजपच्या नगराध्यक्षांना मिळालेले मतदान हे निश्चितच चिंताजनक असून भाजपच्या स्थानिक नेत्यांना आत्मपरिक्षण करण्याची वेळ आता आली आहे. उपविभागीय अधिकारी प्रतिक्षा भुते यांच्या मार्गदर्शनाखाली मतमोजणी पार पडली.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# नांदेड जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस अव्वल ; ७१ जागांसह तीन नगराध्यक्ष पद

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. २१ डिसेंबर-**

जिल्ह्यात झालेल्या १२ नगरपरिषदा आणि एका नगरपंचायतीच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजित पवार गट) अव्वल राहिला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसने ७१ जागांसह तीन नगराध्यक्ष पदे जिल्ह्यात मिळवले. भारतीय जनता पक्ष ६७ नगरसेवक पदांसह ३ नगराध्यक्ष पदे मिळवत दुसऱ्या स्थानी राहिला आहे. नांदेड जिल्ह्यात काँग्रेसला चार ठिकाणी मतदारांनी थेट नाकारले असून एकही जागा या नगरपरिषदामध्ये काँग्रेसची आली नाही. तर शिवसेना शिंदे गटही सात सात नगर परिषदेत आपले खाते उघडू शकला नाही.

जिल्ह्यातील १२ नगरपरिषदा आणि एका नगरपंचायतीचा निकाल आज रविवारी घोषित झाला. या निकालात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष जिल्ह्यात अव्वल नंबरचा पक्ष ठरला आहे. जिल्ह्यात झालेल्या निवडणुकीत ३ ठिकाणी भाजपा, ३ राष्ट्रवादी काँग्रेस, २ काँग्रेस, २ शिवसेना शिंदे, २ मराठवाडा जनहित पार्टी आणि १ ठिकाणी शिवसेना (उबाठा) चे नगराध्यक्ष निवडून आले आहेत.

## हदगाव नगरपरिषद शिवसेना शिंदे गटाच्या ताब्यात



**हदगाव-** हदगाव नगरपरिषद निवडणूक २०२५ आज दि.२१ डिसेंबर रोजी मतमोजणी होऊन शिवसेना शिंदे गटाच्या सौ. रोहिणी भास्कर वानखेडे या १२९३ च्या मतांची आघाडी घेत विजयी झाल्यात तर त्यांच्या प्रतिस्पर्धी सौ. कुमुद सुनील सोनुले यांना ४३१७ मत तर सौ. रोहिणी भास्कर वानखेडे यांना ५६१० मतदान मिळाले तर शिवसेना उबाठा गटाचे उमेदवार सौ. सीमा बालाजी घाळप्पा यांना ३७३९ मतदान मिळाले असून सौ. रोहिणी भास्कर वानखेडे यांनी १२९३ एवढ्या मतांची आघाडी घेत दणदणीत विजय संपादन केला.

हदगाव नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने आ.बाबुराव कदम कोहळीकर यांनी भाजपा सह युती करत ही निवडणूक लढवली त्यात माजी खासदार सुभाष वानखेडे यांनी प्रचाराची धुरा सांभाळत निवडणूक मैदान गाजवले पण शिवसेनेला १६ जागांपैकी फक्त पाच जागांवर समाधान मानावे लागले तर भाजपाने चार जागा लढवत त्यातून तीन जागांवरती विजय संपादन केला त्यामुळे भाजपाने हदगाव नगरपालिकेमध्ये चांगले यश संपादन केले असेच म्हणावे लागेल. शिवसेना उबाठा गटाचे विद्यमान खासदार नागेश पाटील आष्टीकर यांनी ही निवडणूक स्वबळावर लढवत सात जागांवरती दणदणीत विजय संपादित केला तर सतत दहा वर्ष हदगाव नगरपालिकेत सत्तेत असणारी काँग्रेस पक्षाला यावेळेस फक्त पाच जागांवर समाधान मानावे लागले. एकंदरीत या निकालावरून माजी खासदार सुभाष वानखेडे यांचे हदगाव शहरांवर आज सुद्धा वरचष्मा कायम असल्याचे दिसून येते. तर हादगाव शहरातील नागरिक हे नेहमीच विद्यमान आमदार यांच्या बाजूने राहून आपला शहराचा विकास कसा साध्य करायचा यात या निकालावरून ही बाब लक्षात येते.

## मुखेड नगराध्यक्षपदी शिवसेनेच्या विजया देबडवार यांचा निर्णायक विजय

**मुखेड-** मुखेड नगरपरिषद निवडणुकीत सत्तासमीकरणे बदलवत शिवसेना (शिंदे गट)च्या सौ. विजया धोंडूराम देबडवार यांनी नगराध्यक्षपदी निर्णायक विजय मिळविला. अत्यंत चुरशीच्या व लक्षवेधी ठरलेल्या या निवडणुकीत त्यांनी १०,३४५ मते मिळवित भारतीय जनता पार्टीच्या उमेदवार सौ. विजया राम पत्तेवार यांचा २,०८६ मतांनी पराभव केला. पत्तेवार यांना ८,२५९ मते मिळाली.

तिरंगी लढतीत भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या उमेदवार डॉ. सौ. दिपाली श्रावण रापणवाड यांना ८०० मते मिळाली. मुखेड शहरातील ही निवडणूक राजकीय प्रतिष्ठेची मानली जात होती. प्रचाराच्या अखेरच्या टप्प्यापासूनच शिवसेना (शिंदे गट) व भाजप यांच्यात थेट सामना रंगला होता. अखेर मतदारांनी शिवसेना (शिंदे गट)च्या उमेदवारावर विश्वास टाकत स्पष्ट कौल दिला.

या निवडणुकीत शिवसेना (शिंदे गट)चे नगराध्यक्षासह पाच नगरसेवक निवडून आले असून, भारतीय जनता पार्टीचे १५ नगरपरिषद सदस्य निवडून आले आहेत. त्यामध्ये वार्ड क्र. १ मधून मैनोदीन शेख लिलावतीबाई पाटील, वार्ड क्र,२ नागनाथ लोखंडे, दिपक लोहबंदे

वार्क क्र,३ हेमंत घाटे,शकुंतला चव्हान वार्ड क्र,४ स्नेहा तमशेट्टे, राजकुमार बामने, वार्ड क्र ५ विनोद आडेपवार, पंकज गायकवाड वार्ड क्र ६ अशोक गजलवाड, बजरंग कल्यानी, वार्ड क्र ७ गजानन लंगेवाड, जयप्रकाश कानगुले , वार्ड क्र.८ विजय कोत्तापल्ले, शंकर चिंतमवाड ,वार्ड क्र.९ अनिल जाजु, शौकत होनवडजकर,वार्ड क्र १०. विनोद दंडलवाड, करण रोडगे यांचा विजय झाला.

निवडणूक निकालानंतर तहसील कार्यालयात निवडणूक निर्णय अधिकारी राजेश जाधव यांच्या हस्ते सर्व विजयी उमेदवारांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.


हा निकाल आगामी स्थानिक राजकारणाच्या दृष्टीने महत्त्वाचा मानला जात असून, मुखेड नगरपरिषदेतील सत्तासंतुलन आणि विकासाच्या दिशेने होणाऱ्या निर्णयांवर या कौलाचा थेट परिणाम होणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

## कंधारमध्ये राष्ट्रवादीचा गड आला पण सिंह गेला स्थिती

**कंधार-**कंधार नगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५चा निकाल नुकताच जाहीर झाला असुन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अजित पवार गटाचे दहा नगरसेवक विजयी झाले आहेत परंतु नगराध्यक्ष पदाचा उमेदवार पराभूत झाले असल्यामुळे राष्ट्रवादी ची स्थिती गड आला पण सिंह गेला अंशी झाली आहे भारतीय जनता पक्षाला भोपळाही फोडता आलेला नाही भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार शहाजी नळगे हे विजयी झाले आहेत आज दि२१ डिसेंबर रोजी जाहीर झालेल्या निर्णयानुसार राष्ट्रवादी काँग्रेसचे पक्ष अजित पवार गटाचे १० काँग्रेस पक्षाचे ५ अपक्ष ३ वंचित १ शिवसेना शिंदे गट १ या प्रमाणे उमेदवार विजयी झालेले आहेत यात विजयी उमेदवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रभाग ३ अ अब्दुल मनानं ब शेख कैसर बेगम प्रभाग ५अ समिर उल्लास ब परवीन तबस्सूम प्रभाग ६अ कदम प्रकाश बा पठाण परवीन बेगम प्रभाग ७अ कांबळे कविता ब मोहम्मद जफरोदीन प्रभाग ९ब शेख अजमेरीअब्दुल प्रभाग १०अ केंद्रे अनुसया चेतन काँग्रेसचे बसवंते वैशाली पवार सुनिता बनसोडे देउबाई नळगे भास्कर कांबळे सुधाकर अपक्ष नळदकर मयुर कांबळे कुसुम सोनकांबळे राजु शिवसेनेचे पिनाटे महेश वंचित बहुजन आघाडी चे देशमुख दिलीप या प्रमाणे उमेदवार विजयी झाले आहेत या निवडणुकीत भाजपला एकही उमेदवार निवडून आणता आला नसल्यामुळे नामुष्की ची वेळ आलेली आहेफ

## हिमायतनगर नगर पंचायत नगराध्यक्षपदी काँग्रेसचे शेख रफिक विजयी

**हिमायतनगर-** सार्वजनिक नगरपंचायत निवडणुकीचा निकाल आज सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी पल्लवी टेमकर यांनी घोषित केला आहे.यामध्ये सकाळी १० वाजल्यापासून मतमोजणी सुरुवात झाली होती. नगरपंचायतीच्या थेट नगराध्यक्ष पदाची निवडणुक ही काँग्रेस पक्ष आणि भाजपा यांच्यात दुरंगी लढत झाली.यामध्ये प्रथमच थेट नगराध्यक्षपदी काँग्रेसचे उमेदवार



शेख रफिक शेख मेहबूब हे मोठ्या फरकाने विजय झाल्याचे घोषित करण्यात आले आहे. यामध्ये काँग्रेस पक्षाचे थेट नगराध्यक्ष शेख रफिक शेख मेहबूब यांना एकूण मते ६६५० तर भाजप पक्षाचे नगराध्यक्ष पदाची उमेदवार डॉ.राजेंद शेषेराव वानखेडे यांना एकुण मतदान ४२८१ मते मिळाली आहेत.

नगराध्यक्ष पदाची प्रथमच निवडणूक झाली.यामध्ये काँग्रेस विरुद्ध भाजप अशी लढत होऊन अखेर काँग्रेस पक्षाचे उमेदवार शेख रफिक शेख महेबुब यांना २३६९ मतांची आघाडी मिळाली आहे.सार्वजनिक नगरपंचायत निवडणुकीमध्ये एकूण १७ प्रभागात नगरसेवक पदाची निवडणुक झाली.त्यामध्ये १७ पैकी काँग्रेस पक्षाचे ८ उमेदवार विजयी झाले.तर भाजपचे नगरसेवक पदाचे एकुण उमेदवार ०३ विजयी झाले.त्या पाठोपाठ शिवसेना उध्दव ठाकरे गटाचे एकुण नगरसेवक पदाचे उमेदवार ०३ विजय झाले आहेत.शिवसेना शिंदे गटाचे एकुण ०२ नगरसेवक पदाचे उमेदवार विजयी झाले.राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र गटाचे एकमेव उमेदवार विजयी झाले.यामुळे हिमायतनगर नगरपंचायतीवर महाविकास आघाडीची सत्ता आल्याचे दिसून येते आहे.तर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट यांनी जोर लावून न ही खाते ही उघडता आले नाही. मागील पंचवार्षिक निवडणुकीमध्ये भाजप पक्षाचे एकही उमेदवार निवडून आले नसताना,आज तीन उमेदवार निवडुन येऊन भाजपचे खाते उघडले असल्याने भाजप कार्यकर्त्यांमध्ये नवचेतन्य निर्माण झाले आहे.

## किनवट नगर परिषद : शिवसेना (उ.बा.ठा.)च्या सुजाता येंड्रलवार नगराध्यक्ष

**किनवट** -किनवट नगर परिषद सार्वत्रिक निवडणुकीत प्रस्थापित सत्तेला जोरदार धक्का बसला असून भारतीय जनता पक्षाला सत्ता गमवावी लागली आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ. सुजाता येंड्रलवार यांनी भाजपाच्या सौ. पुष्पा आनंद मच्छेवार यांचा ३९९६ मतांनी पराभव करत



दणदणीत विजय मिळवला. येंड्रलवार यांना १०,४७७ मते तर मच्छेवार यांना ६,४८१ मते मिळाली. इतर पक्षांना विशेष यश मिळू शकले नाही.

एकूण १० प्रभागांतील २१ नगरसेवकांच्या निवडीसाठी ही निवडणूक पार पडली. प्रभाग क्रमांक १ (अ) मध्ये भाजपाचे संतोष म्हरसकोल्हे यांनी केवळ १३ मतांनी विजय मिळवला. १ (ब) मध्ये अपक्ष प्रिती धिरज नेम्मानिवार यांनी ३८३ मतांच्या भक्कम फरकाने बाजी मारली. प्रभाग २ (अ) मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट)च्या अश्विनी जागर्लावार यांनी ३३९ मतांनी विजय मिळवला. प्रभाग ३ (अ) मध्ये शिवसेना (उ.बा.ठा.)च्या निलोफर भाटी विजयी झाल्या, तर ३ (ब) मध्ये अत्यंत चुरशीच्या लढतीत श्रीराम नेम्मानिवार यांनी भाजपाच्या फेरोज तंवर यांचा केवळ २ मतांनी पराभव केला; यासाठी दुबार मतमोजणीही करण्यात आली. प्रभाग ४ (अ) मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे अभय नगराळे तर ४ (ब) मध्ये शेख नुरसबा शेख मुकद्दर विजयी ठरल्या. प्रभाग ५ (अ) मध्ये अपक्ष चंद्रशेखर नेम्मानिवार यांनी विजय मिळवला. प्रभाग ६ मध्ये राष्ट्रवादी (श.प.)चे प्रविण राठोड यांनी ५९१ मतांच्या फरकाने दणदणीत विजय मिळवला. ६ (ब) मध्ये भाजपाच्या निकिता आयनेनिवार, तर दुसऱ्या ६ (ब) जागेवर भाजपाच्या सरोजनी ओद्दीवार यांनी अल्प फरकाने विजय मिळवला. अत्यंत हायव्होल्टेज मानल्या जाणाऱ्या प्रभाग ७ मध्ये भाजपाचे माजी उपनगराध्यक्ष श्रीनिवास किशनराव नेम्मानिवार विजयी झाले. प्रभाग ८ (अ) मध्ये शिवसेना (उ.बा.ठा.)च्या गंगाबाई कोल्हे यांनी माजी नगरसेविका अनिता क्यातमवार यांचा ३० मतांनी पराभव केला, तर ८ (ब) मध्ये शिवसेना शिंदे गटाचे सुरज सातुरवार यांनी ७९६ मतांनी दणदणीत विजय मिळवला. प्रभाग ९ (अ) मध्ये राष्ट्रवादी (अजित पवार गट)च्या शेख सादिका तर ९ (ब) मध्ये राष्ट्रवादी (शरद पवार गट) च्या बेग नईम मिर्झा यांनी माजी नगराध्यक्ष साजिद खान यांचा १४ मतांनी पराभव करत धक्कादायक निकाल दिला. प्रभाग १० (अ) मध्ये माजी नगराध्यक्ष अभय महाजन तर १० (ब) मध्ये राष्ट्रवादी (अजित पवार गट)च्या गुलबख्त खान विजयी ठरल्या. १० (क) मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसच्या खान जरीना साजिद यांनी विजय मिळवला.एकूण निकाल पाहता किनवट नगर परिषदेत सत्ताबदल स्पष्ट झाला असून भाजपला मोठा राजकीय धक्का, तर शिवसेना (उ.बा.ठा.) सह राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांनी लक्षणीय कामगिरी केली आहे.

## बिलोलीत जनहित पक्षाची सत्ता;लाडकीचा मिळाला आशिर्वाद

**बिलोली** -मोठ्या प्रतिक्षे नंतर बिलोली नगर पालीकेच्या निवडणुकीचा निकाल घोषीत झाला आहे.यात नगरध्यक्ष पदासह मराठवाडा जनहित पार्टीचे तब्बल १४ उमेदवार विजयी झाले आहेत तर या खालोखाल काँग्रेस ४, राष्ट्रवादी १, तर अपक्ष १ उमेदवार विजयी झाले आहेत. यामध्ये महत्वाचे असे की,बिलोली नगर परिषदेवर ज्यांची सत्ता गेल्या पंधरा ते वीस वर्षापासून काबीज आहे ते संतोष कुलकर्णी हे पुन्हा एकदा



नगराध्यक्ष पदावर विराजमान झाले असून विजयात लाडक्या बहिणींचा मोठा आशिर्वाद मिळाला आहे.विजयी झालेल्या एकुन उमेदवारात पत्रकार प्रकाश पोवाडे,वलियोद्दिन फारूखी यांच्या सौभाग्यवतींचा समावेश असून या आगळ्यावेगळ्या निवडणुकीमध्ये एका दारिद्र्याच्या परिस्थितीत जगत असलेल्या अजमद चाऊस यांच्या पत्निच्या विजयाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे.

विजयी उमेदवार या प्रमाणे ईनामदार मिर्झा वशिमबेग, खान मैमुनाबेगम अमजद खाँन, नागनाथ तुम्मोड, मैथिली संतोष कुलकर्णी, शिंदे लता गंगाधरराव,खंडेराय स्पनिल, शंखपाळे स्वाती, अब्दुल फिरदोश, यशवंत गादगे, मेडेकर गिरजाबाई, कुडके राजू, पटेल अपसरी बेगम सादीक, पोवाडे अम्रपाली प्रकाश, संदिप कटारे, शिवाजी गायकवाड, अर्शियानाज फारूखी, गायकवाड अनुपमा, अंकुषकर अनुप, शिवशंकर देशमुख, गोदावरी पप्पुलवार यांचा समावेश आहे. या निवडणुकीची मतमोजणी शांतता पूर्वक गालबोट न लागता व्हावी यासाठी सहाय्यक निवडणूक अधिकारी तथा नायब तहसिलदार बी.जी. मिट्टेवाड यांनी उपजिल्हाधिकारी क्रांती डोंबे,तहसिलदार गजानन शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली कौतुकास्पद कामगिरी केले आहेत.

## मुदखेडमध्ये वीस वर्षानंतर कमळ फुलले!

**मुदखेड** -मुदखेड नगरपरिषदेत तब्बल २० वर्षानंतर भाजपाचे कमळ फुलले असून नगराध्यक्ष पदासह १४ नगरसेवक निवडून आल्याने काँग्रेस पक्षाच्या दारुण पराभवासोबत खा. चव्हाण यांच्या 'अशोक'पर्वावर शिक्कामोर्तब झाला आहे.



मुदखेड नगरपरिषदेवर गेल्या २५ वर्षांपासून काँग्रेसचे वर्चस्व होते. गेल्या पंचवार्षिक निवडणुकीत काँग्रेसला स्पष्ट बहुमत मिळाले असले तरी नगराध्यक्ष पदी अपक्ष मुजीब जहागीरदार निवडून आले होते. यानंतर मध्यंतरीच्या काळात भाजपात पक्ष प्रवेश केल्याने राजकीय समीकरणे बदलली आहेत. काँग्रेसच्या बालेकिल्ल्यात खा. अशोक चव्हाण यांनी केलेला राजकीय पक्ष प्रवेश राजकीय भूकंप समजला जात होता. यानंतर लोकसभा निवडणुकीत काँग्रेसने बालेकिल्ला शाबीत ठेवला होता. विधानसभा निवडणुकीत मात्र अशोक चव्हाण यांनी प्रतिष्ठा पणाला लावून श्रीजया चव्हाण यांना आमदार केले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत वर्चस्व स्थापन करण्यासाठी खा. अशोक चव्हाण यांनी संपूर्ण ताकदीनिशी निवडणूक लढवण्याचा निर्धार केला होता.

मुदखेड नगरपरिषद निवडणुकीत भाजपच्या उमेदवार सौ.विश्रांती माधव कदम यांना ६८८९ तर काँग्रेस उमेदवार सौ.शीला राजबहादुर कोत्तावार यांना ५१६२ मते मिळाली. यामध्ये भाजपच्या विश्रांती कदम यांचा १७२७ मतांनी विजयी झाला शिला कोत्तावार यांचा दारुण पराभव झाला आहे. या निवडणुकीत भाजपाचे १४, काँग्रेसचे ४ आणि एम आय एमचे २ नगरसेवक निवडून आले आहेत. त्यामुळे खा. अशोक चव्हाण, आ. श्रीजया चव्हाण यांच्या नेतृत्वावर पुन्हा शिक्कामोर्तब झाले असून अशोक पर्वाने काँग्रेसची वाताहत झाली आहे.

## उमरीत गोरठेकर यांचे नगरपरीषदेवर पुन्हा वर्चस्व



**उमरी** -उमरी शहरात नगर परिषेदेवर पंधरा वर्ष सत्ता असलेल्या गोरठेकर घराण्याला सोहळाव्या वर्षी उमरीकर यांनी भरघोष मते देवून अजित पवार गट राष्ट्रवादी चे घऊ ङ्ढी यांना यांच्या सह १८ नगरसेवक आणि नगराध्यक्ष पद ही निवडून आले असुन भाजपच्या मातबगार लोकनेत्यांना गोरठेकर घराण्याची पिडी भारी पडली आहे विशेष गोरठेकर घराणे संपवण्यासाठी जे राजकीय षडयंत्र झाले ते जनतेने हानुन पाडले आहे भाजपाचा पुर्ण सपडा साफ होत होता पण त्यांना माजी नगराध्यक्ष संजय कुलकर्णी यांच्या मुलगी सायली कुलकर्णी ह्या विजयी झाल्या आहेत तर काँग्रेसचे निष्टावंत कार्यकर्ते गजानन अडगुलवार यांच्या पत्नी प्रियंका गजानन अडगुलवार यांनी ही राष्ट्रवादी पक्षाच्या माजी उपनगराध्यक्ष म . रफीक म . सज्जन सेठे यांच्या आई बेग नसिम बेग रियाझ यांचा पराव करीत विजयाची शिखर गाठली आहे .

नगराध्यक्ष पदाचे भाजपाचे स्वपना श्रीराम माचेवाड यांना ३४७४ मते पडली तर राष्ट्रवादी अजितदादा पवार गटाचे नगराध्यक्ष

शकुंतला भगवान मुदिराज यांना ४९६९ मते मिळाली ह्या १४९५ मताने विजयी झाल्या आहेत . प्रभाग एक मध्ये अनुसुचित जाती महिलासाठी जागेवर झडते सुनंदा शेषेराव राष्ट्रवादी कडून ४४३ मते घेवून विजयी झाल्या तर भाजपाचे वाघमारे लक्ष्मीबाई अरविंद २७३ मते घेवून भराव झाला आहे प्रभाग एक ब मध्ये राष्ट्रवादीचे चंदनवार संदिप दिलीप हे ४६४ मते घेवून विजयी झाले तर भाजपा चे भुसांडे संजय कैलासराव २४३ मते घेवून पराभव पत्कारावा लागला आहे. प्रभाग दोन अ मध्ये राष्ट्रवादी चे कंधारे रतन बाबुराव हे ८३० मते घेवून विजयी झाले तर भाजपाचे वाघमारे संतोष रामराव यांना ही हार मानावी लागली आहे. प्रभाग ब मध्ये राष्ट्रवादीचे कुरेशी सलमा बेगम वसीम ७६६ मते घेवून विजयी झाल्या तर भाजपा च्या पठाण नजिया बेगम रईस यांना ३५० मते पडली आहेत. प्रभाग ३ अ मध्ये राष्ट्रवादीच्या खांडरे अनुराधा गजानन ५६४ मते घेवून विजयी झाल्या तर भाजपाचे अनिता श्रीनिवास अनंतवार यांना ३६७ मते पडली आहेत . प्रभाग क्र ब मध्ये राष्ट्रवादीचे साईनाथ हिरामण जमदाडे ६१६ मते घेवून विजयी झाले तर भाजपाचे दवने माया बालाजी ३०८ मते घेवून पराव झाला आहे प्रभाग ४ मध्ये राष्ट्रवादी च्या अनुसयाबाई कटक दवणे ह्या ४१८ मते घेवून विजयी झाल्या तर भाजपाच दुधंबे भारतीबाई किशन २३३ मते घेवून परावभ झाला आहे. प्रभाग ४ मध्ये कॉग्रेस च्या प्रियंका गजानन अडगुडवार ४११ मताने विजयी तर राष्ट्रवादीचे बेग नसिम बेगम बेग रियाज २३२ मते पडली.

प्रभाग ५ मध्ये राष्ट्रवादीचे अलसवार गजान सुरेश ४४० मताने विजयी तर भाजपाचे भुंदेलकर प्रताप गंगारा ३३५ मताने पडले तर याच प्रभागात भाजपाचे सायली संजय कुलकर्णी ३९७ मतानो विजयी तर राष्ट्रवादीचे नगनुवार जयश्री अनिल ३८० मताने पराव प्रभाग ६ मध्ये राष्ट्रवादीच्या रणनवरे प्रिती विक्रेंद्र ५४८ मलाने विजयी तर भाजपाचे जोंधळे विजयमाला प्रशांत २४४ मताने हारले आहेत प्रभाग ६ मध्ये देशमुख कैलास श्रीनिवास ( गोरठेकर ) हे ५७५ मताने विजयी तर भाजपा चे देशमुख विश्वजीत विक्रम १९९ मतनी पराव आणि राष्ट्रवादीचे रॅपनवाड सुमनबाई किशनराव ३८३ मते घेवुन विजयी तर भाजपाचे दांडेवाड मिराबाई बाबू ३३० मताने पराभूत प्रभाग ७ मध्ये राष्ट्रवादीचे पंडित विष्णू कुमार नंदकिशोर ३७८ मताने विजयी तर भाजपाचे पबितवार किशोर विठ्ठलराव २९४ मते घेवून पराभव प्रभाग ८ मध्ये राष्ट्रवादीचे खांडरे रुकमीनबाई शंकर ६५० मते घेवुन विजयी तर भाजपाचे पेरेवार अशिवनी सुभाष ४५० मते घेवून पराभूत प्रभाग ८ मध्ये राष्ट्रवादी (छावा ) चे जाधव राजेश शिवराम ६२४ मताने विजयी तर भाजपाचे येताळे गणेशराव किसनराव ४५९ मते पडली आहेत प्रभाग ९ मध्ये राष्ट्रवादी चे सिंगणवाड निकीता कबीरराव ४०८ मते घेवून विजयी तर भाजपाच्या गुंडेवाड मिनाजी मारोतराव ३६७ मते घेवून पराभव राष्ट्रवादीचे शिंदे लक्ष्मीबाई विठ्ठल ४३७ मते घेवुन विजयी तर भाजपाचे मालीपाटील चित्राबाई अशोक ३४५ मते घेवून पराभव प्रभाग १० मध्ये राष्ट्रवादी चे शेळके मिराबाई ईरबा ६१३ मते घेवून विजयी तर भाजपाचे सवई नागमणी किरण २९८ मते घेवून पराभव राष्ट्रवादीचे शेख बाबुबेग हुसेन बेग ५३६ मते घेवून विजयी तर भाजपाचे अ . समद अ लतीफ ३३२ मते देवून पराभव पत्कारावा लागला आहे . एकंदरीत उमरी नगरपरिषेदेवर कैलास देशमुख गोरठेकर ( घ ऊ ङ्ढी ) राज्य आले असुन जि प पंचायत समिती गोरठेकर यांच्या ताब्यात येणार असल्याची जोरदार चर्चा आहे . यावेळी निवडणूक अधिकारी तथा तहसीलदार मंजुषा भगत अतिरिक्त निवडणूक अधिकारी अंषुतस चिचाळकर ' साहयक निवडणूक अधिकारी म्हणून नायब तहसीलदार - सोलंकर गटशिक्षण अधिकारी दर्शनवाड यांनी सर्व कर्मचारी उत्तम रित्या निवडणूक मतमोजणीचे काम केले पोलिस निरीक्षक गुटे यांच्या मार्गदर्शना खाली चोख बंदोबस्त ठेवला होता.

## भोकर नगरपरिषदवर पहिल्यांदा भाजपचा झेंडा फडकला

**भोकर-** भोकर नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक निकाल आज दिनांक २१ डिसेंबर रोजी जाहीर झाला असून या निकालाकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष वेधलेली ही नगरपरिषद निवडणूक आहे या निवडणुकीचा निकाल नव्याने भाजपमध्ये प्रवेश केलेले अशोक चव्हाण यांच्या पारड्यात पडणार हे निश्चित समजले आहे. काँग्रेसचे खासदार यांच्या नेतृत्वात आणि राष्ट्रवादी अजित पवार गटाचे आमदार प्रताप पाटील चिखलीकर,शिवसेना शिंदे गट पक्षाचे हेमंत पाटील ह्या नेत्यांनी आपली आपली उमेदवारी दिल्याने निकाल मात्र शेवट पर्यंत कोण विजयाचा गुलाल लावणार हे निश्चित दिसत नव्हते पण निकाल निवडणूक आयोगाच्या वेळेनुसार लागणारच हे निश्चित असताना भाजपाचे जास्त उमेदवार निवडून आलेले दिसून आले.अशोक चव्हाण यांनी निवडून आलेल्या उमेदवाराचे कौतुक या ठिकाणी शहरात उपस्थिती दाखवून केल्याने कार्यकर्त्या मध्ये आनंदाचे वातावरण दिसून आले.भोकर नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक विजयी उमेदवार प्रभाग क्रमांक (१,अ) सौ.बोलेवार (राष्ट्रवादी अजित पवार गट) प्रभाग क्रमांक (१,ब) साईप्रसाद जटालवार(अपक्ष),प्रभाग क्रमांक (२,अ) पोकलवार (भारतीय जनता पार्टी)प्रभाग क्रमांक (२, ब) वैभव धोंडगे (भारतीय जनता पार्टी) (३,अ) यशवंतकर (भारतीय जनता पार्टी)प्रभाग क्रमांक (३, ब) योगेश भोकरकर(भारतीय जनता पार्टी),

(४,अ) पिटलेवाड (भारतीय जनता पार्टी)प्रभाग क्रमांक (४, ब) सुहास पवार(भारतीय जनता पार्टी),(५,अ) लक्षटवार (भारतीय जनता पार्टी)प्रभाग क्रमांक (५, ब) राजेश्वर देशमुख(अपक्ष),(६,अ) इनामदार (भारतीय जनता पार्टी)प्रभाग क्रमांक (६, ब) इनामदार(भारतीय जनता पार्टी),(७,अ) गौतम कांबळे(भारतीय जनता पार्टी)प्रभाग क्रमांक (७,ब) सोनवाडे (भारतीय जनता पार्टी),(८,अ) वाघमारे(भारतीय जनता पार्टी)प्रभाग क्रमांक (८,ब) बिल्लुरवार (अपक्ष),(९,अ) क्षीरसागर (भारतीय जनता पार्टी)प्रभाग क्रमांक (९, ब) संजय घंटलवार(राष्ट्रवादी अजित पवार गट),(१०,अ) युसुफ (भारतीय जनता पार्टी पुरस्कृत)प्रभाग क्रमांक (१०, ब) नजीम (भारतीय जनता पार्टी पुरस्कृत),(११,अ) गिमेकर(भारतीय जनता पार्टी) प्रभाग क्रमांक (११, ब) विजय पवार(भारतीय जनता पार्टी) ह्या उमेदवाराचा विजय झाला आहे.

**नगराध्यक्ष**

| | |
|---|---|
| भाजपा- | ३ |
| राष्ट्रवादी- | ३ |
| काँगेस- | २ |
| शिवसेना(शिंदे)- | २ |
| शिवसेना (ठाकरे)- | १ |
| मजपा- | १ |

# राष्ट्रवादी काँग्रेसच्या विजयमाला टेकाळे यांचा विजय, अटीतटीच्या लढाईत अवघ्या २४४ मतांनी मारली बाजी

**तभा वृत्तसेवा**
**देगलूर, दि. २१ डिसेंबर-**

देगलूर नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूकीत राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) पक्षाच्या सौ विजयमाला बालाजी टेकाळे यांनी काँग्रेसच्या श्रीमती मनोरमा मष्णाजीराव निलमवार यांना अटीतटीच्या लढाईत अवघ्या २४४ मतांनी पराभव करत विजयावरती शिक्कामोर्तब केले. नगराध्यक्षा पदासाठी एकूण पाच उमेदवारांनी आपले नशीब आजमावले, पण खरी लढत काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांच्यातच झाली. तब्बल सत्तावीस नगरसेवक पदापैकी पंधरा राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) पक्षाने तब्बल पंधरा उमेदवार विजय मिळवत राष्ट्रवादीने वर्चस्व मिळविले तर काँग्रेस पक्षाच्या बारा उमेदवारांना विजयाचा गुलाल लागला. लक्ष्मीकांत पदमवार यांनी आपल्या निष्ठावंत शिलेदारासह राष्ट्रवादीची एकहाती खिंड लढवत नगरपरिषदेवर झेंडा फडकवला. पदमवार यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून देगलूरकरांनी राष्ट्रवादीच्या हाती सत्ता दिली.

देगलूर नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ चा निकाल आज दि. २१ डिसेंबर (वार रविवार) रोजी जाहीर करण्यात आला. या निकालात राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) पक्षाने बाजी मारत १५ नगरसेवकांसह नगराध्यक्षाचे पदही स्वतःच्या ताब्यात घेत नगरपरिषदेवर झेंडा लावला आहे. या निवडणुकीत नगराध्यक्ष पदासाठी एकूण पाच उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उभे टाकले होते. यात राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाचे सौ विजयमाला बालाजी टेकाळे यांनी १४९६५ मते मिळवली तर काँग्रेस पक्षाच्या श्रीमती मनोरमा मष्णाजीराव निलमवार यांनी १४७२१ मते घेत अटीतटीच्या लढाईत



अवघ्या २४४ मतांनी पराभवाला सामोरे जावे लागले. या पाठोपाठ भारतीय जनता पार्टीचे सौ. नीलाबाई गंगाधर भांगे यांना १४०९ मते, शिवसेना (एकनाथ शिंदे गट) पक्षाचे सौ. जयश्री बाळू काब्दे यांना ८५७, अपक्ष उमेदवार मुस्कान मोहोमद इलियास कुरेशी यांना २१२ मते आणि नोटा'ला १४३ मिळाली आहेत. नगराध्यक्षा पदाची निवडणूक अत्यंत चुरशीची लढत ठरली, शेवटच्या क्षणापर्यंत निकालाची वाट पाहावी लागली. राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) पक्षाच्या या विजयाबद्दल लक्ष्मीकांत पदमवार आणि बालाजी टेकाळे यांनी जनतेचे आभार व्यक्त केले.

सत्तावीस नगरसेवक पदाच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) पक्षाने वर्चस्व राखत तब्बल पंधरा नगरसेवक विजयी झाले तर काँग्रेस पक्षाचे एकूण बारा नगरसेवक विजयी झाले. या निवडणुकीत काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार), भाजपा यांनी सत्तावीस जागावरील सर्व उमेदवारांसह नगराध्यक्ष पदाचा उमेदवार रिंगणात उतरविले होते. तर शिवसेना ( एकनाथ शिंदे गट) पक्षाचे अकरा उमेदवार, ए.आय.एम.आय.एम. आणि वंचित बहुजन आघाडीकडून प्रत्येकी तीन तीन उमेदवार निवडणुकीला सामोरे गेले होते.

**राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) पक्षाचे विजयी नगराध्यक्षा आणि नगरसेवक**

सौ. विजयमाला बालाजी टेकाळे (नगराध्यक्षा), कडलवार शोभा दिगंबरराव (प्रभाग क्रमांक ०१ अ), मैलागिरे रोहिणी बालाजी (प्रभाग क्रमांक ०१ ब), तोटावार योगेश्वरी लक्ष्मण (प्रभाग क्रमांक ०५ अ), बोन्लावार अनिल गंगाराम (प्रभाग क्रमांक ०६ अ), कौरवार रत्नमाला रमेशराव (प्रभाग क्रमांक ०६ ब), कांबळे मीनाक्षी व्यंकट (प्रभाग क्रमांक ०७ अ), देशाई अंकुश सुरेशराव (प्रभाग क्रमांक ०७ ब), शाखावार नंदकिशोर लक्ष्मण (प्रभाग क्रमांक ०८ अ), शेख आर्शियाफातिमा पाशामियाँ (प्रभाग क्रमांक ०८ ब), टेकाळे (बबलू) एकनाथ शेषराव (प्रभाग क्रमांक ०९ ब), जमीन बेगम सय्यद निसार (प्रभाग क्रमांक ११ अ), पदमवार उज्वला लक्ष्मीकांत (प्रभाग क्रमांक ११ ब), कांबळे सुमंत रामचंद्रराव (प्रभाग क्रमांक १२ अ), दयाडे पल्लवी रुपेश (प्रभाग क्रमांक १२ ब), मोरे कलावती माधवराव (प्रभाग क्रमांक १२ क)

**भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे विजयी नगरसेवक**

अमरीननुरी अब्दुल आहद (प्रभाग क्र. ०२ अ), शेख मीरामोहीयोद्दीन शेख सातार (प्रभाग क्र. ०२ ब), कांबळे स्नेहा राजाराम (प्रभाग क्र. ०३ अ), सय्यद मुहितओद्दिन मुजीबोद्दीन (प्रभाग क्र. ०३ ब), शत्रुघ्न जळबा वाघमारे (प्रभाग क्र. ०४ अ), महबूब बी शेख अब्दुल रशिद (प्रभाग क्र. ०४ ब), कंधारकर लक्ष्मण लच्छमन्ना (प्रभाग क्र. ०५ ब), इतापे प्रेमला दत्तात्रेय (प्रभाग क्र. ०९ अ),दौलताबादी कुलसुम बी म. आयुब (प्रभाग क्र. १० अ), रोहिलावार बालाजी गंगाराम (प्रभाग क्र. १० ब), येशमवार रत्नमाला सुनिल (प्रभाग क्र. १३ अ), सुनिल हुल्लाजी कोयलावार (प्रभाग क्र. १३ ब)

**परफेक्ट नियोजन, करेक्ट कार्यक्रमाचे बॅनर झळकले**

राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) पक्षाच्या या विजयाचे 'परफेक्ट नियोजन, करेक्ट कार्यक्रमा'चे देगलूर येथील साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौकात झळकले आहे.